Website : www.chaprak.com

सामान्य माणसाचा उंचावलेला स्वर...

# साहित्य चपराक

संपादक : घनश्याम पाटील

ऑगस्ट २०११

मूल्य : ₹ २०/-



जो दीन दयाळ करुणाकर । अक्षय अभंग रुक्मिणीवर ।
तो महिपतीचे वसवोनि अंतर । वदवीन चरित्र संतांचे ।।

## संत चरित्रकार महिपती विशेषांक



सत्यमेव जयते

# उप मुख्यमंत्री
## महाराष्ट्र राज्य

दिनांक : २३ जून, २०११

**शुभेच्छा**

पुणे येथील चपराक मासिकाच्यावतीने संत महिपतीबुवा ताहाराबादकर यांच्या जीवनावर आधारित विशेषांक प्रकाशित करणार असल्याचे समजून आनंद झाला.

महाराष्ट्राला संत, महंताची दीर्घ परंपरा आहे. याच परेपरेतील संत महिपतीबुवा यांनी समाजप्रबोधनाकरिता तत्कालिन अनेक संतांची चरित्रे लिहून त्यांचे विचार आणि शिकवण लोकांसमोर पोहोचविण्यात मोठे योगदान दिले आहे. अशा महान संताचे जीवनचरित्र आषाढी एकादशीनिमित्त विशेषांकाद्वारे भाविकांसमोर मांडण्याचा आपला उपक्रम स्तुत्य आहे. विशेषांकात संत महिपतीबुवा यांच्या अप्रकाशित पैलूंवर माहितीपूर्ण लेखाद्वारे प्रकाश टाकला जाईल, असा विश्वास आहे.

विशेषांकास माझ्या हार्दिक शुभेच्छा!

( अजित पवार )

**श्री.घनश्याम पाटील,**
संपादक, चपराक,
१३६०, शुक्रवार पेठ,
काळा हौद, पुणे-४११००२.

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दूरध्वनी : ०२२-२२०२२४०१ व २२०२५०१४, फॅक्स : ०२२-२२०२४८७३

वर्ष : तिसरे अंक : सातवा

एक परिपूर्ण मासिक

# साहित्य चपराक

चतुरस्त्र परखड रास्त कर्तव्यदक्ष

RNI No.: MAHMAR/2009/34853
Declaration No.: PHM/SR/3/VIII/2009

संस्थापक संपादक : घनश्याम पाटील

सहसंपादक : शिवराज सणस, माधव गिर

उपसंपादक : सागर सुरवसे, सौ. चंद्रलेखा बेलसरे

व्यवस्थापक : वसंतराव पाटील

सल्लागार : ॲड. भगवानराव साळुंखे

अंतर्गत सजावट : नंदू लोखंडे

मुखपृष्ठ चित्र : अपूर्वा पंचभाई

विशेष सहाय्य : दत्तात्रय नाईकवाडे

मुद्रण सहाय्य : सुनिल गंगाराम मोरे

जाहिरात व्यवस्थापक : प्रमोद येवले, विनोद श्रा. पंचभाई, सौ. अनुराधा देशपांडे, विलास पायगुडे, ॲड. कैलास थोरात, मन्मथ बेलुरे, सौ. गिरीजा गोखले

संपादकीय कार्यालय

'चपराक प्रकाशन'

१६१, अनंत अपार्टमेंट, काळा हौद चौक, शुक्रवार पेठ, पुणे-४११००२. भ्रमणध्वनी : ९२२६२२४१३२

Email : info@chaprak.com

नाशिक : वैभव कुलकर्णी, १४, नर्मदा दर्शन अपार्टमेंट, ब्रह्मगिरी सोसायटी, जेल रोड, नाशिक रोड, नाशिक. दूरध्वनी : (०२५३) २४१६५१४

| | |
|---|---|
| वार्षिक वर्गणी | : २००/- रु. |
| द्विवार्षिक वर्गणी | : ३८०/- रु. |
| पंचवार्षिक वर्गणी | : ९००/- रु. |

(सर्व विशेषांकासह)

अंतरंग...

- संतकवींवर महिपतींची विठ्ठलभक्ती/ विद्याधर मां. ताठे/६
- संत महिपती ताहाराबादकर : चरित्र आणि साहित्य/ प्राचार्य डॉ. रमेश आवलगावकर/८
- नीती व भक्तीचा मार्ग दाखविणारे संतकवी/ भागवताचार्य वा. ना. उत्पात/१२
- संतचरित्रकार महिपतींची स्फुट रचना/ रा. चिं. ढेरे/१६
- श्री संत कवी महिपती महाराज/ भाऊसाहेब महादू नाईकवाडे/१८
- श्री संत महिपती महाराज यांचे अल्पचरित्र/ अविनाश कांबळे/२२
- महिपतींची संतचरित्रे वाचू गाऊ वदू अपारे/ राघव शिवराम रामदासी/२४
- संत महिपती... एक चरित्रपट/ मोहंमद अनिस/२६
- देवस्थान ट्रस्टची यशस्वी घोडदौड.../ श्री. बाळासाहेब संपत मुसमाडे/२९
- महिपतीबुवा, माझं गाव आणि मी !/ दत्तात्रय बाबासाहेब नाईकवाडे/३१
- 'मराठीपणाची' ज्योत तेवत ठेवणे महत्वाचे !/ प्रा. मिलिंद जोशी/३४
- चरित्रकार महिपतीबुवा/ दत्तात्रय गायकवाड/३९
- आबा, आता तरी कार्यक्षमता दाखवा !/ देवदत्त बेळगावकर/४३
- आयुर्वेदाची पथ्येच भारी.....!/ वैद्य ज्योति शिरोडकर/४४

मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी हे मासिक वेद प्रिंटर्स, ५१८ शनिवार पेठ, पुणे ४११०३० येथे छापून शॉप नं. १, श्री दुर्वांकुर हौ. सोसायटी, १६१, शुक्रवार पेठ, पुणे ४११००२ येथे प्रसिद्ध केले.

संपादक : घनश्याम वसंतराव पाटील

(अंकातील मजकुराशी संपादक कदाचित सहमत असतीलही.)

(न्यायालयीन कारवाई पुणे न्यायालयांतर्गत. भ्रमणध्वनी : ९२२६२२४१३२)

संपादकीय

# संत महिपतीबुवांच्या निमित्ताने...

आमच्या भ्रमणध्वनीवर परवा एक संदेश आला. पंतप्रधान मनमोहनसिंग आणि केंद्रीय कृषीमंत्री ना. शरद पवार यांनी आपापल्या मंत्रीपदासह पक्षाचेही राजीनामे दिले. त्यांना म्हणे आता पद्मनाभन मंदीराचे मुख्य पुजारी म्हणून काम करण्याची खुमखुमी आहे.

खरचं, कुणाचेही डोळे दिपून जावेत आणि इतक्या संपत्तीची भूरळ पडावी असेच हे देवस्थान आहे. तिरूपती बालाजी, शिर्डी संस्थान यानंतर पद्मनाभन मंदीरही आता तेथील गडगंज संपत्तीमुळे चर्चेत आले आहे.

हिंदुस्थानातील भाविकांच्या श्रद्धा पराकोटीच्या आहेत. या श्रद्धा किती भक्कम आणि किती तकलादू हा भाग निराळा. मात्र येथील जनता देव-देवतांसाठी आणि देव-देवतांच्या नावावर वाट्टेल ते करायला तयार होते. लालबागचा राजा असेल किंवा पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ गणपती, प्रत्येक ठिकाणी पैशाचा, सोन्या-चांदीचा ढिग खच्चून भरलेला. ही निनावी संपत्ती कोण जमा करते ? रोजच्या जेवणासाठी महाग असलेला सामान्य माणूस की पापक्षालनासाठी आणि काळा पैसा पांढरा करण्यासाठी गुपचूपपणे दानपेटीत नोटांच्या बंडलांच्या थप्प्या रचणारे बंडल व्यापारी...

काहीही असो ! हा पैसा इथल्या मातीसाठी, सामान्य माणसासाठी वापरायचा ठरवला तर आपल्या देशात अनेक समांतर सरकार स्थापन होतील. प्रत्येक संस्थान म्हणजे एक स्वातंत्र्य राज्य. संस्थानचा प्रत्येक विश्वस्त म्हणजे स्वतंत्र राजा. पुट्टपूर्तीनरेश स्वर्गीय सत्यसाईबाबांनी नाही का जनतेच्या भल्याची कामे केली ? भोळ्या-भाबड्या भक्तांचा विश्वास संपादन करुन त्यांनी जगभरातील अनेक बड्या बड्या लोकांना आणि राजकारण्यांना आपल्या दावनीला बांधले. काय त्यांचा तो थाट ? ते स्वत:ला ज्या शिर्डीतील फकिराचा अवतार मानायचे ते साईबाबाही हे वैभव पाहून थक्क झाले असतील. श्रद्धा आणि सबुरीचा महामंत्र देणारे बाबा त्यांच्या नावाचा होणारा वापर पाहून द्वारकामाईत बसून ढसाढसा रडत असतील. त्यांच्या भक्तांना सद्बुद्धी दे, म्हणून टाहो फोडत असतील. सत्ता आणि संपत्ती ही फक्त राजकारण्यांची मक्तेदारी होती. मात्र येथील तीर्थक्षेत्रे इतकी गडगंज झाली आहेत की त्या मंत्रीपदाला घेवून काय चाटता ? एखाद्या मंत्रीपदापेक्षा एखाद्या देवस्थानचे अध्यक्षपद मिळवण्यासाठी म्हणूनच अनेकांची केविलवाणी धडपड सुरु असते.

रॉय किणीकर यांची एक रूबयी या क्षणी आम्हाला आठवते.

**घाटावर होती वाळत छाटी भगवी**
**दोरीवर होती वाळत साडी हिरवी**
**हा चिलिम फुंकत म्हणतो बघ सन्यासी**
**देवाला देईन त्या दोरीवर फाशी !**

साक्षात देवाला दोरीवर लटकवत फाशी देण्याची अतिरेकी कल्पना रॉय साहेबांसारख्या प्रतिभासंपन्न अवलिया संपादकाला का सुचली असावी ? संवेदनशील मनाचा एक कवी इतक्या टोकाचा आणि तितकाच कडवा विचार कसा करू शकतो ? या रुबाईने अस्वस्थ झालेल्या आमच्या मनात अनेक प्रश्न उपस्थित झाले. त्यातील काहींची उत्तरे मिळाली. काही प्रश्न मात्र लाटांवर स्वार होऊन काठाला धडका मारतात आणि पुन्हा मुख्य प्रवाहात एकरूप होतात. देवांनी माणसातला देव बघितला. संतांनी माणसातला देव दाखविला. मात्र तरीही माणसाला माणसाची ओळख पटू नये ? केवढे हे दुर्भाग्य ? संतांच्या विचारांचा विचार करण्याएवढीही उसंत आमच्याकडे असू नये ? कपाळ करंटेपणा म्हणतात तो हाच !

आमची नीतिमुल्य आणि श्रद्धा भक्कम होत्या तोपर्यंत आम्ही अव्वलस्थानी होतो. या देशात एकेकाळी सोन्याचा धुर निघत होता. आमची संपन्नता आणि वैभव पाहून भले भले अचंबित व्हायचे. मात्र दूधाचा समुद्र नासवायला मिठाचे चार खडे पुरेसे ठरतात. येथील गुरुकुल शिक्षण पद्धती नष्ट झाली आणि अधोगतीच्या दिशेने आमची पाऊले पडू लागली.

देवाधर्मावर विश्वास असल्याने वाईट विचार मनाला शिवत नसत. पापपुण्याच्या संकल्पनेमुळे समाजावर एक प्रकारचा धाक होता. 'बघणारा तो आहे' हे ध्यानी मनी पक्के असल्याने कोणताही अविचार करताना मनाचा थरकाप उडायचा.

कोणत्याही कारणाने कोणतेही चुकीचे कृत्य करण्यासाठी मन धजावायचे नाही. मात्र सुसंस्कृत समाज सुशिक्षित झाला आणि साराच बट्याबोळ झाला. शिक्षणासारखे प्रभावी शस्त्र हाती आल्याने बौद्धीक क्षत्रियांचे प्रमाण वाढेल असे वाटत होते. पण या शस्त्राचा उपयोग चुकीच्या पद्धतीने केला जाऊ लागला. माणसाने आपल्या कुवतीनुसार नवनवे शोध लावले. स्वर्गाची कल्पना करत आयुष्य व्यतीत करण्याऐवजी पृथ्वीवरच स्वर्ग निर्माण करण्याचा ध्यास त्याने घेतला. या ध्यासपंथातून मार्गक्रमन करताना त्याच्या डोक्याचा 'केमिकल लोचा' झाला आणि आम्ही मुळापासून उदध्वस्त होत गेलो.

सर्व साधनसामग्री उपलब्ध झाल्याने माणसा माणसातील जिव्हाळा संपुष्टात येऊ लागला. प्रत्येकाच्या गरजा वाढत गेल्या. गरीब-श्रीमंत अशी दरी निर्माण झाली. भौतिक प्रगतीलाच आपण आपली संस्कृती मानू लागलो आणि त्यामुळेच अनेक अनर्थ घडले. जीवनमूल्यांचा होत चाललेला ऱ्हास पाहून या तनाला असंख्य यातना होतात. भारतभूमी ही अनेक नररत्नांची खान आहे. मात्र त्याचा विसर आम्हाला पडल्याने आमचे अध:पतन सुरु आहे. बलशाली भारतातील माणसे वृत्तीने मात्र अपंग होत चालली आहेत. मुळात त्यांच्या श्रद्धा लुळ्या-पांगळ्या झाल्याने वृत्तीही बोथट बनली असावी.

सर्वप्रथम आमच्या राज्यकर्त्यांनी देवाधर्माचा उपयोग मतांसाठी केला. माणसांमाणसांत फुट पाडून त्यांनी त्यांची पोळी भाजून घेतली. स्वत:तील देवत्व ओळखण्याची क्षमता आणि सामर्थ्य लोप पावल्याने आम्ही जनावरांसारखे वागू लागलो. एखादी सीतामाई रामायण पोटात दडवून महाभारत घडविण्यात धन्यता मानू लागली. अनेक भ्रामक समजूती आणि अहंकाराच्या लढाईमुळे दुष्कर्मे वाढीस लागली. जगत्गुरु तुकोबाराय म्हणत, 'विटाळ तो परद्रव्य, परनारी, त्यापासूनि दूरी तो सोवळा' मात्र संपन्न संस्कृतीचा वारसा मिरवणाऱ्या या देशात अशी 'सोवळी' माणसे दूर्मिळ होत चालली आहेत.

स्वत:च्या ईश्वर स्वरुपाची ओळख प्रत्येकाला पटावी यासाठी आपल्याकडच्या अनेक संतांनी आपले आयुष्य खर्ची घातले. संत एकनाथांनी गाढवाला गंगाजल पाजले. माऊलींनी विश्वाचे पसायदान दिले. रामदास स्वामींनी मनाचे श्लोक दिले. जगद्गुरु तुकोबारायांनी गाथेच्या माध्यमातून मोठे तत्वज्ञान मांडले. गाडगेबाबांनी 'देवाला नवस बोलणे म्हणजे देवाला लाच देणे होय' असे ठणकावत माणसातला देव दाखवला. 'लाख बोलक्याहूनी थोर, एकची माझा कर्तबगार' असे म्हणत राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी कर्तबगारीचा गौरव केला. अशा असंख्य संतांनी समाजप्रबोधनाचे काम नेटाने केले. कुकर्मावर आणि ढोंगी मनोवृत्तीवर प्रहार केले. लोकांना त्यांच्या कल्याणाचा मार्ग दाखवला.

सतराव्या शतकात संतकवी महिपतीबुवा ताहाराबादकर यांनी यवनांची गुलामी भिरकावून देत हाती लेखणी घेतली. एक-दोन नव्हे तर तब्बल दोनशे पंच्याऐंशी संतांची चरित्रे लिहिली. त्यामुळेच आज आपणास या सर्व संतांच्या अफाट सामर्थ्याची जाणीव होते. गावोगाव प्रवास करून सर्व संतांची माणसांची माहिती एकत्र करणे आणि ती कवितेच्या रूपात शब्दबद्ध करणे हे महान कार्य महिपतीबुवांनी केले. आजकाल प्रसिद्धी पत्रकाद्वारे अकलेचे तारे तोडणाऱ्या पत्रकारांनी हा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा.

या महान विभुतीचे स्मरण करण्याच्या उद्देशाने आम्ही हा विशेषांक प्रकाशित करीत आहोत. इतक्या लोकांचे चरित्र अत्यंत प्रभावीरित्या मांडणारे संत महिपतीबुवा मात्र खुपच दुर्लक्षित आणि उपेक्षित राहिले आहेत. मुळचे ताहाराबाद निवासी असलेले आमचे सहकारी मित्र दत्तात्रय नाईकवाडे यांनी या अंकाची कल्पना मांडली. चांगल्याला चांगले म्हणण्याच्या स्वभाव वृत्तीमुळे आम्ही हे काम आव्हान म्हणून स्वीकारले आणि त्याला उदंड प्रतिसाद मिळाला.

संत साहित्यातील अधिकारी व्यक्तिमत्व असलेले रा. चिं. ढेरेकाका, भागवताचार्य वा. ना. उत्पात, ज्येष्ठ संपादक विद्याधर ताठे, प्राचार्य डॉ. रमेश आवलगावकर, महिपतीबुवांचे सातवे वंशज अविनाश कांबळे, चित्रपट कथालेखक मोहमंद अनिस, दत्तात्रय गायकवाड, माझा तरुण मित्र राघव रामदासी यांनी अभ्यासपूर्ण लेखन दिल्यामुळेच हा अंक यशस्वी होऊ शकला.

राज्याचे कर्तबगार उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांनी खास शुभेच्छा पाठवून आमची जबाबदारी आणखी वाढवली. संत महिपतीबुवांवर चित्रपट काढण्याचे धाडसी आव्हान स्वीकारणारे श्री. ज्ञानेश्वर आणि सौ. शामबालाताई माने, संत महिपतीबुवा देवस्थान ट्रस्टचे दिलदार अध्यक्ष रावसाहेब साबळे पाटील आदींनी सहकार्य केल्यामुळेच या अंकाला मूर्त स्वरुप येऊ शकले. कु. अपूर्वा विनोद पंचभाई या चिमुरडीने काढलेले मुखपृष्ठावरील चित्र संत महिपतींच्या दिव्यत्वाची साक्ष पटवते.

सर्वत्र देवाधर्माचा आणि देवस्थानचा बाजार मांडला जात असतांनाच वर्षानुवर्षे पंढरीची वारी करणारे वारकरी संप्रदायातील बांधव त्यांच्या भक्तीची प्रचिती देतात. हाच आदर्श गिरवणारे ताहाराबादचे ग्रामस्थ आणि संतकवी महिपती महाराज देवस्थान समितीचे पदाधिकारी म्हणूनच कौतुकास पात्र आहेत. या महापुरुषाची सेवा करण्याचे भाग्य त्यांना लाभले आहे. नि:स्वार्थ वृत्तीच्या या लोकांमुळेच ताहाराबाद देवस्थानात अजूनतरी 'दुकानदारी' दिसून येत नाही.

या विशेषांकामुळे एका चांगल्या विषयाची दखल घेतल्याचे समाधान आम्हाला लाभत आहे. श्री संत महिपती महाराज यांच्याविषयी फारशी माहिती उपलब्ध नसतांनाही आम्ही हा एक छोटासा प्रयत्न केला आहे. वाचकांना तो नक्कीच आवडेल, याचा विश्वास वाटतो.

– घनश्याम पाटील
भ्रमणध्वनी : ९२२६२२४१३२
Email : ghanshyam@chaprak.com

**विद्याधर मा. ताठे**
संपादक, मासिक एकता
भारत भवन, शुक्रवार पेठ,
पुणे-४११००२.
भ्रमणध्वनी : ९८८१९०९७७५

# संतकवींवर महिपतींची विठ्ठलभक्ती



*नाभाजी, उद्धव चिद्‌धन यांच्या नंतरचे संतचरित्रकार म्हणून संतकवी महिपतीबुवा ताहाराबादकर यांनी केलेले कार्य मराठी वाङ्‌मयाचे वैभव आहे. महाराष्ट्रातील १६८ व महाराष्ट्राबाहेरील ११६ संतचरित्रे महिपतींनी मोठ्या श्रद्धेने लिहिली आहेत. त्यांचे ४ संतचरित्र ग्रंथ भाविकांमध्ये, अभ्यासक्रमांमध्ये सुपरिचित आहेत. महिपतींचे अवघे जीवन विठ्ठलभक्तीने भारलेले वारकरी जीवन आहे. त्यांच्या अनन्य विठ्ठलभक्तीचे, शिर्डीच्या 'साईलीला'चे माजी कार्यकारी संपादक व 'एकता'चे विद्यमान संपादक विद्याधर साठे यांनी घडविलेले शब्ददर्शन.*

**श्रीहरिभक्तजनांची श्रीहरिभक्तिरस सत्सुधा भरितें ।**
**चरितें गातां जेणें आयुष्य क्षण पडों दिले न रितें ।।**

कवीवर्य, आर्याकार मोरोपंत यांनी महिपतीबुवांची वरीलप्रमाणे प्रशस्ती-स्तुती केली असून पंडितकवी मोरोपंतांचे हे उद्‌गार सार्थ आहेत. संतचरित्र लेखनाचा महिपतीबुवांचा ध्यास, त्यासाठी त्यांनी ठिकठिकाणी केलेली पायपीट आणि माहिती संकलित करण्यासाठी केलेले अविश्रांत-अथक परिश्रम या गोष्टी खरोखरीच थक्क करणाऱ्या आहेत. आपल्या या समग्र कार्याचे श्रेय महिपती यांनी दोघांना दिले आहे. त्यात पहिले आहेत त्यांचे स्वप्नोदिष्ट सद्‌गुरु संत तुकाराम महाराज आणि दुसरे आहेत रुक्मिणीवर पंढरीचा पांडुरंग. सद्‌गुरुकृपा व देवकृपा या गंगायमुना संगमातून महिपती यांची शब्दकला भावभक्तीचे रूप घेऊन प्रकट झालेली आहे.

**'शुद्ध बीजापोटी । फळे रसाळ गोमटी ।'** असे संत तुकोबारायांनी म्हटले आहे. श्री महिपती त्या उक्तीचे मूर्त रूप आहे. महिपतीचे वडिल दादोपंत कांबळे व आई गंगाबाई हे पंढरीचे निष्ठावान वारकरी होते. त्यांच्या पोटी अगदी उतारवयात जन्माला आलेला एकुलता एक कुलदीपक म्हणजे 'महिपती' होय. ज्या वयात पुत्रप्राप्ती संभव नाही अशा वयात झालेली ही पुत्र प्राप्ती, त्या दांपत्याच्या दृष्टीने विठ्ठलाचाच कृपाप्रसाद आहे.

आईवडिल दोघेही वारकरी असल्याने महिपतींना अगदी जन्मापासून पंढरीची वारी करण्याचे भाग्य लाभले होते. ताहाराबाद सारख्या छोट्याशा गावात त्या काळात शाळाच नव्हती त्यामुळे महिपतींना लौकिक शिक्षण घेता आहे नाही, पण त्या गावातील मोरोपंत तांभेरकर या सत्पुरुषाकडे जाऊन महिपतींनी थोडेफार संस्कृतचे पाठ घेतले होते. महिपतींचे अक्षर मोत्यासारखे सुंदर होते. ते बहुभाषिक होते. त्यांना मराठी शिवाय संस्कृत, हिंदी, गुजराती आणि कानडी या भाषांचेही उत्तम ज्ञान होते. त्यामुळेच ते महाराष्ट्राबाहेरील संतांची चरित्रे लिहू शकले. या बहुभाषा ते कोठे व कसे शिकले त्याविषयी फार माहिती मिळत नाही. महिपती १६ वर्षांचे झाले आणि त्यांच्या वडिलांचे निधन झाले. वडिलांचे पंढरीच्या वारीचे व्रत पुढे अखेरपर्यंत महिपतींनी मोठ्या निष्ठेने व आवडीने चालविले. प्रपंचाची जबाबदारी अंगावर पडली. मग त्यांनी एका मुसलमान जहागीरदाराकडे नोकरी पत्करली. त्यांच्या पत्नीचे नाव सरस्वती होते. यथावकाश त्यांना दोन मुलगे झाले, मोठा विठ्ठल-धाकटा नारायण. विठ्ठलभक्तीत व्यत्यय नको म्हणून त्यांनी यवन जहागीरदाराची नोकरी सोडली व उर्वरित सर्व आयुष्य संतचरित्र लेखनकार्यासाठी वाहिले.

संतलीलामृत, भक्तविजय, भक्तलीलामृत आणि संतविजय असे ४ संतचरित्र ग्रंथ महिपतींच्या नावावर असून त्यामध्ये महाराष्ट्रातील १६८ आणि महाराष्ट्राबाहेरील ११६ अशी २८४ संतचरित्रे आहेत. या ४ चरित्रग्रंथांशिवाय त्यांची अन्य स्फुट रचनाही खूप मोठी, विविध स्वरूपाची, विपुल आहे. या विपुल रचनेमध्ये त्यांचे 'पांडुरंग महात्म्य' सर्वाधिक भक्तीरसपूर्ण आहे. या पांडुरंग महात्म्याचे १२ अध्याय आहेत. पांडुरंगाबद्दल एवढे लिहून त्यांची लेखणी तृप्त झाली नाही, त्याशिवाय 'पंढरीमहात्म्य' आणि 'पांडुरंगस्तोत्र' त्यांना लिहावे वाटले. पांडुरंगाविषयीच्या या तीन रचना महिपतींच्या विठ्ठलभक्तीचे उत्कृष्ट दर्शन आहे. महिपतींच्या या भावकाव्याला आपण रचना म्हणतो पण

खुद्द महिपतींनाच आपण हे लिहिले नसून पांडुरंगानेच लिहून घेतले असे वाटते. ते म्हणतात–

**जो दीन दयाळ करूणाकर । अक्षय अभंग रुक्मिणीवर ।**
**तो महिपतीचे बसवोनि अंतर । वदवीत चरित्र संतांचे ।।**

महिपतींचा काळ हा खरं तर 'पंडितकवींचा काळ' आहे. पांडित्याचे प्रदर्शन हा त्यावेळच्या कवीचा मुख्य भाव होता. कविता पांडित्याच्या ओझ्याने शुष्क–निर्जीव होत होती. अक्षरगणवृत्ते यांची बंधने व यमक–अनुप्रासाची अनाठायी हौस यामुळे कविता अधिक कृत्रिम झालेली होती. अशा काळात कवी श्रीधर नाझरेकर व महिपती हेच दोघे असे कवी होते की, ज्यांच्या काव्यात रसाळपणा, सुबोधपणा व प्रसाद्गुण होता. हा प्रसादगुण व रसाळपणा पंढरीच्या भक्तीतूनच त्यांना लाभला होता. स्वत: महिपती म्हणतात –

**म्हणाल तितबुद्धीने त्वरित । आपुले मतीने रचिला ग्रंथ ।**
**तरी तैसे नव्हे जी निश्चित । विकल्प चित्ती न धरावा ।**
**श्री भीमातीरवासी रुक्मिणीरमण । तेणे दिधले आश्वासन ।**
**ग्रंथ प्राकृत वदविला गहन । तो परिसा सज्जन प्रीतीने ।।**

या वरील ओळीमध्येही 'भीमातीर वासी रुक्मिणीरमण' विशेषणाने महिपती विठ्ठलाला आपल्या काव्याचे श्रेय देतात.

**जैसे तृणाचे बुझावणे । हालत असे वायुगणे ।**
**त्याचे अंगी कर्तेपण । स्वतंत्र की होत असेल ?।।**
**तेवी तू अंतरसाक्ष चैतन्यघन । बुद्धिप्रेरक जगजीवन ।**
**हृदयी निरंतर बैसोन । देई आठवण मज देवा ।।**

असे महिपती विठ्ठलाला 'अंतरसाक्ष चैतन्यघन', 'बुद्धिप्रेरक जगजीवन' म्हणतात व चरित्रग्रंथाचे कर्तेपण विठ्ठल चरणी अर्पण करतात.

महिपतींनी 'कथासारामृत' नावाचाही एक ग्रंथ रचला असून त्यात अनेक व्रते व व्रतकथा वर्णिलेल्या आहेत. पद्मपुराण व स्कंदपुराण या पुराणातील कथांचा आधार त्यांनी घेतलेला आहे. हा ग्रंथ श्रावण शुद्ध पंचमी शके १६८७ रोजी पूर्ण झाला. या ग्रंथाचे श्रेयही महिपतींनी विठ्ठलास दिलेले आहे.

**पंढरीनाथे । स्वये आज्ञापिले माते ।**
**की निवडूनिया विष्णुप्रते । ग्रंथ प्राकृत निर्मावा ।।**

असा ग्रंथ निर्मितीचा हेतू– प्रेरणा कथन करणाऱ्या काही ओव्या या ग्रंथात असून 'पंढरीनाथाची आज्ञा' झाल्यामुळे मी हा ग्रंथ लिहिला असे महिपतींनी प्रांजळपणे कथन केले आहे.

'पांडुरंग महात्म्य' हा १२ अध्यायाचा ग्रंथ महिपींनी शिवपार्वती संवादरूपाने लिहिला आहे. ही शिवपार्वती संवादाची कल्पना महिपतींना ज्ञानेश्वरीतून सुचली असावी. भगवद्गीतेचे अगाध, अनंत महात्म्य सांगताना संत ज्ञानदेव ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायाच्या प्रारंभीक ओव्यात म्हणतात –

**इथे गीतेची थोरी । स्वये शंभू विवरी ।**
**जेथ भवानी प्रश्नु करी । चमत्कारोनि ।।**
**तेथ हरू म्हणे नेणिजे । देवी जैसा का स्वरूप तुझे ।**
**तैसे नित्यनूतन देखिजे । गीतातत्त्व ।। (ज्ञा. १/७०–७१)**

मूळ गीतेमध्ये असा शिवपार्वतीचा संवाद नाही. पण ज्ञानदेवांनी आपल्या कल्पनेने या संवादाची भर घातलेली आहे. तीच कल्पना महिपतींनी योजलेली आहे. पंढरी महात्म्य अनेकांनी गायलेले आहे. पण भगवान शंकर पार्वतीला पंढरी महात्म्य सांगतात हे भाविकांना अधिक भावणारे ठरेल. या भावनेपोटी महिपतींनी पांडुरंग महात्म्याची रचना शिवपार्वती संवादरूपात केली असावी.

वृद्धावस्थेत पंढरीच्या वारीला घोड्यावरुन जाताना महिपती एका गावात खाली पडतात. त्यांना जबर मार लागून बेशुद्ध होतात. काही ग्रामस्थ त्यांच्या मदतीला धाऊन येतात. महिपतींना एक पाऊल टाकणेही अशक्य असते. ते ग्रामस्थ डोली करुन महिपतींना त्यांच्या घरी पोचवितात. ही सारी करूण कहाणी महिपतींनी एका सविस्तर पत्राने पांडुरंगास कळविली आहे. हे १० कडव्यांचे प्रदीर्घ पत्र मुळातूनच वाचण्यासारखे आहे. महिपती त्या पत्रात लिहितात –

**त्रितापाचे विस्तार किती । पत्री लिहावे तुजप्रति ।**
**तरी शरीरी नाही शक्ती । लेखणी हाती धरवेना ।।७।।**

हे पत्र लिहिले तेव्हा महिपती ७३–७४ वर्षांचे असावेत असे दिसते. त्यांनी पुढे याच पत्रात आता चिरविश्रांती मिळावी अशीही आर्त विनवणी केलेली आहे.

**आता शेवटील हेत आहे साचा ।**
**संबंध तोडी या देहाचा ।**
**ठाव इच्छितसे पायाचा ।**
**आणीक वाचा न बोले ।।९।।**
**मागे भक्तासि पावलासी अंती ।**
**ते यथार्थ करी रुक्मिणीपती ।**
**दासानुदास महिपती ।**
**सेवेसी विनंती करीत ।।१०।।**

महिपतींनी विठ्ठलाबद्दल वेळोवेळी लिहिले तसेच त्यांनी आयाचित वृत्तीने ताहाराबाद येथे विठ्ठलमंदिरही बांधलेले आहे. अशा या निष्ठावान विठ्ठलभक्तास कोटी कोटी प्रणाम !

प्राचार्य डॉ. रमेश आवलगावकर
८, अनीश प्रासाद, भटांचा बोळ,
४३७अ/२, नारायण पेठ,
पुणे-४११०३०.
भ्र. ९९२१९२६८३१

# संत महिपती ताहाराबादकर : चरित्र आणि साहित्य

संत चरित्रकार म्हणून मराठी वाङ्मयाच्या इतिहासात संतश्रेष्ठ महिपती ताहाराबादकरांचे स्थान अबाधित आहे. त्यांच्याइतकी संतचरित्रे मराठी साहित्यात तरी आजपर्यंत कोणी लिहिली नसतील. महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील एकूण २८४ संतांची चरित्रे लिहिण्याचा मान त्यांच्याकडे जातो. संतांची चरित्रे वर्णन करणे हाच आपला जीवनहेतू आहे हे त्यांच्या

न लगे भुक्ती न लगे मुक्ती ।
मागत नाही धनसंपत्ती ।
तुझ्या दासांची वर्णिन किर्ती ।
ऐसे श्रीपती करावे ॥

या भक्तलीलामृतातील वचनावरून लक्षात येते. महीपतींचा जन्मच केवळ संतचरित्र वर्णन करण्यासाठी झाला होता असे म्हटल्यास वावगे होऊ नये. ईश्वराचे गुण-संकीर्तन करणे, संतांची महिमा वर्णन करणे हा मध्ययुगातील मराठी साहित्याचा एक महत्वपूर्ण विशेष आहे. मराठीतील आद्य चरित्रग्रंथ म्हणून ज्याचा गौरव केला जातो, त्या लीळाचरित्राची निर्मितीही याच हेतूने झाली. परमेश्वरावताराची लीळारूप भक्ती पुढील पिढीला करता यावी यासाठी लीळाचरित्र लिहिले गेले. याबद्दलचे स्पष्ट उल्लेख स्मृतिस्थळादी ग्रंथांतून पाहावयास मिळतात नामदेवांच्या आदी, तीर्थावळी व समाधी या ज्ञानेश्वरात्मक प्रकरणांचाही हाच हेतू आहे, हे आपल्याला त्यातील आशयावरून पाहावयास मिळते. एकूण संतांच्या साहित्यातून आपल्याला ईश्वराचे व भक्तांचे गुणमहिमानच पाहावयास मिळते.

संत महिपतींची प्रेरणा यापेक्षा वेगळी नाही आणि हे त्यांच्या समग्र साहित्याचा आढावा घेतल्यास आपल्या लक्षात येते. निव्वळ भक्तीची प्रेरणा आहे. म्हणून मध्ययुगीन मराठी साहित्याचे मूल्य कमी होत नाही. कोणतेही साहित्य त्या त्या काळाचे पिंडभान हेरूनच जन्माला येत असते. या गोष्टीचा विचार केला तर महिपतींच्या काय वा समग्र संत-साहित्याच्या काय, निर्मिती-कक्षा लक्षात घेणे महत्त्वाचे ठरेल. संतांच्या काही कलाकृती वगळता संतसाहित्याला निखळ वाङ्मयीन गुणवत्तेच्या कसोट्या लावून त्या साहित्याचे परिशीलन करतो म्हटले तर ते शक्य होणार नाही. महिपतीचे साहित्यही याला अपवाद नाही.

**जीवनचरित्र :**

संतचरित्रलेखन हेच आपल्या आत्मोद्धाराचे माध्यम समजणाऱ्या महिपतींचा जन्म इ.स. १७१५ साली ताहाराबाद येथे झाला. ताहाराबाद हे गाव नगर जिल्ह्यातील राहुल तालुक्यात येते. महिपतींचे वडील कांबळे हे मुळचे सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढ्याचे. ताहराबाद हे त्यांच्या सासुरवाडीचे गाव. विठ्ठलपंत कुलकर्णी यांची मुलगी सरस्वतीबाई हिचा विवाह दादोपंतांशी झाला. दादोपंतांच्या पत्नीचे नाव सरस्वतीबाई नसून गंगाबाई होते, असे म्हटले जाते; परंतु ते बरोबर नाही. गंगाबाई हे महिपतींच्या धर्मपत्नीचे नाव होते. दादोपंतांना जवळचे आप्तस्वकीय कोणीच नसल्यामुळे ते आपल्या सासुरवाडीला आले व तेथेच स्थित झाले.

ताहाराबादचे मूळ नाव वर्जुवाडी होते, असे म्हटले जाते. पुढे छत्रपती राजाराम महाराजांच्या पत्नी ताराबाई पतीच्या मृत्यूनंतर काही दिवसांसाठी वर्जुवाडीला आल्या होत्या. त्यांच्या तेथील मुक्कामाने हे गाव आबाद झाले म्हणजे समृद्ध झाले म्हणून या गावाचे नाव ताहाराबाद पडले व पुढे ते ताहाराबाद म्हणून रूढ झाले. परंतु याला कोणताच ऐतिहासिक पुरावा नाही. ताहाराबादला एक फार मोठी गढी आहे. तेथे ताराबाईंचा मुक्काम होता असेही सांगितले जाते. परंतु तसे अनुमान काढण्यास कोणताच पुरावा उपलब्ध नाही. उलट ताहाराबाद यावरून ते ते गाव एखाद्या मुसलमान सरदाराच्या अमलाखाली असावे व ताहीर नावाचा कोणी मुसलमान जहागीरदार तेथे राहत असावा व त्याच्या नावावरूनच या गावाचे नाव ताहिराबाद-ताहाराबाद पडले असावे. जसे हैदरवरून हैदराबाद; दौलतवरून दौलताबाद, अहमदवरुन अहमदनगर तसे ताहिरवरून ताहिराबाद - ताहाराबाद असे नामकरण झाले असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

महिपतीबुवांचे वडील दादोपंत पांडुरंगाचे निष्ठावंत भक्त होते. नियमितपणे दर महिन्याच्या शुद्ध एकादशीला ते पंढरपूरला जात असत. म्हातारपण आले तरी दादोपंतांना मूलबाळ नव्हते. नित्यनेमाने पंढरीला जाणारा आपला वारस कोणीच नाही, या चिंतेने ते व्यथित झाले होते. तशी त्यांनी विठ्ठलाजवळ आराधना केली. पांडुरंगाने प्रसन्न होऊन त्यांना स्वप्नातच प्रसाद म्हणून पेढा दिला. तो पेढा

पांडुरंगाने पत्नीस देण्याची आज्ञा केली. दादोपंत जागे होऊन पाहतात तो पेढा त्यांच्या हातातच होता. ताहाराबादी येऊन त्यांनी तो पेढा आपल्या पत्नीस खावयास दिला. त्यानंतर सरस्वतीबाईंना जे पुत्ररत्न झाले, तेच महिपतीबुवा होत. महिपतींचा जन्म श्रावणवद्य द्वादशीला दुपारी बारा वाजता झाला.

महिपतीबुवांचे उपनाम कांबळे होते. ते देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण असून त्यांचे गोत्र वसिष्ठ होते. महिपतींचे शिक्षणही झाले होते. कथासारामृत या ग्रंथावरून त्यांचे संस्कृतचे ज्ञान चांगले होते, हे लक्षात येते. वाचन पंडित, मोरोपंत यांच्यासारखे ते प्रकांड पंडित नसतीलही; परंतु संस्कृत भाषेचे ते चांगले जाणकार होते, हे लक्षात येते. त्यांचे प्राकृत साहित्याचे वाचनही चांगले होते हेही त्यांच्या साहित्यावरुन पाहवयास मिळते.

दादोपंतांकडे कुलकर्णीपणाची वृत्ती होती. त्यांच्या अपरोक्ष वयाच्या सोळाव्या वर्षापासूनच महिपती ही वृत्ती चालवू लागले. जोशीपणही त्यांचेकडेच होते. ताहाराबाद एक मुसलमान जहागीरीचा गाव होता व त्याच्या कचेरीत महिपतींना नित्यनेमाने जावे लागत असायचे. एकदा त्यांना जहांगीर'कडून बोलावणे आले. त्यावेळी ते पूजा करीत होते. पूजा आटोपताच येतो, म्हणून त्यांनी निरोप पाठविला. निरोप घेऊन येणारा पुन: दोनदा आला. त्यावेळीही त्यांनी तेच सांगितले. तेव्हा निरोप आणणाराच महिपतींना अद्वातद्वा बोलला. महिपती निमूटपणे कचेरीत गेले. कार्य उरकून ते घरी परत आले व त्यांनी आपली लेखणी पांडुरंगाच्या चरणी अर्पण केली आणि पुढे नोकरी करावयाची नाही, अशी प्रतिज्ञा केली. महिपतींनी केलेली प्रतिज्ञा आजही ताहाराबाद येथे असलेले त्यांचे वंशज तंतोतंत पाळतात. हे सर्व लोक अजूनही केवळ भजन, कीर्तन करूनच आपला उदरनिर्वाह भागवितात.

महिपतीबुवांना श्रीमंत बाजीराव पेशवे यांच्याकडून व त्यांच्या सरदारांकडून काही जमीन व वतने वगैरे इनामे मिळाली होती. तत्संबंधीच्या काही सनदा श्री. वि. ल. भावे यांनी महिपतीबुवांच्या वंशजाजवळ इ.स. १८९४ साली पाहिल्याचे त्यांनी महाराष्ट्र सारस्वतात नमूद केले आहे. (पृ. ४८० तळटीप); परंतु त्यांनी विस्तारभयास्तव त्यातील तपशील दिलेला नाही. महिपतींच्या पिढीतील सातवे वंशज विद्यमान श्री पांडुरंगबुवा यांच्याजवळ एक एकर जमीन असल्याचे सांगितले. आता तीही त्यांनी महिपतीबुवांच्या मंदीरास अर्पण केलेली आहे.

**संत तुकाराम हेच गुरु :**

सरकारी नोकरी गेल्यावर महिपतींचा बराच काळ ईश्वर चिंतनात जाऊ लागला. याच वेळी त्यांच्या स्वप्नात तुकाराम महाराज आले आणि त्यांना दृष्टांत दिला व तू आता संतांची चरित्रे लिहावीस अशी आज्ञा दिली. त्यावेळेपासून एक वेगळेच दैवी तेज महिपतींच्या चेहऱ्यावर झळकू लागले. तुकाराम आपल्याला गुरू म्हणून लाभल्याचा उल्लेख त्यांनी भक्तविजयात केलेला आहे.

**नमू सद्गुरु तुकाराम ।**
**जेणे निरसिला भवक्रम ।**
**आपुले नामी देऊनी प्रेम ।**
**भवबंधन निरसिले ।। (१.३)**

तर संतलीलामृतात म्हणतात,

**सद्गुरु तुकाराम समर्थ ।**
**अंतराक्ष चैतन्यनाथ ।**
**तेणे होवोनी हृदयस्थ ।**
**आठव माते दीधला ।। (३५.१०९)**

कथासारामृतातही संत तुकारामांचा उल्लेख आंतरसाक्षचैतन्यनाथ म्हणूनच केलेला आहे. महिपतींचेच समकालीन संत निळोबाराय यांनाही संत तुकारामांचाच अनुग्रह होता. तुकापंचायतनात पुढील पाचांचा समावेश होतो. तुका–बहिणाबाई–निळोबा–कचेश्वर–महिपती. यापैकी संत निळोबा यांचेही बरेच साहित्य उपलब्ध आहे. या पंचायननात संत तुकारामांनंतर निळोबा राय व संत महिपतीच साहित्यसेवेच्या संदर्भात अजरामर झालेत.

महिपतींनी इ.स. १७९० मध्ये वयाच्या ७५ व्या वर्षी श्रावण वद्य द्वादशीस ताहाराबाद येथे समाधी घेतली. आषाढ वद्य त्रयोदशींला येथे फार मोठी यात्रा भरते. जवळ जवळ ७ ते ८ हजार लोकांचा समुदाय येथे जमत असतो. जेथे महिपतींची समाधी आहे, त्या समाधीच्या डाव्या बाजूला त्यांचे थोरले चिरंजीव विठ्ठलबुवांची समाधी आहे आणि महाराजांच्याच उजव्या बाजूला त्यांचे धाकटे चिरंजीव नारायणबुवांची समाधी आहे. नारायणबुवांच्या उजव्या बाजूला त्यांचे चिरंजीव सीतारामबुवांची समाधी आहे आणि सीतारामबुवांच्या अगदी समोर त्यांचे पुत्र रंगनाथबुवांची समाधी आहे. म्हणजे महिपती महाराज, त्यांची दोन मुले, नातू व पणतू अशी पाच समाधीस्थाने तेथे आहेत. ताहराबाद येथे महिपतींच्या नावे एक ट्रस्ट उभारून जवळ जवळ १० लाख रु. खर्च करून एक भव्य व सुंदर मंदीर बांधले आहे आणि संत महिपती महाराज ट्रस्टचे अध्यक्ष ह.भ.प. रावसाहेब साबळे पाटील रामपूरकर व चिटणीस श्री. भाऊसाहेब किंकर यांचे सहकारी यांचे प्रेरणास्थान आहे.

**अनेक महिपतीबुवा :** मराठी वाङ्मयाच्या इतिहासात आपल्याला एकूण पाच महिपती पाहवयास मिळतात. एक नरहरी महिपतीबुवा नावाचे महत्वाचे संतकवी होऊन गेलेत. उद्बोध–केसरीनाथ–शिवदिनकेसरी–नरहरी–महिपती अशी त्यांची गुरुपरंपरा असून त्यांची उत्तर हिंदुस्थानात बरीच ख्याती आहे. पदे, कडाका, कटाव,

लावण्या इत्यादी साहित्य त्यांनी लिहिलेले आहे. आपल्या काव्यात ते नरहरी महिपती असा उल्लेख करतात. हे जनार्दनस्वामींचे वंशज असून ते पैठणहून बडोद्यास राहावयास गेले होते. तेथून पुढे ते इंदौरला गेले. पुढे यशवंतराव होळकर यांनी त्यांचा अनुग्रह घेतल्याचे सांगितले आहे. इंदौरहून उज्जैन व तेथून दौलतराव शिंदे यांच्या विनंतीवरुन ते ग्वाल्हेरला गेले. तेथे त्यांचे बरेच साहित्यलेखन झाले. ग्वाल्हेरी भाषेतही त्यांचे साहित्य आहे.

महिपती करवंडळी हा एक कन्नड कवी होऊन गेला. महिपतीबुवा ढोलीनाथ नावाचेही एक संतकवी होऊन गेले. ३८८ ओव्यांचे शनिमाहात्म्य लिहिणारे तात्याजी महिपतीही अलीकडे होऊन गेलेत; परंतू या सर्व महिपतींमध्ये महिपती कांबळे ताहराबादकर यांचे स्थान संत व कवी म्हणून वेगळे आहे, हे सांगण्याची गरज नाही.

**साहित्यिक कार्य :**

तुकारामबुवांचा वरदहस्त लाभल्यावर महिपतीबुवांनी संतचरित्र लेखन करणे हेच आपले ध्येय ठरविले आणि या निर्मितीमागील श्रेयही त्यांनी परमेश्वरालाच दिल्याचे दाखले त्यांच्या साहित्यात आपल्याला पाहावयास मिळतात. त्यांनी ४०,००० च्या जवळपास ओवीसंख्या लिहिली. त्यांची एकूण ग्रंथसंख्या १५ एवढी भरते. शिवाय यापेक्षाही आणखी काही ग्रंथसंपदा त्यांच्या नावावर मोडली जाते; परंतु ती ग्राह्य धरली जात नाही.

या संपदेपैकी बरीचशी साहित्यसंपदा अजूनही प्रकाशित व्हावयाची आहे.

वर दिलेल्या १५ रचनांपैकी पहिल्या सहा रचना महत्त्वाच्या असून बाकीच्या किरकोळ स्वरूपाच्या आहेत. श्री. वि. ल. भावे यांनी महिपतींचे पांडुरंगस्तोत्र, काही ओव्या व महिपतींनी पांडुरंगास लिहिलेले पत्र सारस्वतात प्रसिद्ध केलेले आहे. (पृ. ४८५, ४८७) एक कथासारामृत ग्रंथ सोडला तर भक्तविजय, संत लीलामृत, भक्तलीलामृत व संतविजय हे चारही ग्रंथ संतचरित्राला वाहिलेले आहेत. जयदेव, तुलशीदास, नामदेव, कबीर, कमाल, ज्ञानेश्वर, कूर्मदास, सावता माळी, राका कुंभार, गोरा कुंभार, विसोबा खेचर, परिसा भागवत, जगमित्र नागा, नरहरी सोनार, जनाबाई, चांगदेव, चोखामेळा, रोहिदास, नरसी मेहता, रामदास डाकुरकर, निराधारी ब्रह्मचारी, सूरदास, सेना न्हावी. राजा सात्विक, कर्माबाई, जनजसवंत, मीराबाई, शांतब्राह्मणी, भानुदास, बहिरंभट, एकनाथ, रामदास, तुकाराम इत्यादींपासून ते संतोबा पवार, निळोबाराय पर्यंत अनेक संतांची चरित्रे भक्तविजयात पाहवयास मिळतात. तर भक्तलीलामृतात नाभाजी, चांगदेव, रोहिदास, एकनाथ, तुकाराम, केशवाचारी, बाजीद पठाण, संतोबा पवार, मालोपंत, प्रेमाबाई, शिळाबाई, नरपाळ राजा, रामचंद्रभट, सुहागशा, पन्हाजी राजपूत, सुखानंद ब्राह्मण, सजन कसाई, अंगद बंधू, काजी महंमद, बलख बुखारी, शेख फरीद, माधवदास सुरतकर, नरसिंह सरस्वती, निरंजन स्वामी, जयरामस्वामी वडगावकर, माणकोजी पाटील, मध्वनाथ इत्यादी संतांचा समावेश आहे. संतलीला-मृतात गोपीचंद, गोरक्षनाथ, भर्तृहरी, मत्स्येंद्रनाथ, नामदेव, ज्ञानेश्वर, नागनाथ, विठ्ठलदास, देवमुरार, जयमल्ल, परशराम, वल्लभदास इत्यादींची जीवनचरित्रे ओघवती भाषेत निरूपण केली आहेत.

**महिपतीबुवांच्या नावावर मोडली जाणारी ग्रंथसंपदा पुढीलप्रमाणे –**

| ग्रंथनाम | अध्याय | ओवीसंख्या | रचनाकाल |
|---|---|---|---|
| १) श्रीभक्तविजय | ५७ | ९९१६ | इ.स. १७६२ |
| २) श्रीकथासारामृत | ३६ | ७२०० | इ.स. १७६५ |
| ३) संतलीलामृत | ३५ | ५३५९ | इ.स. १७६७ |
| ४) भक्तलीलामृत | ५१ | १०७९४ | इ.स. १७७४ |
| ५) श्रीसंतविजय | २६ | ४६२८ | इ.स. १७७४ |
| ६) श्रीपंढरीमाहात्म्य | १२ | -- | -- |
| ७) श्रीअनंतव्रत कथा | -- | १८६ | -- |
| ८) श्रीदत्तात्रेय जन्म | -- | ११२ | -- |
| ९) श्रीतुलसीमाहात्म्य | ५ | ७६३ | -- |
| १०) श्रीगणेशपुराण | ४ | ३०४ | -- |
| ११) श्रीपांडुरंगस्तोत्र | -- | १०८ | -- |
| १२) श्रीमुक्ताभरणव्रत | -- | १०१ | -- |
| १३) श्रीऋषिपंचमीव्रत | -- | १४२ | -- |
| १४) अपराधनिवेदनस्तोत्र | -- | १०१ | -- |
| १५) स्फुट अभंग व पदे | -- | -- | -- |

चतुरस्त्र
परखड
रास्त
कर्तव्यदक्ष

भागवताचार्य वा. ना. उत्पात
पंढरपूर, जि. सोलापूर
भ्र. ९४२२६४७५०७

# नीती व भक्तींचा मार्ग दाखविणारे संतकवी

*ताहाराबाद ही मुसलमानांची जहागीर होती. एके दिवशी जहागीरदाराचे बोलावणे आले. महिपती स्नान संध्यादि नित्यकर्मात गुंतले होते. ''स्नानसंध्या आटोपून येतो'', असा त्यांनी निरोप पाठविला. पण निरोप आला ''असेल तसे या.'' त्याप्रमाणे ते कचेरीत गेले. तेथील काम केले व त्यांनी नोकरीला राम राम ठोकला. जहागीरदाराची गुलामी सोडली व लेखणी विठ्ठलचरणी वाहिली.*

**संतचरित्री ज्याचा प्रेमा जडला अनिवार ।**
**तो हा महिपती आला साधु ताहराबादकर ।।**

संतकवी महिपती यांचेच अवतार संतकवी दासगणु महाराज यांनी महिपतींचा गौरव वरीलप्रमाणे केला आहे. दासगणु परंपरेत रोजच्या स्तवनात संत कवी महिपतींचा उल्लेख असतो. महिपती हे संत असून कवी होते. संतचरित्रे गाणारे कवी होते. राजाचा कवी जसा राजकवी तसे ते संतांचे कवी म्हणून संतकवी होते.

नाथांनी म्हटले आहे,

**सगुण चरित्रे परम पवित्रे सादर वर्णावी ।**
**सज्जनवृंदे मनोभावे आधी वंदावी ।।**

संत म्हणजे परमेश्वराचे सगुणरूप आहे. म्हणून सगुण चरित्रे म्हणजे संतचरित्रे होत. त्याचे वर्णन करणारे पहिले कवी म्हणजे संत नामदेव, त्यानंतर श्रीधर स्वामी नाझरेकर, कवी महिपती, दासगणु महाराज इत्यादी महाकवींनी आपली प्रतिभा संतचरणी वाहिली. त्यात संतकवी महिपती यांचे स्थान महत्त्वाचे आहे.

कवी महिपतींचा काळ १७१५ ते १७९० असा आहे. नगर जिल्ह्यातील ताहाराबाद हे त्यांचे जन्मगाव. ते देशस्थ ऋग्वेदी वसिष्ठगोत्री ब्राह्मण होते. त्यांचे मूळ आडनाव कांबळे होते. त्यांच्या वडिलांचे नाव दासोपंत व आईचे नाव गंगाबाई होते. त्यांच्या घरात पंढरीची वारी परंपरेने होती. बराच काळ त्यांना पुत्रसंतान झाले नाही. त्यांनी पांडुरंगाला नवस केला व त्यांना वयाची साठी उलटल्यावर पुत्र झाला. त्याचे नाव ठेवले महिपती. तो सुदृढ व सुंदर होता. ताहाराबाद खेडे असल्याने शिक्षणाची काहीच व्यवस्था झाली नाही. ते स्वतःच म्हणतात.

**म्यां नाही पाहिला अमरकोश । गीर्वाण भाषा तीहि निःशेष ।**
**नानापुराणे विशेष । श्रवण सायासे न केली की ।।**

तरीपण संस्कृत भाषा थोडी शिकले. गोरोबा जांभेकर नावाच्या एका सत्पुरुषाकडे त्यांचे शिक्षण झाले. ते गुजराती, कानडी, हिंदी या भाषाही शिकले. त्यांचे हस्ताक्षरही चांगले होते.

वडिलांबरोबर ते पंढरीची वारी करु लागले. त्यांच्या सोळाव्या वर्षी त्यांचे वडील वारले. संसाराचा भार त्यांच्यावर पडला. चरितार्थासाठी त्यांनी कुलकर्णीपणाची वृत्ती स्वीकारली. ताहाराबाद ही मुसलमानांची जहागीर होती. एके दिवशी जहागीरदाराचे बोलावणे आले. महिपती स्नान संध्यादि नित्यकर्मात गुंतले होते. ''स्नानसंध्या



आटोपून येतो'', असा त्यांनी निरोप पाठविला. पण निरोप आला ''असेल तसे या.'' त्याप्रमाणे ते कचेरीत गेले. तेथील काम केले व त्यांनी नोकरीला राम राम ठोकला. जहागीरदाराची गुलामी सोडली व लेखणी विठ्ठलचरणी वाहिली. ते भजनपूजनाच्या मार्गी लागले. ''आपल्या वंशात सात पिढ्या कोणीही सरकारी नोकरी करू नये. केल्यास तो निपुत्रिक राहील.'' असेही त्यांनी सांगितले. ते वचन चार पिढ्या पाळले गेले. त्यांनी संतचरित्रांचा अभ्यास सुरु केला. त्यांच्या ठायी उपजतच प्रतिभा होती. अभ्यासानी ती अंकुरित होऊ लागली.

संत चरित्रांचा सतत ध्यास घेतला. तो विचार करत असता त्यांना तुकाराम महाराजांचा स्वप्नदृष्टान्त झाला, ''तू संतचरित्रे वर्णन कर.'' मग त्यांनी संतचरित्राचे वाचन केले. नाभाजी, उद्धव चिद्घन यांनी लिहिलेली चरित्रे त्यांनी वाचली व भक्तविजय ग्रंथ लिहिण्यास प्रारंभ केला. पुढे इतरही संत चरित्रे त्यांनी अभ्यासली. त्यात नाभाजीच्या संतचरित्रापेक्षा खूपच अधिक माहिती मिळाली. संतचरित्रे हा त्यांच्या जीवनाचा ध्यास झाला. 'अहो येता जाता उठत असता घास गिळता' संतचरित्राशिवाय काही सुचेना. ध्यानी, मनी, स्वप्नी, जागृती संतांच्या जीवनातील प्रसंग दिसू लागले. त्यांनी ते आपल्या लेखणीतून रसाळ ओव्यातून शब्दांकित केले. त्यांनी लिहिलेल्या चरित्रात संत तुकाराम चरित्र सर्वात सरस आहे.

**अफाट ग्रंथ कर्तृत्व :**

त्यांनी नामदेव, ज्ञानदेव, तुकाराम, बोधलेबुवा, गणेशनाथ उद्धव, चिद्घन, विसोबा खेचर अशा अनेक संतांची रसाळ चरित्रे वर्णन केली आहेत. 'भक्तविजय' हा त्यांचा ग्रंथ फारच वेधक, भक्तिरसाने परिपूर्ण व माहितीने भरलेला आहे. त्यात ५७ अध्याय असून ९९१६ ओव्या आहेत.

त्यानंतर त्यांनी 'कथा सारामृत' हा ग्रंथ लिहिला. त्यात कित्येक व्रते व त्या व्रतांच्या कथा वर्णन केल्या आहेत. त्यासाठी त्यांनी पद्मपुराण व स्कंदपुराण या ग्रंथांचा आधार घेतला आहे. या ग्रंथांच्या ओव्या ७२०० आहेत.

'पांडुरंग माहात्म्य' हा ग्रंथ त्यांनी लिहिला. त्यात शिवपार्वतीच्या संवादातून पंढरपूर, त्याच्या परिसरातील मंदीरे, क्षेत्रस्थळे, चंद्रभागा याविषयीच्या कथा रसाळपणे व मनोवेधक पद्धतीने सांगितल्या आहेत. याचे १२ अध्याय आहेत.

त्यानंतर त्यांच्या 'भक्तलीलामृत' ग्रंथात ५१ अध्याय असून १०,७९४ ओव्या आहेत. 'संतलीलामृत' या ग्रंथात ३५ अध्याय असून ५२५९ ओव्या आहेत. तो ग्रंथ अपूर्ण आहे. त्यांचा अजून एक ग्रंथ म्हणजे संत विजय. त्यात ३६ अध्याय आहेत व ओवीसंख्या ४६२८ आहे.

याशिवाय महीपतींनी काही स्फुट प्रकरणे लिहिली आहेत. ती पुढीलप्रमाणे – १) पंढरी माहात्म्य, २) अनंतव्रतकथा, ३) दत्तात्रय जन्म, ४) तुळशी माहात्म्य, ५) गणेशपुराण, ६) पांडुरंगस्तोत्र, ७) मुक्ताभरणकथा, ८) ऋषिपंचमी माहात्म्य, ९) अपराध निवेदन स्तोत्र.

याशिवाय त्यांनी अनेक अभंग, आरत्या, पदे, सारांश ज्ञानेश्वरी इत्यादी साहित्य लिहिले आहे. ते अप्रकाशित आहे.

**कठीण प्रसंग :**

वृद्धावस्थेमध्ये सुद्धा ते पंढरीची वारी चुकवीत नसत. पंढरपुरला जात असताना त्यांच्यावर एक प्रसंग गुदरला. त्याची हकीकत त्यांनी पत्र लिहून पांडुरंगाला कळविली.

**जय जय श्रीराब्धिवासा अनंता । अनंतशायी मायातीता ।**
**भक्तवत्सल पंढरीनाथा । रुक्मिणीकांता श्री विठ्ठला ।।१।।**
**सेवेसी विज्ञापना ऐसी । येत होतो पंढरीशी ।**
**पाच कोस प्रथम दिवशी । नांदुरग्रामी पातलो ।।२।।**
**एक रात्र करमोनि तेथ । प्रात:काळी उठलो त्वरित ।**
**तो अश्वावरोनि अकस्मात । ग्रामद्वारात पडियेलो ।।३।।**
**तेथे देह दु:खे करुन । विकल मूर्च्छित पडलो जाण ।**
**तो नामधारक यात्रेतून । आला धावून सन्निध ।।४।।**
**त्यांनी संमुखिता मजकारणे । यास्तव देही परतले प्राण ।।**
**चित्तास प्रचीति आली गहन । अगाध महिमान संताचे ।।५।।**
**मग आप्तमित्रविषयाही । डोली करोनि आणिले गांवी ।**
**परी चित्तवृत्ती विठाबाई । तुझेपायी लागली ।।६।।**
**त्रितापाचे विस्तार किती । पत्री लिहावे तुजप्रती ।**
**तरी शरीरी नाही शक्ती । लेखणी हाती धरवेना ।।७।।**
**अंतरसाक्ष चैतन्यघन । जाणशी जिवाची निज खूण ।**
**पत्री मी आर्त म्हणवोन । तुजकारणे लिहिले ।।८।।**
**आता शेवटील हेत आहे साधा । संबंध तोडी या देहाचा ।**
**ठाव इच्छितसे पायाचा । आणिक वाचा न बोले ।।९।।**
**मागे भक्तासी पावलासी अंती । ते यथार्थ करी रुक्मिणीपती।**
**दासानुदास महिपती । सेवेसी विनंती करीत ।।१०।।**

महिपतींनी पांडुरंगाला लिहिलेले हे पत्र म्हणजे आर्त भक्तीचा हुंकार आहे. आर्त म्हणजे संकटात सापडलेला भक्त, गजेन्द्र आर्त भक्त नरकापासून सोडविण्यासाठी भगवंताला हाक मारीत होता. तसे महिपती पंढरपूरला वारीला जात होते. नांदूर गावी आले. दुसरे दिवशी निघाले. घोड्यावरून पडले. बेशुद्ध झाले. कोणी एक वारकरी आला. त्याने फुंकर घातली व प्राण परत आला. मग मित्र नातेवाईक आले. त्यांना डोली करून गावी नेले. आपल्याला विठ्ठलानेच वाचविले. ते

भगवंताला प्रार्थू लागले, "विठ्ठला, चित्तवृत्ती तुझे पायी ठेवली आहे. त्रितापाचे आघात या देहाने किती सोसावेत? ते या पत्रात किती लिहावेत ? शरीरात शक्ती नाही. इतका क्षीण झालो आहे की हातात लेखणी धरवत नाही. देवा, या देहाचा संबंध तोड. तुझ्या पायाशी ठाव दे. वाचेने आणखी बोलता येत नाही. मागे अंतकाळी जसा भक्तास पावला तसा मला पाव."

महिपतींचे शेवटचे हे मागणे हृदय पिळवटून टाकणारे आहे.

महिपतींच्या पत्नीचे नाव होते सरस्वती. त्यांना विठ्ठल व नारायण असे दोन पुत्र होते. महिपती जेवढे विरक्त होते, तेवढेच उदार होते. एकदा दुष्काळ पडला. त्यावेळी त्यांनी घरावर तुळशीपत्र ठेवले व सर्वकाही गोरगरिबांना दान केले. ते दर तीन वर्षांनी सर्वस्वाचे दान करीत असत.

ताहाराबाद येथे त्यांनी अयाचित वृत्तीने विठ्ठल मंदीर बांधले आहे. १७९० मध्ये त्यांचे निधन झाले. आनंदराव सटवाजी सेकदार यांनी त्यांची समाधी बांधली.

महिपती हे संतांचे कवी होते. मराठी साहित्यात त्यांचे स्थान अवर्णनीय आहे. पूर्वी देवांची चरित्रे गायिली जात. महिपतींनी देवांचे जे मूर्त रूप संत त्यांची चरित्रे गायिली. ज्ञानेश्वर महाराजांनी काव्याचे लक्षण सांगितले आहे.

**वाचे बरवे कवित्व । कवित्वीं रसिकत्व ।**
**रसिकत्वी परतत्त्व । स्पर्शु जैसा ॥**

वाचे मध्ये कवित्व असणे चांगले. कवित्वाला रसाळपणा पाहिजे व रसाळपणाला परतत्त्वाचा स्पर्श पाहिजे. महिपतींच्या कवितेत रसाळपणा व परतत्त्वाचा स्पर्श आहे. त्यांची भक्तचरित्रे भक्तिरसानी ओथंबलेली आहेत. संत चरित्रे गावून त्यांनी समाजाला नीतीचा व भक्तीचा मार्ग दाखविला. त्यांच्या स्मृतीला विनम्र प्रणाम !


# शिवदिग्वीजयाची रोमांचकारी कहाणी !




छत्रपती शिवाजी महाराज आणि
अफजल खान यांच्या संघर्षाचे,
प्रतापगडाच्या युद्धाचे रोमहर्षक वर्णन
करणारी सुप्रसिद्ध साहित्यिक
**उमेश सणस** यांची सर्वोत्कृष्ट
कलाकृती **'शिवप्रताप'**

**पाने : ४२४** **मूल्य : ३४५ रु.**

**चपराक**

'चपराक प्रकाशन'
१६१, अनंत अपार्टमेंट, काळा हौद चौक,
शुक्रवार पेठ, पुणे-४११००२.
भ्रमणध्वनी : ९२२६२२४१३२
Email : info@chaprak.com

रा. चिं. ढेरे
(संत साहित्याचे गाढे अभ्यासक, विचारवंत)
विदिशा, सहकानगर,
तुळशीबागवाले कॉलनी, पुणे - ४११००९.
दूरध्वनी : ०२०-२४२२०२८०

# संतचरित्रकार महिपतींची स्फुट रचना

श्री महिपतीबुवा ताहाराबादकर यांचे नाव महाराष्ट्रात सुविख्यात आहे. प्राचीन मराठी ग्रंथकारांच्या मंडळात 'संतचरित्रकार' म्हणून महिपतींचे स्थान अनन्यसाधारण आहे. साधुसंत ही अध्यात्मज्ञानाने 'चोखडी' बनलेली ईश्वराची 'रूपडी' आहेत, या भूमिकेने महिपतींनी संतचरित्रांचे गायन केले आणि संतचरित्र-गायनाच्या निमित्ताने मराठी भागवत परंपरेच्या गुणविशेषांचेही दर्शन घडविले. त्यामुळे तुकारामोत्तर काळातील नेतृत्वहीन वारकरी संप्रदायाचे भावपोषण करण्याचे भरीव कार्य महिपतींचे संतचरित्रविषयक ग्रंथ करू शकले. संतांच्या जीवनांतील चमत्कारांवर अतिरिक्त भर देणारा भाबडेपणा महिपतींच्या ग्रंथांत भरपूर आहे. ती त्या युगाचीच धारणा होती. या युगसापेक्ष मर्यादेने बद्ध असूनही महिपतींच्या ग्रंथांचे महत्त्व आपण नाकारू शकणार नाही. कारण महिपतींचे हे संतचरित्रपर वाङ्मय निर्माण झाले नसते, तर तुम्ही-आम्ही चिकित्सक लोक संतचरित्रांच्या साधनांपासून सर्वस्वी वंचित राहिलो असतो.

महिपती हे तुकोबांचे स्वप्नोपदिष्ट शिष्य. शके १६३७ ते १७१२ हा त्यांचा जीवनकाल. नगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यात राहुरीपासून सुमारे दहा मैलांवर असलेल्या ताहाराबाद नावाच्या खेड्यात महिपतींचे सर्व जीवन व्यतीत झाले. संतचरित्रांविषयी उत्कट जिज्ञासा बाळगणाऱ्या माझ्यासारख्या अभ्यासकाच्या मनात महिपतीबुवांविषयी नितांत आदरभाव वसत असणे अपरिहार्य आहे. या आदरामुळेच मी माझे मित्र श्री. नाना जोशी यांच्यासह १९६३ च्या प्रारंभी ताहाराबादची यात्रा केली. नगर येथे राहणारे महिपतीबुवांचे सत्प्रवृत्त वंशज श्री. पुरुषोत्तम निंबराज कांबळे यांनी या यात्रेत आमची प्रेमाने साथ केली आणि आम्हांला शक्य ते हार्दिक सहकार्य दिले.

ताहाराबाद येथे महिपतीबुवांचे घर (वंशजांकडून पुनः पुनः दुरुस्त होत आलेले) अजून उभे आहे. या घरातच त्यांच्या उपासनेतील विठ्ठलाचे मंदीर आहे. त्यामुळे या घराला 'देऊळवाडा' असे नाव लाभले आहे. या घरात महिपतींच्या वंशजांची दोनतीन घराणी आजही नांदताहेत. त्यांच्या संग्रही काही ग्रंथसंग्रहही आहे. देऊळवाड्यापासून फर्लांगभर अंतरावर वृक्षांच्या सान्निध्यात महिपतीबुवा, त्यांचे दोन पुत्र विठ्ठल व नारायण, पौत्र गोपाळ आणि प्रपौत्र गंगाधर यांची समाधिवृंदावने आहेत. महिपतीबुवांच्या समाधीवर पुढील दोन ओळी खोदलेल्या आहेत.

आ नं द रा व स
ट वा जि स क दा र

हा आनंदराव सटवाजी शेकदार अंदरसूल गावचा एक महिपती भक्त होय. त्याने ही समाधी बांधली.

वंशजांजवळील संग्रहात महिपतींच्या हातचे ग्रंथ आता उरलेले नसावेत, असे वाटते. वंशजांच्या दृष्टीने विशेष पूज्यता असलेले 'भक्तविजया'चे हस्तलिखित महिपतींच्या हातचे खास नाही. या हस्तलिखिताच्या रुमालात केशव नामक शिष्याने काढलेले महिपतीबुवांचे चित्र आहे. (हे चित्र श्री. भावे यांनी 'महाराष्ट्र-सारस्वता'च्या तृतीय आवृत्तीत छापले आहे.) महिपतीबुवांनी 'भक्तविजय' ज्या चौरंगावर लिहिला तो चौरंग, त्यांच्या पादुका आणि 'भक्तविजया'च्या लेखनाची जागा आजही वंशज दाखवितात. आणखी विशेष म्हणजे महिपतीबुवांचा चष्मा (लाकडी केसमध्ये असलेला) आजही वंशजांच्या संग्रहात सुरक्षित आहे.

महिपतींच्या पित्याचे नाव दादोपंत आणि मातेचे नाव गंगाबाई. त्यांच्या पत्नीचे नाव सरस्वतीबाई. महिपतींना विठ्ठल आणि नारायण असे दोन पुत्र होते. ज्येष्ठ पुत्र विठ्ठलाचा वंशवेल मी 'इंद्रायणी' मासिकात मार्च १९६३ च्या अंकात प्रकाशित केला आहे.

महिपतींच्या प्रचंड ग्रंथसंभारापैकी 'भक्तविजय', 'भक्तलीलामृत', 'संतविजय', 'संतलीलामृत' व 'कथासारामृत' हे ग्रंथ आणि 'दत्तजन्म', 'देहकांडपुराण', 'अपराधनिवेदनस्तोत्र', 'पांडुरंगस्तोत्र' ही प्रकरणे प्रकाशित झालेली आहेत. 'पांडुरंगमाहात्म्य', 'तुळसीमाहात्म्य', 'गणेशपुराण', 'ऋषिपंचमीकथा', 'अनंतचतुर्दशीकथा', 'मुक्ताभरण' ही प्रकरणे आणि अभंगबद्ध संतचरित्रे अजून अप्रकाशित आहेत. 'वरील ग्रंथांशिवाय आणखी एका साधूच्या चरित्रावर त्यांनी एक स्वतंत्र ग्रंथ लिहिला असून, तो खानदेशात एका गृहस्थापाशी आहे, असे समजते,'' असे महाराष्ट्र कविचरित्रकारांनी नोंदवून ठेवले आहे.

महिपतींच्या स्फुट रचनेची गाथा आज ताहाराबादच्या संग्रहात उपलब्ध नाही. असे एक हस्तलिखित कोपरगाव परिसरात एका गृहस्थाजवळ असून, त्यात महिपतींची साडेतीन हजार स्फुटे आहेत, असे वंशजांचे म्हणणे आहे. सध्या उत्सवादी पर्वकालांत आणि नित्योपचारांत वापरण्यासाठी वंशजांनी मुखोद्‌गत केलेली पस्तीसचाळीस स्फुटेच उपलब्ध होऊ शकतात. पुढे दिलेली सर्व स्फुटे श्री. पुरुषोत्तम निंबराज कांबळे, श्री. मुरलीधर गणपती कांबळे, श्री. मधुकर गणपती कांबळे आणि श्री. पांडुरंग जनार्दन कांबळे यांच्याकडून उपलब्ध झालेली आहेत.

श्री. आजगावकरांनी आपल्या महिपतींवरील परिचयलेखात (महाराष्ट्रकविचरित्र, भा. २, पृष्ठे ४५-७२) महिपतींचे ११ अभंग उद्‌धृत केलेले आहेत, त्यांतील १० अभंग ताहाराबाद येथे मिळालेल्या अभंगांपैकीच असून, एक अभंग फक्त ताहाराबाद संग्रहापेक्षा वेगळा आहे. महिपतीबुवांचे अभंग उद्‌धृत करताना श्री. आजगावकरांनी म्हटले आहे - ''महिपतींनी श्लोक, अभंग, पदे इत्यादी फुटकळ कविता बरीच रचली आहे व त्यांपैकी सुमारे ४० स्फुट अभंग रा. शाळिग्राम यांनी संपादन केले आहेत; त्यांतील काही सुंदर अभंग येथे देतो.'' हे शाळिग्राम म्हणजे ज्यांनी आपल्या ओवीबद्ध 'नूतनसंतचरित्रा'त महिपतींचे चरित्र विस्तारपूर्वक गायिले आहे, ते समशेरपूरचे कै. ह.भ.प. विनायक सीताराम शाळिग्राम हे होत. त्यांनी ताहाराबादहून खूप हस्तलिखिते नेली होती, असे विद्यमान वंशज सांगतात.

माझ्या या ताहाराबाद-यात्रेतील अल्पस्वल्प फलिताचे सर्व श्रेय माझे पितृतुल्य हितचिंतक (आता दिवंगत) श्री. म. वि. देसवंडीकर (नगर) आणि श्री. पुरुषोत्तम निंबराज कांबळे (नगर) या दोन व्यक्तींना आहे. त्यांना मनःपूर्वक धन्यवाद देऊन महिपतींची आणि महिपतीविषयीची ही काही स्फुटे मी मराठी वाचकांस सादर करीत आहे.

**स्फुट अभंग**

**॥ १ ॥**

*मुख्य महाविष्णु चैतन्याचें मूळ । सांप्रदाय कुळ तेथूनिया ॥*
*हंसरूपें ब्रह्मा उपदेशी श्रीहरी । चतुःश्लोक चारी भागवत ।*
*तें गुज विधाता सांगे नारदासी । नारदें व्यासासी उपदेशिलें ॥*
*राघव चैतन्यें केलें अनुष्ठान । तया द्वैपायनें भेट दिली ॥*
*कृपाहस्तें त्यासी ठेवूनीया शिरीं । बोध तो अंतरीं पूर्ण झाला ॥*
*राघवा शरण केशव चैतन्य । बाबजीशीं पूर्ण कृपा त्याची ॥*
*बाबाजींनें स्वप्नीं येऊनी तुकयाला । अनुग्रह केला निजकृपें ॥*
*सद्‌गुरु तुका अवतार नामाचा । सांप्रदाय आमुचा ऐसा रीती ॥*
*महिपती म्हणे ऐशी ही मालिका । सकळ भाविका उचारिती ॥*

**॥ २ ॥**

*करितां नीच काम न लाजसी देवा । ऐक प्रेमभावा देखूनिया ॥*
*यातीकुळ कांहीं न देखसी त्याचें । सप्रेम भक्तींचे बळ ज्यासी ॥*
*तहान भूक त्याची सांभाळसी हरी । सगुण साक्षात्कारी रूपें घेसी ॥*
*शंख चक्र गदा घेउनि सुदर्शन । निवारिसी विघ्न नारायणा ॥*
*महिपती म्हणे ब्रीदाचा अभिमान । धरुनी निर्विघ्न करी दासा ॥*

**॥ ३ ॥**

*कोण्या योगें तुझे आठवती पाय । ऐसी कांहीं सोय सांगा देवा ॥*
*कोण्या योगें होय काळाचें सार्थक । पावे शांतिसुख जीव कैसा ॥*
*कोण्या योगें होय संसार सुखाचा । होईल हा साचा नेणवे मज ॥*
*महिपती म्हणे निवांत अंतरीं । राहिलों श्रीहरि काढी आतां ॥*




'साहित्य चपराक' मासिकाच्या संत महिपती महाराज विशेषांकास आमच्या

**हार्दिक शुभेच्छा !**

✻ शुभेच्छुक ✻

**श्री. सोमनाथ हारदे** | **श्री. भागवत झावरे**

**श्री. नारायण झावरे** | **श्री. तानाजी झावरे**

**शिवसेना शाखा, ताहाराबाद, ता. राहुरी, जि. नगर**

सौजन्य : न्यु इंग्लिश स्कूल, ताहाराबाद

ह.भ.प. भाऊसाहेब महादू नाईकवाडे (गुरूजी)
मु. पो. ताहाराबाद,
ता. राहुरी,
जि. अहमदनगर
भ्रमणध्वनी : ९७६३७५६६४०

# ।। श्री संत कवी महिपती महाराज ।।

**महिपती गुरुराजा ज्ञानसिंधू समर्था ।**
**तव चरण प्रसादे न्युन नाही पदार्था ।।**
**बहु मति हीन दीन रंक मी दास तुझा ।**
**निर्गुणीसे लोपिजे कोटी अन्याय माझा ।।१।।**
**भाग्याचा उदय । ते हे जोडी संतपाय ।।**

आपल्या राहुरी तालुक्याचा परिसर विकासाने उजळून निघाला आहे. त्यांचे एक कारण म्हणजे या तालुक्यात श्री महिपती महाराज होवून गेले आहेत.

**"पवित्र ते कुळ पावन तो देश । जेथे हरिचे दास जन्म घेती ।।"**

या संतवचनाप्रमाणे श्री महिपती महाराज आपल्या राहुरी तालुक्यातील ताहाराबाद येथे अवतरले, हे आपले भाग्य होय.

जगद्‌गुरु श्री तुकाराम महाराजांच्या सदेह वैकुंठ गमनानंतर त्यांचे भक्तिप्रसाराचे कार्य नेटाने पुढे चालविणारे जे हजारो भक्त जन्मास आले त्यात प्रमुख असे दोन वतनदार कुलकर्णी नगर जिल्ह्यात एकाच वेळी पुढे आले. एक पारनेरचे (पिंपळनेरचे) श्री निळोबाराय व दुसरे राहुरी तालुक्यातील ताहाराबादचे दादोजीपंत होत.



दादोजीपंतांना आपल्या मातुलवंशाकडून कुलकर्णीपण व ग्रामजोशीपणाचे हक्क मिळाले. दादोजीपंतांच्या संसाराकडे पाहुन मनुस्मृतीकारांच्या

"धन्यो गृहस्थाश्रम" या वचनाची सत्यता पटत असे.

**जोडोनिया धन उत्तम व्यवहारे । उदास विचारे वेच करी ।।**

कुलकर्णी आणि ग्रामजोशीपणाच्या वृत्तीतून होणारा धनसंचय पंत पंढरपूरला वारीला जाताना गरीब ब्राह्मणांना वाटून टाकीत.

**पंढरीची वारी आहे माझे घरी । आणिक न लगती तीर्थव्रत ।**

अशा परम निष्टेने वारीला जाताना कुठल्याही प्रकारचा मोह वा आसक्तीचे बंधन चित्ताला असू नये, हा द्रव्य वाटून देण्यापाठीमागील उद्देश होता. ते आपल्या वारीत कधीच खंड पडू देत नसत. त्याचप्रमाणे त्यांची पत्नी पतिला जे प्रिय आहे, त्याप्रमाणे त्या वागत. त्यांच्या विरुद्ध कधीही जात नसत.

**स्वामीचिया मनोभावा । न चुकिजे हेचि परम सेवा ।**

पंताच्या धर्मपत्नी गंगूबाई त्यांचे अंत:करणही गंगामाई सारखे स्वच्छ, भेदरहित, भव्य आणि विशाल असे होते. त्या नेहमी संतुष्ट असत. दादोजी पंतांना प्रपंचात राहुनही परमार्थाचे सतीचे वाण स्वीकारता आले. खरोखर एखाद्याची दृष्ट लागावी असा तो संसार होता. त्यात शांती शिवाय दूसरे काहीच नव्हते.

जो सत्याने वागतो, परमेश्वर चिंतनात नेहमी रममाण असतो, त्याची काळजी भगवंत घेत असतो.

**सत्य संकल्पाचा दाता नारायण । सर्व करि पूर्ण मनोरथ ।।**

दादोजी पंताची पाच तपे पंढरीची वारी करण्यात निघून गेली. कृतांत कटकमल ध्वजजरा दिसू लागल्याने या दांपत्याने चतुर्थाश्रात प्रवेश केला होता.

अशा एका एकादशीला पंत वारीला पंढरपूरला निघाले. त्यांच्याबरोबर पंढरीच्या वारीचा हट्ट गंगूबाईंने धरला, "मीही आपल्याबरोबर पंढरीच्या वारीला येणार." दादोजीपंत गंगूबाईंना पंढरपूरला घेऊन गेले. पंढरपूरला गेल्यावर श्री पांडुरंगाचे दर्शन घेताना गंगूबाईंच्या अंत:करणात सात्विक विचारलहरी तरळू लागल्या. देवाशी

त्यांचे अंतरंग संभाषण सुरु झाले. 'देवा, 'पांडुरंगा ! पंढरीनाथा ! पतिराज दरवर्षी पंढरीची वारी करीत आले, अजूनपर्यंत वारीत केव्हाही खंड पडला नाही. पण आमच्यानंतर ....

**काही मागणे हे आम्हा अनुचित । वडिलांची रित जाणतसे ।।**

असे ब्रिद असणाऱ्या नागदेवरायांना सुद्धा पंढरीच्या वारीचा लोभ वाटला. त्यांनाही **पंढरीची वारी । वारी चुको न दे हरि ।।**

हे मागणे मागावेसे वाटले. मग आमच्या घराण्यात नको का ? पंढरीची वारी अखंड, आमच्या नंतर वंशात पंढरीची वारी करणारा कोणी पाहिजे.

**स्वर्गीचे पूर्वज इच्छिताती देवा । कुळी व्हावा कुणी हरि भक्त ।।**

अशी स्वर्गाचे पूर्वजही इच्छा करतात मग आमच्या वंशात नको का एखादा हरिभक्त जन्मास यायला ?

गंगूबाईने आपले मनोगत सुखदुःख पांडुरंगाजवळ निवेदन केले आणि अंतःकरणांत उठणाऱ्या सात्विक विचारलहरी पुन्हा भक्ती-सागराशी एकरूप झाल्या.

**देव करील तरी काय न होईल । दगडाचेनि नई तरीजेल ।।**
**आले देवाचिया मना । तेथे कोणाचेही चालेना ।।**

गंगूबाईंनी श्री पांडुरंगाचे दर्शन घेताना आपले मनोगत देवाला भक्तीभावाने ऐकविले आणि परमेश्वरही 'सत्य संकल्पाचा दाता नारायण !' त्या दिवशी रात्री दादोजीपंत व गंगूबाई झोपले असताना पांडुरंगाने दादोपंताना स्वप्नात येऊन सांगितले की, "ज्याचा तीहीलोकी झेंडा मिरवेल असा महान भक्त तुझ्या उदरी येणार आहे", असे म्हणून दादोपंताच्या हातावर पेढ्याचा प्रसाद दिला. पंतांनी जागे झाल्यावर सर्व हकीकत गंगूबाईस सांगितली व तो पेढ्याचा प्रसाद गंगूबाईस दिला.

**आवडतसे करिसी देवा । कोण करील तुझा हेवा रे ।।**

भगवंताच्या मनात आल्यावर तो काय करु शकणार नाही? गुरुचरित्रात सद्गुरुच्या सामर्थ्याने वांझ गाय सुद्धा दूध देवू लागली. चतुर्थाश्रात गेलेल्या दांपत्यालाही संतती लाभ वयाच्या साठाव्या वर्षी झाला. भगवंताची लिला अगाध आहे. दादोपंतांना व गंगूबाईना पूत्र रत्न झाले. ते महान हरिभक्त श्री संत कवी महिपती महाराज होय.

श्री महिपती महाराजांच्या जन्मकाली महाराष्ट्रात स्वातंत्र्याचा ऱ्हास करण्यासाठी आलेले दिल्लीश्वर औरंगजेबाची अखेरची सत्तावीस वर्षे येथेच झगडण्यात गेली, त्याला पुन्हा दिल्लीचे तोंड पाहता आले नाही. भारत वर्षाला पारतंत्र्यातून मुक्त करण्याची महत्वाकांक्षा बाळगणारे पेशवे याच काळात उदयास आले. महाराष्ट्रातील खेडोपाडी श्रीधर स्वामीचे रामविजय, शिवलीलामृत, पांडवप्रताप इ. ग्रंथ वाचले जात असत. संत बहिणाबाई, शंकरस्वामी, मध्वनाथमुनीश्वर यांचे अभंग गायीले जात होते. अशा या काली शके १६३७ त महिपती महाराज अवतीर्ण झाले.

संताच्या पुण्याईने व संचाराने संपूर्ण महाराष्ट्र पुनीत होऊन निघाला होता.

**धन्य तोची देश जेथे संतवास । तापत्रय दोष जाती सत्य ।।**

या अभंग वाणीची सत्यता येत होती. वयाच्या सोळाव्या वर्षी महाराजांचे अंगावर प्रपंचाची सर्व जबाबदारी येऊन पडली. ते रूपाने देखणे, गोरे, सरळ बांध्याचे, बुद्धीने अत्यंत चलाख, चपळ आणि खोडकर होते. त्यांचे पाणीदार डोळे होते. त्यांना मराठी, हिंदी, संस्कृत, कन्नड, गुजराथी इ. भाषा येत होत्या. त्यांचे जामगावचे श्रीधरपंत यांची सुंदर मुलगी सरस्वती हिच्याबरोबर विवाह झाला. सरस्वती त्यांना प्रपंचात योग्य ती मदत करीत होती. महाराजांनी 'आमुची मिरासपंढरी' असे मानून पंढरीची वारी सुरु केली. ते पण पंढरीच्या वारीला जाताना जवळ असलेले द्रव्य याचकांना वाटून देत. 'वडिलाची रीत जाणतसे ।'

एके दिवशी महाराज पंढरीस गेले असता चंद्रभागेचे स्नान करुन श्री पांडुरंगाचे दर्शन घेऊन ओवरीत बसले असता त्यांना दृष्टांत झाला की, हे 'भक्तवरा' मी या चंद्रभागेमध्ये आहे. मला ताहाराबादला घेऊन जा. नंतर महाराजांनी चंद्रभागेत जावून वाळू उकरली असता त्यांना श्री विठ्ठल रुक्मीणिची मूर्ती सापडली. त्या ताहाराबादला आणून त्यांची स्थापना केली. त्यांची ते दररोज नित्यनेमाने पूजा करीत असत.

एके दिवशी महाराज पूजेला बसले असता त्यांना सरकारी अंमलदाराचे बोलावणे आले. 'पूजा आटोपल्यावर लगेच येतो' असे महाराज म्हणाले, त्या वेळेस मुसलमान शिपाई महाराजांना आद्वातद्वा बोलले. महाराजांचे चित्त दुखावले, घाईने पूजा आटपून महाराज ताहीरखानाच्या दरबारी गेले. काम आटोपून व दप्तर त्यांचे ताब्यात देवून लगेचच राजीनामा सादर केला. ताहीरखानाने राजीनाम्याचे कारण विचारले असता ते म्हणाले,

**जया सुवर्णे तुटती कान । ते कासया सुवर्ण ।**
**जेणे शिणले जगज्जीवन । ते कार्य मागुती करीना ।।**

असे म्हणून महाराज घरी आले. पांडुरंगापुढे लेखणी ठेवून भीष्मप्रतिज्ञा केली. पुन्हा लेखणी हातात धरणार नाही. मी काय पण माझ्या सात पिढ्यांतही कोणी कुलकर्णीपणाची लेखणी हातात धरली तर त्याचा वंश खंड होईल. विचार करा भक्तजनो, ज्यावर उपजीविका चालू राहायची ते साधन महाराजांनी ईश्वरार्पण केले. काय अपूर्व त्याग हा ! **"विषय तो त्यांचा झाला नारायण । नाआवडे जनधन मातापिता ।"** ह्याप्रमाणे फक्त परमेश्वर चिंतन हाच ध्यास त्यांना लागला. त्यांना पुष्कांमानी पुन्हा नोकरी करण्याची विनंती केली. परंतु

महाराज त्यांना म्हणाले,

**इंद्रापदादिक भोग । भोग नव्हे भवरोग ।।**

असे म्हणून आपला निश्चय पक्का केला.

नामदेवरायांच्या शतकोटी अभंगाचा पण पूर्ण होण्याकरीता, जगद्गुरु तुकोबारायांचा अवतार पूर्ण होईपर्यंत ३० वर्षे वाट पाहावी लागली.

**कारण संताचा महिमा तो बहुदुर्गम ।**
**शाब्दीकामे काम नाही येथे ।।**

ह्याप्रमाणे महिपती महाराजांचा अवतार होईपर्यंत वाट पाहावी लागली. जगद्गुरु तुकोबाराय महिपतीच्या रूपाने अवतरले अशी मोरेश्वरपंताची धारणा होती.

**श्री रामदास लिला अतुला तुकिता तुकाराम ।**
**साधुचे यश गाथा । प्रेमे देवोनिया सुभा केला ।**
**निसंशय ताराया जड महिपती विठ्ठले उभा केला ।।**

संत तुकाराम महाराजांनी महिपतींना स्वप्नात येवून सांगितले,

**स्वप्नी येऊन जगजेठी । माझे हाते पाठ थोपटी ।**
**म्हणे महिपती वेगी उठी । दवंडी पिटवी निजमुखे ।।**

असे सांगून आशीर्वाद दिला व सर्व संताचे चरित्र लिहिण्याचे सांगितले. ते त्यांना गुरु मानू लागले. त्यांच्या आज्ञेनुसार महिपती महाराजांनी, भक्तीविजय, भक्तीलिलामृत, संतविजय, संतलिलामृत, कथासारामृत, पंढरीमहात्य, अनंतव्रत, दत्तात्रय जन्म, तुलसीमहात्य, गणेशपुराण, पांडुरंगस्त्रोत्र, मुक्तभरणव्रत, ऋषीपंचमी, अपराधनिवारण स्त्रोत्र स्फूटअभंग इ. असे २८४ ग्रंथ लिहिले.

महिपती महाराजांनी श्रीक्षेत्र आळंदी, पंढरपूर, पैठण, नाशिक आदी अनेक तीर्थक्षेत्री वास्तव्य करुन कीर्तन व प्रवचन रुपाने स्वत: रचलेल्या भक्ती ग्रंथाचे वाचन त्यांनी महाराष्ट्रभर केले. इतर कविंची काव्यरचना पंडीती थाटाची असे. त्यात भक्तीरस आढळणार नाही परंतु संत वाङ्मयात जो भक्तीचा ओलावा आहे तो महिपती महाराजांच्या काव्य सोडून इतरांच्या काव्यात सापडणे विरळच. याला एकच कारण संताची काव्यस्फुर्ती भगद्भक्ताश्रेने होत असते.

श्री महिपती महाराज दरवर्षी आषाढ व।। १० ते अमावस्ये पर्यंत ताहाराबाद येथे उत्सव साजरा करीत असे. श्री महिपती महाराज गावोगावी जावून कीर्तने, प्रवचने करीत असत. महाराजांना अनेक दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांनी त्रास दिला. त्यांच्या पूजेचे देव चोरुन नेले. त्यांचे डोळे गेले. परत शरण आल्यावर पुन्हा त्यांचे डोळे आले. आळंदीस एका कुष्ठरोग्यास ज्ञानेश्वर माऊलीने स्वप्नात दृष्टांत देवून त्यास महिपती महाराजाकडे ताहाराबादला पाठविले. तेव्हा बाबांनी स्वत: खोदलेल्या बारवातील पाण्याने त्याला आंघोळ घातली. त्याची व्याधी पूर्ण बरी झाली. तो महाराजांचा सेवेकरी झाला.

एकदा महिपती महाराज कीर्तनाला निघाले. बरोबर आपला पुत्र नारायण, शिष्य केशव व भक्तगण होते. त्या गावात तेथील दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांनी मुद्दाम जुनाट शापित भुताच्या वाड्यात मुक्कामास जागा दिली. रात्री दोन वाजेपर्यंत भजन झाले. नंतर झोपले असता अचानक आवाज आरडा-ओरडा, एकमेकांच्या छातीवर बसणे असे प्रकार सुरु झाले. सर्व भक्तगण घाबरुन गेले. महाराज उठले. सर्वांना धीर दिला. भगवंताचे भजन सुरु केले. दिवस उगवला. काहीच झाले नाही. दुष्टलोक मात्र आश्चर्यचकित झाले. पाया पडू लागले. त्यांचे शिष्यत्व पत्करले.

महिपती महाराज सोमवंशाच्या जवळ्यास गेले. त्यांचे नाव ऐकल्यावर तेथील लोक म्हणाले, ''आपले नशीब थोर. फार दिवसापासून ताहाराबादच्या महिपतीबुवांचे नाव ऐकून होतो. पण आज प्रत्यक्ष त्यांचे दर्शन होणार. त्यांचे कीर्तन श्रवणाचा लाभ होणार.'' म्हणून सर्वजण कीर्तनास गेले. परंतु महाराज ज्यांच्या घरी मुक्कामास होते, त्या घरच्या बाईला एकच मुलगा होता. ती पण आजारी असल्यामुळे ती कीर्तनास आली नाही. कीर्तन सुरु असतानाच मुलगा गतप्राण झाला. बाई शोक करू लागली. मुलगा खांद्यावर घेऊन ती कीर्तनात गेली. मुलाला महाराजांपुढे ठेवून काहीबाही बोलून शोक करु लागली. 'तुम्ही आमचे येथे मुक्कामास राहिले व मुलगा गतप्राण झाला. आम्हाला संतमंडळी धार्जीण नाहीत.' असे म्हणत महाराजांना दोष देवू लागली. लोकांनी तीची समजूत काढली. महाराजांनी तिला सांगितले, 'परमेश्वरावर विश्वास ठेव तो पांडुरंग सर्व काही ठीक करील,' असे म्हणून पांडुरंगाची स्तुती सुरु केली. 'पांडुरंग हरि वासूदेव हरि' अन काय चमत्कार ! मुलगा पुन्हा जिवंत झाला. श्री विठ्ठलाच्या नामाचा जयजयकार सुरु झाला. महिपती महाराजांच्या पायावर बाईने डोके ठेवून क्षमा मागितली. पुढे कीर्तन सुरु ठेवले.

असे अनेक चमत्कार महिपती महाराजांनी केले. महिपती महाराजांना वाटले आषाढ कृष्ण द्वादशीस निज धामास जावे. परंतु ते महोत्सवाचे दिवस होते. म्हणून पुढे जावू म्हटले. गोकूळ अष्टमी झाल्यावर श्रावण महिन्यात सोमवारी एकादशीला चांगला दिवस प्रयाण मुहुर्त ठरला.

महाराज दरवर्षी पंढरीच्या वारीला जात असत पण त्या वारीला त्यांना जाता येणार नाही. वय झाले म्हणून महाराज आपल्या शिष्यांना म्हणाले, ''माझे पत्र पांडुरंगाला घेऊन जा. त्यात सर्व काही लिहिले आहे.'' पत्र घेऊन केशबुवा गेले. पत्र पांडुरंग चरणी ठेवून त्यांनी महाराजांची तळमळ सांगितली. त्यांची वारी चुकल्यामुळे ते दुःखी आहेत, असे सांगून ते तेथून ताहाराबादला परत आले. महाराजांना

पांडुरंगाच्या भेटीची ओढ लागली होती पण शरीर थकले होते. त्यामुळे ईलाज नव्हता. तेथेच बसून पांडुरंगाची आराधना सुरु केली. ते भक्तावरील दुःख पांडुरंगाला पहावेना. मातेसह पांडुरंग ताहाराबाद येथे महिपती महाराजांना भेटण्यासाठी आले. ते पाहुन महाराजांना खूप समाधान झाले. 'भक्तासाठी किती त्रास सहन करता' असे म्हणून डोळ्यात अश्रू आले. त्यावेळेस पांडुरंगाने महिपतीस 'तुझी काय इच्छा आहे ते मला सांग' असे म्हटल्यावर 'मला धन, राज्य काही नको, फक्त तू सदैव माझ्या ह्रदयात राहो. प्रत्येक वर्षी ताहाराबाद यात्रेस आषाढ व॥ १० ते आमावस्या ह्या महोत्सवास तू येथे राहत जाणे, ताहाराबाद हे प्रति पंढरपूर करणे व सर्व भक्तांना आशीर्वाद देणे हेच मागणे आहे पांडुरंगा !' तथास्तु म्हणून पांडुरंग गुप्त झाले.

महाराजांनी सर्व संतांना, शिष्यांना बोलविले. सर्वांना नमन केले. सर्वांना हात जोडून म्हणाले, 'मी हीन दीन आहे. पांडुरंगाची व सद्गुरु तुकोबांची आज्ञा व आशीर्वाद म्हणून मी भक्तांच्या कथा लिहून ठेवल्या.' आपली मुले विठ्ठल व नारायण यांना जवळ बोलावून सांगितले, 'पुढे वारीचा क्रम चालू ठेवा. तो आपल्या कुळाचा कुळधर्म आहे. आषाढ महिन्यातील महोत्सव वर्षोनो वर्षे चालू ठेवा. भजन, पूजन, कीर्तनात तुमचे मन रंगो ! संत सज्जनांचा अखंड सहवास घडो. एकादशी व्रत करावे. तुळशीची माळ गळ्यात घालावी. अन्नदान करावे.' सर्व कुटुंबातील मंडळी, नातेवाईक महाराजांसमोर बसले. 'माझे कार्य झाले. आता आम्ही वैकुंठास जाणार' हे ऐकूण भक्तगण टाहो फोडून रडू लागले.

महाराज त्यांना म्हणाले, 'हा नाशिवंत देह आहे. तो कधीही जाणारच. भाड्याने मंगल कार्यासाठी घेतलेला वाडा जसा कार्य संपल्यावर खाली करावा लागतो तसे आमचे कार्य संपले तेव्हा हा देहरूपी वाडा खाली करावाच लागणार. दुःख करु नका. ग्रंथरूपाने मी तुमच्याजवळ सदैव आहे.' भजन सुरु करा, असे म्हणून महाराजांनी भजन सुरु केले. 'पांडुरंग... पांडुरंग...' म्हणत महाराज निश्चक्र झाले.

त्यांनी वैकुंठ गमन केले. शके १७१२ सन १७९० साली रीतिरीवाजाप्रमाणे महाराजांच्या देहावर विधिवत अंत्यसंस्कार करुन त्यांना समाधीस्त केले. त्यांची समाधी बांधली. पूर्वी तेथे फक्त त्यांच्या कुटुंबाच्या समाध्या होत्या. वरुन काहीच छत्रसावली नव्हती. उन्हात ह्या समाध्या होत्या. पण जिल्ह्यातील धार्मिक लोकांनी सहकार्य करुन ट्रस्ट स्थापन केला. तनपुरे स. साखर कारखान्याच्या सर्व ऊस सभासदांनी मदत देवून आज भव्य दिव्य मूर्ती व मंदीर उभे आहे.

देवस्थान दरवर्षी महाराजांनी सांगितल्याप्रमाणे चार दिवस आषाढ व॥ १० ते अमावस्या पर्यंत उत्सव साजरा करते. महाराष्ट्रातून हजारो दिंड्या, भक्तगण येतात. 'पाऊलघडी गोपालकाला' हे कार्यक्रम, कीर्तने, प्रवचने होतात. सर्व ह्या भक्तमय वातावरणात चार दिवस रममाण होवून श्री महिपती महाराजांचा आशीर्वाद घेऊन कृतकृत्य होतात.

श्री महिपती महाराजांवर चित्रपट पण काढला आहे. शिवाय तीन अंकी नाटक पण श्री नाईकवाडे गुरुजींनी लिहिले आहे.

महाराजांची ही भक्तीमय गाथा प्रसिद्ध व्हावी, महाराजाचे चरित्र 'चपराक' मासिकाच्या माध्यमातून सर्वांपर्यंत जावो हीच एक सदिच्छा!

जय श्री हरि... पांडुरंग हरि...!

## थोर विभूती – संत महिपती

आपल्या पवित्र भारत देशात
नगर जिल्ह्यातील ताहाराबाद गावात ।
जाहली ऐसी थोर विभूती
नांव त्याचे संत महिपती ।
माता गंगाबाई त्यांची, पिता दादोपंत
विचाराने धार्मिक, वृत्तीने ते संत ।
महिपतींची संतविषयक भूमिका किती थोर
संत ही देवाची सगुण रूपे साकार ।
विद्यागुरु लाभले मोरोपंत तांभेरकर
पायपीट केली महिपतींनी भारतभर ।
त्यातून प्रकटली संतचरित्रे अपार
ओव्या रचियल्या त्यासाठी हजारांवर ।
ह्या ओव्यांनी जनमाणसात चमत्कार घडविला
वारकऱ्यांना गाण्यासाठी खजिना मिळाला ।
भक्तविजय, भक्तलीला-संतलीलामृत
ग्रंथभांडार महिपतींचे किती अद्भूत ।
महिपतींच्या प्रतिभेने झाले सर्वच प्रभावीत
जस्टिन ॲबटसारखे त्यात विदेशी भक्त ।
आम्हा भक्तांवर महिपतींचे थोर उपकार
मानूया त्यांचे मनापासून आभार ।
चंद्र-सूर्य असेपर्यंत राहील अढळ स्थान
नतमस्तक होऊनि करुया त्यांसि नमन ।

– विनोद श्रा. पंचभाई, पुणे
पुणे, भ्र. ९९२३७९७७२५

अविनाश कांबळे
(महाराजांचे सातवे वंशज व उपाध्यक्ष श्री संतकवी महिपती महाराज देवस्थान ट्रस्ट ताहाराबाद)
भ्रमणध्वनी : ९७६५५५९३११

# श्री संत महिपती महाराज यांचे अल्पचरित्र

श्री संताची भूमी जी नगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यातील ताहाराबाद हे डोंगरपठारावरील गाव आहे. सदर गावी महिपती महाराजांचे वडील दादोपंत कुलकर्णी हे यवन सरकार दप्तरी नोकरीस होते. त्यांचे मूळगाव मंगळवेढे, जि. सोलापूर. ते देशस्थ ऋग्वेदी वसिष्ठ गोत्री ब्राम्हण, उपनाव कांबळे. मंगळवेढेहुन आजोळी ताहाराबाद येथे कुलकर्णी वतन चालविण्यास आजोळी आले. ते मोठे भगवंतभक्त होते. ताहाराबादेतून प्रतीमास पंढरपूर वारीस जात. पोटी संतान नसल्याने घरावर तुळशीपत्र ठेवून वारीस जात. हा नित्यक्रम वयाचे साठ वर्षापर्यंत चालू होता.

वय वर्षे साठ होईपर्यंत पोटी संतान नसल्याने पुढील परमेश्वराची वारी कोण चालवील या विवंचनेत त्यांनी पांडुरंगाची पुत्रप्राप्तीसाठी आर्ततेने प्रार्थना केली. झोपेत त्यांना स्वप्न पडले. स्वप्नात पांडुरंगाने आपल्या हातावर पेढा प्रसाद म्हणून दिला व तो पत्नी गंगुबाईस खावयास देण्याचे सांगितले. स्वप्नातून जागे झाल्यावर पाहातात तो खरोखर हातात पेढा होता. श्री विठ्ठलाचे दर्शन घेऊन ताहाराबाद ग्रामी येवून तो पेढा पत्नी गंगुबाईस पांडुरंग प्रसाद म्हणून खावयास दिला व पडलेले स्वप्न कथन केले. गंगुबाईनी मोठ्या आनंदाने व भक्तीभावाने प्रसाद ग्रहण केला. पुढे गंगुबाई गरोदर राहून त्यांना शके १६३७ इ.स. १७१५ मध्ये पुत्र संतान परमेश्वर कृपेने झाले व हे संतान म्हणजेच श्री संत महिपती महाराज होत. वयाचे साठ वर्षानंतर पांडुरंग कृपेने अवतरलेले श्री संत महिपती महाराज ताहाराबाद येथे शिकू लागले. त्यांची शिक्षणाची सोय जवळच असलेले तांभेरे या गावी मोरोबा तांभेरेकर यांचेकडे झाली. महिपती हे रूपाने सुंदर व बुद्धीने अतिशय चाणाक्ष होते. त्यांचे हस्ताक्षर उत्तम होते. लहानपणापासूनच त्यांचा ईश्वर भक्तीकडे ओढा होता.

अल्पवयातच कुलकर्णी वतनाची जबाबदारी अंगावर पडली. बुद्धीने अतिशय हुशार असल्याने वतनाचे कामात प्रगती केली परंतु ईश्वर भक्तीकडे प्रचंड ओढ होती. यवन सरकारची नोकरी करीत असताना सुद्धा ईश्वरभक्तीची ओढ कमी झाली नाही.

एके दिवशी महाराज पांडुरंगाची पुजा करत असताना अंमलदारांचे दप्तराकडून बोलावणे आले. 'देवाची पुजा झाल्यानंतर येतो' म्हणून शिवामा करवी महाराजांनी निरोप पाठविला. परंतु लागोपाठ दुसऱ्यावेळेस बोलावणे घेऊन शिपाई आला. पुजा झालेनंतर महाराज दप्तरी पोहोचले. कामाचा चोख हिशोब दिला. पण अधिकारी अधिकार वाणीने महाराजांना असा तसा बोलला. त्याने महाराज विषण्ण झाले व एकाच वेळी दोन धन्याची चाकरी होणार नाही म्हणून महाराजांनी कुलकर्णी वतनाची लेखणी पांडुरंग चरणावर ठेवून कुलकर्णी पद सोडले व यापुढे माझे सात पिढ्या कोणीही कुलकर्णी पदाची चाकरी करणार नाही व जो करील त्याचा वंश खंडन होईल असे सांगितले. मी स्वत: महाराजांचा ७ व्या पिढीतील वंशज आहे. आमचे वंशजापैकी सरकारी सेवा केलेल्यांचा वंश खंडीत झाला आहे. याची प्रचिती वंशवेल पाहता आपणास लक्षात येईल.

महिपती महाराजांनी कुलकर्णी वतन सोडले. त्यांना तुकाराम महाराज यांनी स्वप्नात दृष्टांत दिला की, नामदेवाचा शतकोटी अभंग करण्याचा संकल्प माझ्या हातून पुरा झाला. आता संत चरित्राचे वर्णन तुमच्या मुखाने व्हावे. एवढे बोलून तुकाराम महाराजांनी आपला वरदहस्त महिपतींचे मस्तकावर ठेवला. तुकाराम महाराजांना गुरुस्थानी आणून व त्यांच्या कृपेने महिपती महाराजांना काव्य स्फुर्ती झाली व महिपती महाराजांनी खालील ग्रंथ संपदा लिहीली.

१) भक्तविजय
२) संत लिलामृत
३) भक्त लिलामृत
४) संत विजय
५) कथासारामृत

हे पाच मोठे ग्रंथ महिपती महाराजांनी लिहून खालील स्तोत्रे लिहिली आहेत.

६) पंढरी महात्म्य
७) अनंतव्रत्त कथा
८) दत्तात्रय जन्म
९) तुळशी महात्म्य
१०) गणेश पुराण
११) पांडुरंग स्तोत्र
१२) मुक्ताभरण व्रत
१३) ऋषीपंचमी महात्म्य
१४) अपराध निवेदन स्तोत्र

तसेच महिपती महाराजांनी चार चरणी करुणा अभंग, आरत्या लिहिलेल्या आहेत पण त्या अप्रकाशित आहेत. महाराजांचे

'पंचेचाळीस अभंग' प्रसिद्ध आहेत. वाणी रसाळ व प्रासादीक असून सहज समजणारी भक्ती रसाने ओतप्रोत भरलेली आहे. वर्णन, उपमा, सुंदर व रसाळ आहे. महाराजांना दोन मुले. मोठे विठ्ठल बुवा व धाकटे नारायण बुवा. दोघांचीही वंशवेल विस्तारलेली आहे. सध्या महाराजांची सातवी व आठवी पिढी हयात आहे.

ग्रंथ संपदा करताना महाराजांची विठ्ठल दर्शनाची ओढ कायम होती. दादोपंताची पंढरीची वारी महाराजांनी पुढे चालूच ठेवली व मागे कोणतीही आसक्ती न ठेवता महाराजांनी पंढरपूर वाऱ्या चालू ठेवल्या होत्या. वृद्धावस्थेत महाराज पंढरपूर वारीस गेले व पांडुरंगाचे दर्शन घेऊन देवास आर्त विनवणी करुन नम्रतेने सांगितले, हे पांडुरंगा यापुढे म्हातारपणामुळे वारीसाठी तुझ्या दर्शनास येण्यास अंतरेल असे वाटते. तेव्हा मला क्षमा कर व तुझ्या दर्शनाची माझी आसक्ती कायम अशीच राहू दे.' भगवंताने खऱ्या भक्ताची आर्त विनवणी ऐकून महाराजांना स्वप्नात दृष्टांत दिला व 'आषाढ शुद्ध एकादशीस भक्त मला भेटण्यास पंढरपूर येथे येतात. आषाढ वद्य एकादशीस मी तुला ताहाराबादेस येवून दर्शन देईन' असे स्वप्नात सांगून 'सभक्ती मी तुला चंद्रभागेत सापडेन' असे सांगून दृष्टांत दिला. सकाळी महाराजांनी चंद्रभागेत स्नान केले असता महाराजांना चंद्रभागेत श्री विठ्ठलाची वाळुमिश्रित पाषाणाची मूर्ती मिळाली. सदर मूर्ती महाराजांनी ताहाराबाद येथे आणली व विठ्ठलमूर्तीची प्राणप्रतिष्ठा करुन विठ्ठलाचे मंदीर बांधले. सदरची वाळुमिश्रित पाषाणाची मूर्ती आजही ताहाराबाद येथे पहावयास मिळते.

श्री संत महिपती महाराजांनी प्रत्यक्ष परमात्मा पांडुरंगास ताहाराबाद येथे आणले व देवासही भक्ताच्या हाकेला व भक्तीस शरण जावून भक्तासाठी पंढरपूर सोडावे लागले. केवढी ही थोर भक्ती !

श्री पांडुरंगाने दिलेल्या वचनाप्रमाणे आषाढ वद्य दशमीत पंढरपूरचे पांडुरंग ताहाराबाद येथे वास्तव्यास येतात. आषाढ वद्य एकादशीस पांडुरंगास अभिषेक, कीर्तन, अभंग नैवेद्य नगर प्रदक्षिणा हरीजागर असा धार्मिक कार्यक्रम होतो. द्वादशीस महाराजांचे कुळधर्माचा कार्यक्रम असतो. कुळधर्मासाठी पुरणाचा नैवेद्य असून गावातील प्रत्येक घरी एक पुरणाची प्रसादाची पोळी दिली जाते. त्रयोदशीस आलेल्या दिंड्याचे स्वागत हरी जागर व काल्याचे कीर्तन, दहीहंडी व प्रसाद असा कार्यक्रम असतो. चतुर्दशीस पांडुरंगाची पालखीची नगर प्रदक्षिणा असते व रात्री पांडुरंगाचे करमणुकीसाठी प्रासादीक ललीताचा कार्यक्रम असतो व आमावस्येच्या दिवशी सकाळी पांडुरंगाच्या निरोपाचा किंवा पंढरपुरला परत जाण्याचा कार्यक्रम म्हणजेच पाऊलघडीची पुजा असते. महाराजांना दिलेल्या वचनाप्रमाणे पांडुरंगाचे ५ दिवस ताहाराबाद येथे वास्तव्य असते. पाऊलघडीची पुजा झाल्यानंतर पांडुरंगाची हळद, कुंकु, गुलाल, बुक्याची पावले पंढरपूरकडे जाताना दिसतात व पांडुरंग परत पंढरपूरी जातात अशी अख्यायिका आहे व याची प्रचिती भाविकांना प्रत्येक वर्षी येते.

श्री संत महिपती महाराजांचे सातवे पिढीत व त्यांचे वंशांत जन्मास येवून आम्ही खरेच भाग्यवंत आहोत.

श्री संत महिपती महाराजांनी अनेक पिडीत झालेल्या लोकांना पिडा मुक्त करुन भक्ती मार्गास लावले. प्रत्यक्ष परमेश्वरास ताहाराबाद येथे यावे लागले. महाराजांनी सुरु केलेला आषाढी उत्सव आजही वंशजांनी सुरु ठेवलेला आहे. तालुक्यातील व ग्रामस्थांचे सहभागाने व राहुरी सह. साखर कारखान्याचे सहकार्याने ताहाराबाद येथे श्री संत महिपती महाराजांचे विशाल व भव्य असे मंदीर बांधलेले असून ट्रस्टचे अध्यक्ष मा. रावसाहेब साबळे व विश्वस्थांचे मार्गदर्शनाखाली विकास कामे सुरु आहेत. पंढरपूर येथेही अध्यक्ष रावसाहेब पा. साबळे यांचे प्रयत्नाने श्री संत महिपती महाराज यांचे मठाचे बांधकाम सुरु आहे. प्रत्यक्ष परमेश्वर परमात्म्यास ताहाराबाद क्षेत्री भक्तासाठी धावत यावे लागले, त्या महिपती महाराजांबद्दल लिहीता येण्यासारखे खूप आहे. परंतु या छोट्या लेखात सर्व अंतर्भुत करणे केवळ अशक्य आहे. म्हणून महाराजांनीच माझे कडून करुन घेतलेली ही अत्यल्प सेवा त्यांचे चरणी समर्पीत करतो.



राघव शिवराम रामदासी
१९८, शुक्रवार पेठ,
चैतन्यसुधन, घर क्र. ५,
काळा हौद चौक, पुणे-२.
भ्र. : ८६०५५६७०६६

# महिपतींची संतचरित्रे । वाचू गाऊ वदू अपारे

'संत चरित्रकार' महिपतीबुवा हे आपल्या महाराष्ट्रात होऊन गेलेले अलौकिक व्यक्तिमत्व. ज्यांनी संत चरित्रे लिहिता-लिहिता तत्कालीन समाज घडवला. जीवनमूल्ये आणि ईश्वरनिष्ठेची पेरणी केली, भक्ती-प्रेमाचा बहर आणला आणि समाजाला हरिभक्ती व संतभक्तीचा मार्ग दाखवला.

**बरवी संत चरित्रे हो । पावन परम पवित्रे हो ।**

असा उद्‌घोष करुन महिपतींनी ३० हजाराच्यावरील ओव्यात संतकथा सादर सप्रेम गाईल्या आणि भगवत्भक्तांचे महिमान वाढवले. जर भक्तच नसेल तर ईश्वराला कोण विचारतो ?

**निजभक्ता वाचुनी जाण । नकळे देवाचे महिमान ।**
**प्रजा नसल्या जरी निर्माण । तरी भूपतीस कोण सन्मानी ।।**

असा वस्तुनिष्ठ प्रश्न उभा करुन महिपतीबुवानी संतचरित्राचे उत्कटतेने गायन केले आणि त्यासवे ईश्वराचेही महिमान वाढविले.

**वाटे चरित्र त्यांचे काही आपण तरावया गावे ।**

या मोरोपंतांनी गायलेल्या आर्येच्या आशयाला धरुनच त्यांचे संतचरित्राचे विस्तृत लिखाण आहे. स्वत: भगवत्भक्त असल्याने विठुरायाशी ते कधीच एकरूप झाले होते आणि हे लिखाण तोच माझ्याकरवी करुन घेतो असा त्यांचा दृढ विश्वास होता.

महिपतींनी गायलेल्या संतचरित्रात अद्‌भूततेचा वर्षाव आहे खरा, पण त्यातून मानवीमूल्ये जपली जावी, हरवलेले आत्मतत्व गवसावे, मन:शान्ती लाभावी, भक्ती-ज्ञान-वैराग्याचा उदय होऊन परमानंदाची प्राप्ती व्हावी हाच विचार डोकावताना दिसतो.

महिपतींच्या लिखाणात रुक्षता आहे असे म्हणाल तर नूतन उपमांनी, रुपकांनी आणि दृष्टांतांनी ते असे सजविले आहे की वाचकाचे भान हरपते आणि तो सहजतेने संत विश्वात रममाण होतो. सूक्ष्म निरीक्षणातून आणि प्रासादिक लिखाणातून व्यक्त झालेल्या संत चरित्रात अशी काही सुंदर स्थाने आहेत की जे आपल्याला त्या काळाशी किंवा भक्ताच्या भावनेशी एकरूप करतात.



रामभक्त उद्धवचिद्घन महाराजांच्या चरित्रात असा प्रसंग उद्‌भवतो की राम महोत्सवाची मिरवणूक चालली असताना यवनलोक त्यावर शेणाचा मारा करतात आणि ती मिरवणूक उधळून लावतात. हे पाहून उद्धवचिद्धन नाराज होतात आणि पुन्हा त्या मूर्ती देवघरात ठेऊन देतात. त्यावेळी उद्धवचिद्धनांची मानसिक अवस्था महिपती वर्णन करतात -

**की वधूवरे बैसली भोजनाकारणे । तव दीप विझविला पतंगाने**
**मग वरमायेचे विक्षेपे मन । तैसेची वाटे तयासी ।।**

यातून व्यक्त होणारा भक्तांचा भगवंता विषयीचा लटिका राग महिपतींनी एका ओवीत व्यक्त केला आहे.

तसेच...

ज्ञानेश्वर महाराजांची ज्ञानोत्तर भक्ती योगीजनांची तुलना करुन आणि सागराच्या खारटतेचे रूपक देऊन गौरविली आहे.

**सागराचे गांभीर्य वर्णिती जनी ।**
**परी क्षार आहे तयाचे पाणी**
**तैसेची योगी आत्मज्ञानी ।**
**विन्मुख सगुण प्रेम सुखा ।।**
**निवृत्ति सोपान ज्ञानेश्वर ।**
**तैसे नव्हती साचार...**

आत्मज्ञानाने संतुष्ट होऊनही, त्याची खोली अनुभवूनही ज्ञानेश्वरांची सगुणभक्ती महिपती चरित्रातून अशा प्रकारे प्रगटली आहे.

प्रेमळ भक्त गणेशनाथांचे

वैराग्य तर अंगावर रोमांच उभे करणारे आहे.

वैराग्यशील गणेश नाथाकडे भोगलोलूपू, ऐश्वर्यसंपन्न राजा येतो आणि त्यांना राजगृहात येण्याची विनवणी करतो, तेंव्हा त्यांची झालेली अवस्था महिपती चपखल टिपतात.

**जैसे का हरिणी नेऊ म्हणता व्याघ्र । भये अंतर कापे तिचे ।**

राजा जेव्हा गणेशनाथांना ऐश्वर्यसंपन्न राजगृहात येण्याची विनवणी करतो तेंव्हा त्यांचे मन वाघ जसा हरीणीची शिकार करीत असताना तिचे ह्रदय कापते तसे गणेशचे ह्रदय या ऐश्वर्याला बघून कंपीत होते.

असे कितीतरी सुरेख वर्णने महिपतीबुवांच्या चरित्रात आपल्याला आढळतात.

ती सुगमता, रमणीयता मानवाची उन्नती व्हावी, संतांप्रमाणे त्याचे आचरण करावे याच उद्देशाने आहे हे निश्चित !

आजही वारीतून जाणारा वारकरी ज्या आसीम भक्तीभावाने ज्ञानोबा-तुकारामाचे नाम घेतो त्याचे श्रेय संतचरित्रकार महिपतीबुवाकडे जाते.

स्वत:चे कुलकर्णीपद सोडून, दारोदार जाऊन संत चरित्रासाठी माहितीची भिक्षा मागणारा, लेखी स्वरुपात तो आपल्यापर्यंत पोहोचवणारा, पाश्चात्य विद्वान आणि ख्रिश्चन धर्मप्रचारकांनाही वेड लावणारा हा महापुरुष आपल्या महाराष्ट्रात जन्मास आला हे महाराष्ट्राचे परमभाग्य आहे. त्यांनी लिहिलेल्या संतचरित्रात पुन्हा-पुन्हा अवगाहन करुयात आणि जीवन कृतार्थ करुयात !

आणि म्हणूयात...

**महिपतींची संतचरित्रे । वाचू, गाऊ, वदू, अपारे**
**होऊन जाऊ परम पवित्रे । सर्वांसहीत ।।**




'साहित्य चपराक' मासिकाच्या
संत महिपती महाराज
विशेषांकास आमच्या
**हार्दिक शुभेच्छा !**



✻ शुभेच्छुक ✻





**श्री. उदयसिंह मुळीक**

(संस्थापक अध्यक्ष, शिवछत्रपती विद्यालय, कोंढवा, पुणे)
(ज्येष्ठ सदस्य, पुणे शहर राष्ट्रवादी काँग्रेस)

मोहंमद अनिस
चित्रपट लेखक

# संत महिपती... एक चरित्रपट, नव्हे एक संयमीत जीवन रहस्य !

'संत महिपती' हा चित्रपट नगरच्या मातीत तयार झालेला. तेथील कलावंतांनी सर्वांगाने तयार केलेला पहिला चित्रपट ! संत महिपतींची ग्रंथसंपदा, संतचरित्र, इतर कवींनी संत महिपतींवर केलेली कवने, तब्बल दोनशे लोकांनी कर्णोपकर्णी सांगितलेल्या घटना यांचा विचार करुन कथा संशोधन व लेखन हा दीड वर्षाचा अथक प्रवास म्हणजे हा चित्रपट ! शेतकरी कुटुंबातील मुसळवाडीचे ज्ञानेश्वर माने व शामबाला माने यांची निर्मिती तसेच केंदकचे बंटी तारडे यांचे दिग्दर्शन व लेखक मोहंमद अनिस, गुहा, ता. राहुरी या तीघांनी उचललेला द्रोणागिरी म्हणजे 'संत महिपती' हा चित्रपट !

साडेतीनशे वर्षापूर्वीचा कालखंड भव्यदिव्य स्वरुपात उभे करणे हे मोठेच आव्हान होते. त्यासाठी त्या-त्या स्वरुपाच्या चित्रीकरण स्थळाची गरज होती. मग त्यावर होणाऱ्या प्रचंड खर्चाचा भार सोसण्यासाठी संत महिपती ट्रस्टचे अध्यक्ष रावसाहेब कोंडाजी साबळे पाटील आणि सहकारी यांनी अर्थसाह्य केले. जिद्द एकच होती, हा संपूर्ण चित्रपट नगर जिल्ह्याच्या मातीतच घडला पाहिजे. कारण जगाला ज्ञान देणारी ज्ञानेश्वरी याच मातीत प्रकटली. शिर्डी, शनिशिंगणापूर, भगवती माता सरस्वती ही जागृत देवस्थाने नगर जिल्ह्यातीलच. कवी अनंत फंदी, कवी गणपती, सी. रामचंद्र, शाहू मोडक, पोवळा (पहिली स्त्री कलावंत), मधुकर तोरडमल अशी दिग्गज मंडळी ह्याच मातीत जन्माला आली. त्यामुळे हा संपूर्ण स्वतंत्र चित्रपट नगरमध्ये का निर्माण होणार नाही हा ध्यास घेऊनच कलावंतांनी जमवाजमव केली. त्यांनीही प्रसादरूपी नाममात्र मानधन घेऊन भुमिकांना चोख न्याय दिला.

कालदर्शकता अचूक व्हावी व प्रेक्षक थेट सतराव्या शतकात पोहचावा ह्या दृष्टीने पळशी व पारनेर येथील संत महिपतींच्या काळातील वाडे, वेस, मंदीरे, पार, पाणवठे, समाधी, रस्ते, वाटा,





पिता दादोपंत व माता गंगुमाई वयाच्या
उत्तरार्थात सुद्धा वारीला जात
असतानाचे चित्रपटातील दृष्य
कलाकार - मुकुंद देंडगे व वृंदा बाळ
यांचा वर चित्रीत करण्यात आला.



स्वयंस पांडुरंगाने पुत्रप्राप्तीचा प्रसाद दिल्याचे दृष्य
कलाकार - विलास कुलकर्णी, मुकुंद देंडगे व वृंदा बाळ



महाराजांनी घर लुटविल्यानंतर, ताहिर खानने देवू केलेले धान्य गरिबांना
देण्याची विनंती करतांनाचे दृष्य
कलाकार - शिरीष गुणे, सुनिल गीत, विनोद कदम



[illegible] चाकरी सोडल्यानंतर माधुकरी मागतांना
संत कवी भक्तिपती महाराज



प्रातःकाळी तुळशीपुजन करतांना महाराजांच्या पत्नी
सरस्वतीबाई
कलाकार - [illegible] भुजबळ



महाराजांना मंदिर बांधून
देण्याचे वचन देतांना
चांडाळ चौकडी
कलाकार - प्रकाश धोत्रे
पोपट चव्हाण, डॉ. हरिश्चंद्र
नाना तरंगे नरेंद्र जाधव



गुलाबराव पाटील
कलाकार - प्रकाश धोत्रे

डोंगरवाटा, अपेक्षीत होत्या. पण सर्वच पडझड झालेल्या अवस्थेत असलेल्या कला दिग्दर्शक संदीप भिंगारदिवे यांनी थर्माकोलचा अप्रतीमरित्या वापर करुन मोडलेले खांब, कमानी, भिंतीची भगदाडे बुजविली. ते चित्रपट बघून प्रेक्षक सुद्धा अचंबीत होतील यात शंका नाही. प्रकाश योजनेसाठी जनरेटर व्हॅन बाळगणे परवडण्यासारखे नव्हते. मग त्यासाठी रिफ्लेक्टरवर चांदीचा वर्क चढवून मुळ सूर्य प्रकाशाला चित्रीकरण स्थळावर आणले गेले. मात्र ज्याठिकाणी लाईट वापरणे जास्त गरजेचे होते तेथे साध्या जनित्राचा वापर केला. बहुतेक चित्रीकरण हे सूर्यप्रकाशात किंवा सूर्यप्रकाश परावर्तीत करुन करण्यात आले.

प्रामुख्याने प्रश्न होता चित्रीकरणाच्या बजेटचा. ते ३५ एम.एम.च्या कॅमेऱ्यावर होणे गरजेचे होते. साध्या कॅमेऱ्यावर चित्रीकरण करुन मोठ्या पडद्याची प्रत तयार करणे खऱ्या अर्थाने आविष्कार होता. याकामी छायांकन करणारे सुनील भोंगळ आणि संकलक कुणाल कुलकर्णी यांनी सखोल अभ्यास करुन, साध्या कॅमेऱ्यावर चित्रीकरण करुन मोठ्या ३५ एम.एम. फिल्मचा परिणाम व सफाई कशी साधता येईल हे पाहीलं. नंतर संगणकाद्वारे संशोधन करुन आविष्कार घडवण्याचे ठरवले, त्याचप्रमाणे रंगभुषा, वेषभुषेचा प्रश्न गणेश तारडे यांनी सोडविला. त्यांनी ३५० वर्षापूर्वीची जाती-जमातींची वस्त्रसज्जा, रंग-संगती ग्रंथातील वर्णनावरुन तयार केली. त्यांना ज्योती गोसावी यांनी साह्य केले.

हा चित्रपट एक संतपट न बनता काहीतरी वेगळे विचार यातून व्यक्त करता आले पाहिजे हे मनी ठाणले होते. जेणेकरुन आजच्या पिढीने तो आवर्जून बघावा. त्यादृष्टीने हा चित्रपट चरित्रपट नसून, शांतता, संयम, उदारता, सहिष्णुता शिकवणारा ग्रंथ आहे आणि तो क्लिष्ट, जड स्वरुपात नसून सर्वांचा समन्वय साधून शुद्ध सोप्या मराठी भाषेत कधी खुशखुशीत तर कधी खटकेबाज संवादाने अंतर्मनात नाद निर्माण करणारा आहे. त्यातून त्यागप्रवृत्ती, अजीजी, संयमितपणा दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रेम कसं असावं ? आईचं मुलांवर, संतांचं भक्तांवर, भक्तांचं देवावर, देवाचं आपल्या याचकावर आणि याचकांचं उदारतेवर म्हणजे भाग्य कसं बदलते! प्राणी मात्र सुद्धा कसे वागतात, माणसाबरोबर निसर्ग कसा साथ देतो हे या चित्रपटातून पाहायला मिळते. स्वत: संत महिपती मोठे कवी होते. त्यांची प्रचंड काव्यरचना जीवन-मार्गदर्शक आहे. त्यांचीच कवने घेण्याचा व तालबद्ध करण्याचा अट्टाहास संगीतकार संतोष कुलट यांनी केला आणि सुमधुर चालीवर महाराजांचे अभंग गायीले गेले. काही प्रसंगांची परिणामकारकता दाखवण्यासाठी गीतकार मनोहर इनामदार यांनी संत महिपतींच्या शब्दांशी जवळीक साधणारे तोलामोलाचे शब्द वापरुन गीत लेखन केले.

अशा काटेकोर निकषावर कथा-पटकथा-संवाद, गीतलेखन केले केले. या भरभक्कम पायावर भव्य निर्मिती होणार होती. महिपती महाराजांच्या जीवनातील घटनाच मुळी विस्मयकारक होत्या. त्यांना काल्पनिक प्रसंगाची जोड देणे म्हणजे आभाळाला ठिगळ लावण्यासारखं होतं म्हणून सत्य घटनांना वास्तवतेचीच जोड असावी असा प्रयत्न केला गेला आणि म्हणूनच हा सिनेमा इतर काल्पनिक चित्रपटासारखा नसून एक सत्य घटना आहे, आजही त्याचे काही पुरावे २१ व्या शतकात सापडतात.

म्हणून हा चित्रपट तरुणांनी आपल्या माता-पिता, बहिणीसोबत पहावा, स्त्री वर्गाने गौरवावा, तसेच मित्राने मित्रासोबत पहावा. कारण मैत्री काय असते, ती एकमेकाच्या प्रेमाने कशी पाझरते आणि सत्यात कशी उतरते हे यामधून वास्तवरूपाने पहावयास मिळते ! भक्ती असेल तर पाषाणसुद्धा कसा पाझरतो, प्रेम असेल तर पोलादाला सुद्धा कसा घाम फुटतो, उत्कट प्रेम असेल तर गेलेला जीव सुद्धा परत कुडीत कसा टाकता येतो, सुक्ष्मरूप कुठल्या त्यागानंतर धारण करता येते आणि दुसऱ्या आत्म्याचे हाल पहिल्या जीवाला कसे समजतात ? असे कितीतरी वास्तववादी प्रसंग, कुठलाही थिल्लरपणा, पांचटपणा न करता या चित्रपटातून अनुभवण्यास मिळतात. हा चित्रपट भक्त भाविकांसाठीच नसून नास्तिकाने सुद्धा पहावा असा रंजक आहे. मात्र माणूस म्हणून आपण जगतो ही ज्योत त्याच्या मनात तेवत असली पाहिजे.




श्री. विजयकुमारजी
मोतीलालजी मर्लेचा

विशेष कार्यकारी अधिकारी (महाराष्ट्र राज्य) S.E.O.
स्पेशल एक्झीक्युटीव्ह मॅजिस्ट्रेट (1985 ते 1995) S.E.M.
मा. चेअरमन व संचालक - श्री लक्ष्मी को.ऑप. बँक, पुणे
राष्ट्रीय उपाध्यक्ष - अ.भा. भ्रष्टाचार निर्मूलन समिती, मुंबई
राष्ट्रीय मार्गदर्शक - अ.भा. श्वे.स्था. जैन कॉन्फ्रेन्स, नई दिल्ली
अध्यक्ष - महावीर फुड बँक, पुणे
मा. कार्याध्यक्ष - रुग्ण हक्क रक्षण समिती, महाराष्ट्र राज्य
कार्यकारिणी सदस्य - वंचित विकास, पुणे
विश्वस्त - आय.एस.आय. ब्लड बँक, रक्तदान कमिटी
मा.अध्यक्ष - आय.एस.आय. ब्लड बँक, रक्तदान कमिटी
मा.अध्यक्ष - जय आनंद ग्रुप, पुणे (JAG)
विश्वस्त - रामदेव भक्ति संगत, मरूधर रुणेचा (राजस्थान)
विश्वस्त - सुकांत चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे
सदस्य - शिर्डी साईबाबा संस्थान, शिर्डी.

श्री. बाळासाहेब संपत मुसमाडे
(सचिव, श्री महिपतीबुवा देवस्थान ट्रस्ट,
ताहाराबाद)
तांभेरे, ता. राहुरी,
जि. अहमदनगर

# श्री महिपतीबुवा देवस्थान ट्रस्टची यशस्वी घोडदौड...

अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यात अतिदुर्गम भागात महान संत कवी महिपती महाराज सतराव्या शतकात होवून गेले. या अवतारी महात्म्याने भारत भुमीतील २८४ संताचे चरित्र १५ ग्रंथात लिहुन महान कार्य केले. त्यांचे लिखान अत्यंत रसाळ व मार्मीक असून या कलीयुगातील प्रत्येकास उपयुक्त ठरलेले आहे. संत महिपतींनी आपल्या ८५ वर्षांच्या आयुष्यात एक क्षण वाया न घालवता सरकारी नोकरीचा राजीनाम देवून पांडुरंग सेवेत आयुष्य वेचले. नोकरीमुळे भगवंताचे सेवेत अडसर येतो म्हणुन वंशजानीही नोकरी करू नये, केल्यास वंश खंडन होईल असा शाप दिला.

महिपती महाराजांनी बालपणा पासूनच परमार्थात रस घेवून अनेकांना त्या मार्गास लावले. पत्नी सरस्वतीमाई महाराजांना या कार्यात मदतच करीत. महाराजांना वाचा सिद्धी प्राप्त असल्याने अनेक चमत्कार त्यांचे हातुन घडले. त्यामध्ये ब्रह्म संबधाचा उद्धार, शापीत सर्पाचा उद्धार, साक्षात पांडुरंगाचे पंगतीस भोजन, महारोग्यास व्याधी मुक्त, चंद्रभागेत पांडुरंग मुर्तीची प्राप्ती, सुनेस जिवनदान, ज्ञानेश्वर माऊलींचे व नाथांचे प्रत्यक्ष दर्शन असे अनेक उदाहरणे सांगता येईल. महिपतींनी आषाढी कार्तिकी पायी वाऱ्या केल्या आहेत.

अशा या महान संताची समाधी श्री क्षेत्र ताहाराबाद येथे आहे. ते स्थळ दुर्लक्षित होते. सन १९८६ साली राहुरी तालुक्याचे आम जनतेचे सहकार्याने ट्रस्टची स्थापना करण्यात आली. त्याचा रजिस्टर नं. अे९२४ आहे. सदर ट्रस्टची स्थापनाच मुळात अत्यंत अडचणीतून झालेली आहे. महाराजांचे वंशातील तीन शाखा हयात असून त्यांचे तीन प्रतिनिधी ट्रस्टवर घेण्यात आले. राहुरी सहकारी साखर कारखान्याचे बहुतांशी संचालक ट्रस्ट मध्ये पदावर असल्याने या देवस्थानचे उत्कर्षास सुरुवात झाली. राहुरी तालुक्यातील असंख्य दानशुर दात्यांचे सहकार्यातुन भव्य दिव्य असे समाधी मंदीर बांधण्यात आले. वारकरी सांप्रदायातील अनेक महनिय व्यक्तींनी उपस्थित राहुन भव्य दिव्य असा सप्ताह कारखान्याचे सहकार्यातून मुर्तीप्राणप्रतिष्ठापना निमित्ताने सोहळा पार पडला. पुजा अर्चा नित्य नियमाचे धार्मीक विधीस सुरुवात होवून नवचैतन्य निर्माण झाले आणि पुढे विकास पर्व सुरु झाले. प्रथम दोन पक्क्या खोल्या बांधण्यात आल्या. त्यामध्ये चांदीची पालखी व पादूका असल्याने दिंडी सोहळ्यास वैभव प्राप्त झाले. कारखाना कामगारांनी मंदीरास कलर देण्यासाठी देणगी दिली. देवस्थानने बक्षीस योजना राबवून त्यामधील शिल्लक निधीतून पिण्याचे पाणी व्यवस्था, व्यापारी संकुल, पंढरपूर येथे पत्रा शेड, देवस्थानसाठी अद्यावत ऑफिस कार्यालय, पिण्याचे पाणी टँकर, अशी नाना विध कामे करून घेतली. आमदार व खासदार निधीतुन दोन मोठे सांस्कृतिक सभागृहाचे बांधकाम करण्यात आले. पंढरपुर येथे २१ गुंठे जागा खरेदी करुन त्यावर वारकऱ्याचे सोईसाठी शेड कंपाऊंड वॉल, निवासासाठी पत्र्याचे १५ खोल्या, पिण्याचे पाण्यासाठी नगरपालिका नळ कनेक्शन, सांडपाण्यासाठी बोअरवेल, स्वच्छतागृहे सर्व सोयीयुक्त आरसीसी स्लॅबचे १० खोल्या त्यात अॅट्यच स्वच्छतागृह तसेच बाथरूम असे सोई, सुविधा ट्रस्ट मार्फत देणगीदारांचे मदतीने वारकऱ्यांसाठी सुविधा निर्माण केल्या.

सदरचे देवस्थान तीर्थक्षेत्र विकास आराखड्यात घेवुन महाराष्ट्र शासनाने ओढ्यावर पुल, भक्त निवासासाठी दोन मजली १० खोल्याचे पक्के बांधकाम करून दिले असून सांस्कृतिक भवन (मंगलकार्यालय) पक्या स्वरुपात बांधुन दिलेले आहे. त्यापुढे पंढरपुर व ताहाराबाद येथे येणाऱ्या प्रत्येक वारकऱ्यास सोई सुविधा ट्रस्टचे वतीने पुरविण्यात येत आहे. तसेच ताहाराबाद या दुर्गम भागातील भाविकांना गरजेनुसार पाणी टँकर, स्वयंपाकाची भांडी अल्प दरात देवून त्यांना मदत करण्याचा उद्देश ट्रस्टचा आहे.

याशिवाय या भागातील मुलामुलींचे शिक्षणाची सोय व्हावी म्हणून इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत न्यू इंग्लिश स्कूल ताहाराबाद शाळेची सुरुवात करून ती आज १००% मान्यता प्राप्त झाली असून २५० मुले-मुली शिक्षण घेत आहे. या हायस्कुलमध्ये आध्यात्मिक शिक्षणाबरोबरच शैक्षणिक गुणवत्ता उच्चत्तम आहे. याच गावात संत महिपतींनी श्री विठ्ठलरुक्मिनीचे मंदीर बांधलेले असून त्यांचाही जिर्णोद्धार झालेला आहे.

संत महिपती महाराजांचे जिवन चरित्रावर चित्रपट काढलेला असून नजिकचे काळात तो यु.एफ.ओ. वरुन प्रदर्शित होणार आहे. त्यामुळे महाराजांचे कार्याची ओळख सर्व सामान्यांना यामधून होणार

आहे. चित्रपट निर्मितीसाठी तालुक्यातील तसेच बाहेरील स्टार कॉस्ट वापरण्यांत आलेले आहे. त्यामुळे हा चित्रपट लोकमान्य तर होईलच पण त्यास प्रतिसादही चांगला राहणार आहे. हा चित्रपट चित्रपट रूपी ग्रंथ आहे.

तसेच या संताचे पायी दिंडी सोहळ्याचे आद्यप्रवर्तक वै. धनाजी बाबा गागरे मांडवेकर असून सन १९३५ साली पहिला पायी दिंडी सोहळा पंढरपुरला नेण्याचा मान त्यांचेकडे जातो. तद्नंतर आज अखेर ७६ वर्षे हा पायी दिंडी सोहळा जात आहे. २००० ते २५०० वारकरी यामध्ये सहभागी होतात व त्यांना जिल्ह्यातील असंख्य दानशूर दाते मदत करतात.

उपरोक्त विकासाचे शिल्पकार ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष रावसाहेब पा. साबळे, विश्वस्त मंडळ व त्यांना मदत करणारे सर्व दानशूर दाते हेच आहे. आपणही या महिन्याचे 'चपराक' हे मासिक संत कवी महिपती महाराजांचे चरणी अर्पण करणार आहात त्याबद्दल आमच्या सर्व वारकऱ्यांच्या या अंकास हार्दिक शुभेच्छा !


।। श्री संत कवी महिपती प्रसन्न ।।

'साहित्य चपराक' मासिकाच्या संत महिपती महाराज विशेषांकास आमच्या



हार्दिक शुभेच्छा !



। शुभेच्छुक ।

श्री गणेश अलंकार

आमच्याकडे सोने व चांदीचे दागिने तयार करुन मिळतील.

प्रोप्रा.: एम. बी. उदावंत



मु.पो. ताहाराबादकर, मल्हारवाडी रोड,

महिला मर्चन्ड बँक शेजारी,

राहुरी, ता. राहुरी, जि. अ.नगर

मो.: ९८२२७४८१७१, ९७६३१३६४१५ फोन : (०२४२६) २५७०१६

दत्तात्रय बाबासाहेब नाईकवाडे
३०९, मोतीबाग,
शनिवार पेठ,
पुणे-४११०३०.
भ्रमणध्वनी : ९०२८७४६४९२

# महिपतीबुवा, माझं गाव आणि मी !

**संत कवी महिपती महाराज विशेषांकाच्या निर्मितीप्रक्रियेत सुरुवातीपासून पुढाकार घेणारे दत्तात्रय नाईकवाडे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक असलेल्या दत्ताजींनी संत महिपती महाराजांचे साहित्य व कार्य लोकांपर्यंत नेण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. त्यांच्या प्रयत्नांचा थोडक्यात आढावा त्यांच्याच शब्दात.**

डोंगर पठाराच्या माथ्यावर वसलेलं 'ताहाराबाद' हे एक छोटसं गाव. राहुरी तालुक्याच्या पश्चिमेस १६ कि.मी. अंतरावर हे गाव वसलेले आहे. लहानपणी आम्ही यात्रेला, उन्हाळी-दिवाळी सुट्ट्यांमध्ये गावाला जात असू. सुट्ट्यांत बोरे, करवंद आणि आंबे यावर ताव मारत या आम्ही डोंगरखोऱ्यात यथेच्छ भटकत असू आणि रात्री आजीबरोबर गाडकवाडीत भारूडं सोंगं चालायची त्यांना हजेरी लावत असू. गावातही असे कार्यक्रम अक्षयतृतीयेला होत असत. पण या सर्व कार्यक्रमांपेक्षा 'गोपालकाल्याला' जायला आम्हाला फार ओढ असायची.

हा 'गोपालकाला' गोकुळाष्टमीला न होता आषाढ वद्य त्रयोदशीला होत असे. यात्रेत झोपाळे, पाळणे, रहाटगाडगे, खेळणी आणि खाऊवाले यांची गर्दी व्हायची. आम्ही मस्त तेथे हिंडायचो आणि मोठ्यांकडून मिठाई उकळायचो, नाना उचापती चालायच्या. माझी मोठी बहीण वैशालीताई अशीच एकदा सर्व मोठ्यांच्या नजरा चुकवून गोंदण करून आली. आई ओरडली तसं ती आजीच्या आश्रयाला गेली. आजी आमचा फार लाड करायची. आम्हाला कधीही रागावू द्यायची नाही. त्यामुळे तिच्याबरोबर रहायला आम्हाला फार बरं वाटायचं. दर द्वादशीला माझी आजी यात्रेतील वारकऱ्यांना जेवण घालायची. अशी जेवण देणारे गावात दोन तीन घरे होती. पण हा 'गोपाळकाला' कुणाचा कधींपासून सुरू झाला याकडं आमचं कधी लक्ष गेलं नाही. नंतर हळूहळू कळाले की, संत महिपती गावातील खूप मोठे संत होते आणि पांडुरंग यात्राकाळांत ताहाराबादला येतो त्यामुळे सगळे वारकरी येथे जमतात, भजन कीर्तनादी कार्यक्रम होतात व चर्तुदशीच्या पहाटे ते परत जातात. 'देवुळवाडा' महिपतींच परंपरागत घर, जिथे त्यांना पंढरपूरात चंद्रभागेत मिळालेल्या मूर्ती ठेवलेल्या आहेत. तेथे चक्क गुलाल बुक्क्यावर पांडुरंगाची पावले उमटतात. अजूनही हा कार्यक्रम दरवर्षी होतो. अशी त्रोटकच माहिती मला होती.

बाबांच्या नोकरीमुळे नगर, पुणे नंतर वाईत येऊन आम्ही स्थिरावलो. दरम्यानच्या काळात आम्हा सर्व नातवंडाची आवडती आजी काळाने आम्हापासून हिरावून नेली. मग फक्त यात्रा यात्राकाळात आमचे जाणेयेणे चालू राहिले. आजीने लावलेली 'बारस' जेवणाची व्यवस्था परंपरा माझ्या आईने व बहिणीने सांभाळली. आजही आमच्या घरी बारसीचे जेवण वारकरी जेवतात. काहीजण माझ्या आजीची आठवण काढून हळहळतात.

गावची वारी पंढरपूरास येते व माझ्या आवडत्या भौतिकशास्त्राच्या शिक्षकांचे, खटावकर सरांचे घर पंढरपूरास असल्यामुळे मी त्यावेळी पंढरपूरच्या इंजिनिअरींग कॉलेजला प्रवेश घेतला. सभोवती स्वतःच्या स्वार्थासाठी हपापलेली माणसं, स्वतःच्या भौतिक सुखासाठी दुसऱ्याचे लुबाडणारे, त्यांना फसवणारे असे लोक पाहिले की नको वाटायचं या जगात. पण गावच्या मातीचे संस्कार आणि रा.स्व. संघाच्या संपर्कामुळे इतरासाठी सत्कार्य करणे म्हणजेच जीवन जगणे हे वर्म कळले. महाविद्यालयातही त्यावेळी मी, राजू रोंगे, सागर देशपांडे, मुकेश येवणकर असा आमचा छान ग्रुप जमला. संत, महात्मे, राष्ट्रपुरुष यावर आम्ही वाचन, चिंतन, मनन आम्ही करत होतो.

एकदा आई बाबा पंढरपूरात मला भेटावयास आले असताना त्यांनी मुकेशच्या पुस्तकाच्या दुकानात महिपतीकृती 'भक्तिविजय' ग्रंथाची मागणी केली आणि त्यांना तो ग्रंथ मिळाला. त्यावेळी मला वाटलं वा ! आपल्या गावच्या संत महिपतींचा ग्रंथ इथे पंढरपूरातही माहिती आहे. त्या ग्रंथाच भाषांतर मिळवून वाचण्याचा मी प्रयत्न केला. सर्व संताचे चरित्र त्यात होते. भाषांतर वाचायलाही फार मजा येत होती. कुठेही रूक्षपणा जाणवत नव्हता. एका संताने दुसऱ्या

संताचे लिहिलेले चरित्र हे कोण्याही चरित्रकाराने लिहिलेल्या चरित्रापेक्षा उजवेच ठरते, कारण संत सर्वजण मनाच्या उच्च पातळीवर असतात आणि विशिष्ट भाव आवेशात त्यांनी लिहिलेलं असतं. संत महिपतींच सामर्थ्य म्हणजे वाचकालाही ते आपल्या भाव विश्वात घेऊन जातात.

इंजिनिअरींग पूर्ण केल्यावर मी पुण्यास आलो आणि 'विज्ञान भारती' नावाच्या संस्थेत काही काळ काम केलं. भारतीय ऋषी मुनींनी कितीतरी ज्ञान, विज्ञान शोधल की जे आजही जगाला लाजवील असं आहे. आमचे बरेच असे अनमोल ग्रंथ आमच्या अनावधानाने नष्ट झाले, काही परकीय आक्रमकांनी नामशेष केले. तरीही खूप उज्ज्वल परंपरा प्रवाह मला पहावायस मिळातो. पण आपल्या न्यूनगंडामुळे आपणांस त्याचे महत्व वाटत नाही असे जाणवत राहते. कोण्या परदेशी व्यक्तीने इथल्या व्यक्तीचा गौरव केला की मग आपल्याला त्याचे महात्म्य कळते, ही खरोखरच आत्मविस्मृती आहे. ती संत होऊ देत नाहीत. परकीय आक्रमणांच्या काळातही या सर्व संत मंडळीचे चरित्रलेखन संत महिपतींनी महत्कष्ट घेऊन पूर्ण केले. भविष्यातील पुढच्या पिढ्यांसाठी ज्ञान संपादन करुन ठेवले. पण हे सर्वांपर्यंत कसे न्यावे ? मागच्या वर्षी मी एका आयटी कंपनीत काम करत होतो त्यावेळी महिपतींविषयी विकिपीडीया वर संत महिपतीची त्रोटक माहिती मिळाली आणि जस्टीन ॲबॉट या परदेशी लेखकाने भाषांतर केलेले 'स्टोअरीज ऑफ इंडियन संत' हे व इतरही बरेच साहित्य मिळाले. मी माझी पहिली वेबसाईट www.santmahipati.info तयार केली व इंदोरीकर महाराजांच्या हस्ते उद्घाटन केले. त्यावेळी माझा विवेकानंद केंद्रातील मित्र सागर सुरवसेही यात्रेला माझ्या बरोबर होता. यावेळी आम्ही महिपतींविषयी अधिकाधिक माहिती गोळा करत होतो. त्यांच्या वंशजाकरवी आम्हास महिपतीचं काढलेलं चित्र व बरीच माहिती मिळाली. सागर 'साहित्य चपराक'मध्ये काम करु लागला व त्याला भेटायला मी 'चपराक' कार्यालयात गेलो. अवली व्यक्तिमत्व 'चपराक' मासिक व साप्ताहिकाचे संपादक घनश्याम पाटील यांची भेट झाली. मला थोडीफार लेखनाची गोडी लागली ती त्यांनी दिलेल्या मुक्त प्रोत्साहनामुळेच आणि संपर्कात येणाऱ्या सर्वांनाच ते अशी प्रेरणा देतात. समाज व देशाविषयी त्यांची तळमळ आमच्या मनाला भावणारी होती आणि म्हणूनच सहजच मी 'चपराक' कार्यालयात जाऊ येऊ लागलो.

असंच एकदा आई-बाबा पुण्यात आले असताना संपादकांची भेट झाली व महिपतीची यात्रा व ग्रंथसंपदेची माहिती बाबांनी सांगितली व यात्रेसाठी दोघांनीही त्यांना निमंत्रण दिले. संत महिपतीविषयी आणि त्यांनी केलेली ग्रंथ निर्मिती पाहून ते म्हणाले मागच्या वर्षी आम्ही असेच एक मासिक राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांबद्दल लिहीले होते. या वर्षी संत महिपतींचे जीवन व कार्य महाराष्ट्रात व बाहेर आपण पोहचवू यासाठी महिपतीवर एक विशेषांक काढायचं आमचं निश्चित झालं व त्या दृष्टीने कामांची सुरुवातही केली.

आता 'चपराक' टीमच महिपती विशेषांकावर काम करायला पुढे सरसावली. मी आणि सागर पुणे विद्यापीठात जाऊन काही माहिती व लेख मिळतील याची चाचपणी करायला गेलो, पण शासकिय सुट्ट्यामुळे आम्हाला कमी लोक भेटले, सुदैवाने आम्हाला संत महिपतींवर पीएच.डी. केलेले श्री. दत्तात्रय फलके नावाचे प्राध्यापक भेटले. त्यांचा अनुभव होता की पीएच.डी. केल्यापासून या विषयी प्रथमतःच कोणी त्यांना या संदर्भात माहिती विचारली आहे. "मला खूप आनंद झाला आहे. खूप महत्वपूर्ण संत महिपतींचं जीवन कार्य व महती आपण प्रकाशित करत आहात. मी आपणास सर्व मदत करीन असे सांगितले." नंतर त्यांनी त्यांचे मार्गदर्शक डॉ. आवलगावकर यांचाही अभ्यास असल्याचं सांगितलं. माहिती कोठून मिळेल यांचे गणित आपोआप सुटत गेले. संपादकांनीही आवलगावकर, रा. चिं. ढेरे, वा. ना. उत्पाद आदी मान्यवरांचे लेख मागवले. 'चपराक' कुटुंबातील पंचभाईनी श्री संत महिपतीवर एक कविता लिहीली आणि त्यांच्या मुलीने संत महिपतींचे एक रेखाचित्र व एक पोर्ट्रेट काढून दिले. दोन्ही चित्रे उत्तम झाली आहेत.

दरम्यानच्या काळात मी राहुरीस आलो, मी व माझा मावस भाऊ ज्ञानेश्वर गाडीवर दोन दिवस जाहिराती व लेखन गोळा करायला फिरलो. बरे वाईट प्रसंग अनुभव मला मिळाले. काही ठिकाणी अगदीच अनास्था तर काही ठिकाणी स्वागत झाले.

महिपतींबद्दल आम्ही बऱ्याच जणांना भेटलो. काही साहित्यिकांना, रसिकाना, काही संत साहित्यिकांना आणि सर्वांना त्यांनी लिहिलेल्या ग्रंथांविषयी माहिती होती पण त्यांच्याविषयी माहिती मात्र विशेष अशी नव्हती, ती देखील या महिपती विशेषांकाच्या निमित्ताने समाजापर्यंत पोहचेल असे वाटले. एकदा माझा मित्र राघव खूप दिवसांनी मला भेटला. त्याला मी 'चपराक' कार्यालयात बोलावून महिपती विशेषांकाबद्दल सांगितले आणि तो रोमांचित झाला. तो म्हणाला की, कुठलाही कीर्तनकार संतचरित्रावर भाष्य करायचे झाल्यास संत महिपतींचा संदर्भ घेतो. त्यांनी जर हे संतचरित्रांचे लेखन

केले नसते तर संत तुकाराम व ज्ञानेश्वरांचे एवढे चरित्रही लोकांना आज माहिती नसते. राघवने नंतर भांडारकर इन्स्टिट्यूट मध्ये जाऊन संदर्भ मिळविण्याचा प्रयत्न केला. दरम्यान रा.चिं. ढेरेचं नाव संपादकांनी सुचवलं, संत महिपतीबद्दल खूपशी माहिती त्यांनी केलेल्या अभ्यास, प्रवास, चिंतनातून मांडलेल्या लिखानातून मिळाली.

या वर्षी संतमहिपती चित्रपटही प्रसिद्ध होत आहे. ज्ञानेश्वर माने व सर्व मंडळीनी खूप कष्ट व त्याग करुन तो चित्रपट पूर्ण केला. चित्रिकरणादरम्यानचे अनेक आलेले अनुभव त्यांनी मला सांगितले. त्यांची ही अनुभव यात्राही एका लेखामधून मांडली, चित्रपट लेखक मोहमद अनिस यांनी.

जस्टीन ई ॲबॉट हा धर्म प्रसारक भारतात ख्रिस्ती धर्म प्रसारासाठी आला होता. येथील संत वाङ्मयाच्या अभ्यास करताना तो एवढा रमून गेला की ख्रिस्ती धर्मप्रसार विसरुन गेला व संत वाङ्मय सेवत रूजू झाला. महिपतीच्या बऱ्याचशा साहित्याचे त्याने इंग्रजीत भाषांतर केले. जगभरातील अभ्यासकांसाठी ते आता संदर्भग्रंथांचे काम करत आहेत. त्यांच्या संत साहित्याच्या खूप प्रती काही लाखांमध्ये विकल्या गेल्या आहेत. त्याने शेवटी आपली सर्व संपत्ती शेवटी महाराष्ट्रातील संस्थाना वाटून टाकली व आपल्या मृत्यूपत्रात इच्छा व्यक्त केली की मला जाळण्यात यावे, मला भंडाग्नी दिला जावा पुरण्यात येवू नये. अनेक पाश्चात्य लेखकांनीही महिपतींच्या ग्रंथाचे अभ्यासपूर्ण वाचन व अध्ययन केलेले आहे.

आजची आपली भौतिक प्रगती वेगाने होत आहे. आपण जगात एक प्रबल महासत्ता होऊ पण व्यसनाधिनता, धर्मांधता, फुटीरता, स्वार्थांधता या महाव्याधींनी ग्रासले आहे. या व्याधीग्रस्ततेतून आपण बाहेर आलो तरच पाश्चात्य सांस्कृतिक प्रदूषणातून आपणाला निर्मळ राखू शकू. तेंव्हाच आपल्या राष्ट्राचा प्राण 'धर्म' जगू शकेल आणि आपले राष्ट्र टिकेल यात महत्वाची भूमिका या संतचरित्रांची आहे. हेच संतांचे जीवन चरित्र इथल्या समाजाला चिरंतन मार्गदर्शन करत आले आहेत. जीवनाच्या अंधाऱ्या वाटेवर प्रकाशदिपक बनून पथदर्शक ठरत आहेत. हे सर्व पुढच्या पीढी पर्यत न्यायची व जोपासना करायची जबाबदारी आपली आहे ती आपण उचलूयात. संत महिपतीच्या या अनमोल ठेव्याचे आपण जतन संवर्धन करुयात आणि हे सर्वजण त्यायोगे सुसंस्कृत करुयात.

*कृण्वंतो विश्वम् आर्यम् च ।*


PROJECTS & SYSTEM ENGINEERS




OUR OTHER PRODUCTS INCLUDE : HEAVY DUTY HOPPERS, DUST COLLECTION SYSTEMS, BELT CONVEYORS, SUGAR ELEVATORS, CHILLER UNITS, AIR FILTERS, SUGAR SILOS, INDUSTRIAL BLOWERS, HEAT EXCHANGERS, & WATER COOLERS, BAG FILTERS, CYCLONES, PRESSURE VESSELS & many more...

SERVING THE SUGAR INDUSTRY FOR OVER 18 YEARS

With over 110 installations sucessfully running in India & abroad and a range of capacities from 5 TPH to 50TPH and a capability to handle all grades of sugar crystals

SALIENT FEATURES OF THE FBDC

Assures Sugar @ 0.04% moisture & 40 deg C temperature

Capable of handling Raw, Refined & white plantation sugar

Baggable sugar at the outlet, Drying & cooling in a 12m span

Dust free sugar in bags 99.5% dust recovery

High Efficiency blowers ensure min. power consumption

Can conveniently handle any crystal size (300 - 1200 microns)

ICUMSA index is lower than any Conventional Dryer

Sugar Crystal have superior luster & whiteness

Capable of handling high moisture sugar (0.8% -1.0%)

Minimal breakage of sugar crystal due to gentle treatment

Address: 1 Anant Niwas, Lane no.10, Dahanukar Colony, Kothrud, Pune - 411038
Phone:+9120-32922739 | Fax: +9120-25396507 Cell: +919371051829 OR +919850188389,
email: pasefbdc@gmail.com | url: www.paseindia.com

**प्रा. मिलिंद जोशी**
राठी बिल्डर्स,
सुखसागरनगर, कात्रज,
पुणे – ४६.
भ्रमणध्वनी : ९८५०२७०८२३

# 'मराठीपणाची' ज्योत तेवत ठेवणे महत्वाचे !

**नुकतेच महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या फलटण शाखेतर्फे विभागीय साहित्य संमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. या संमेलनाच्या अध्यक्षपदी लेखणी आणि वाणीवर जबरदस्त प्रभूत्व असणारे लोकप्रिय लेखक प्रा. मिलिंद जोशी हे होते. त्यांच्या अध्यक्षीय भाषणाचा संक्षिप्त भाग खास 'साहित्य चपराक'च्या वाचकांसाठी..!**

समाजात परस्परविरोधी घटना घडत असल्यामुळे आजचा समाज दुभंगलेल्या मनोवस्थेतून जात आहे. एकीकडे 'मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती' यांचा प्रचार आणि प्रसार व्हावा यासाठी गावोगावी संमेलने होत आहेत. तर दुसरीकडे दहावी–बारावीसारख्या परीक्षांमध्ये मराठी विषयात नापास होणाऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. परदेशात असलेली मराठी माणसे सातासमुद्रापार असणाऱ्या आपल्या मराठी बांधवांना निमंत्रित करून विश्वसाहित्य संमेलने घेत आहेत. तर महाराष्ट्रातल्या साहित्य संमेलनात 'मराठीचे तारक कोण ? मारक कोण ?' या विषयावर परिसंवाद होत आहेत. या विसंगतीला काय म्हणावे ?

आजची मुले मराठीत बोलत नाहीत, मराठी संस्कृती लयाला चालली आहे, या प्रकारचे निष्कर्ष शहरातील मराठी भाषेतील स्थिती पाहून काढले जातात. पण महाराष्ट्रातली तीन चार शहरे म्हणजे संपूर्ण महाराष्ट्र नव्हे. हे निष्कर्ष काढणाऱ्यांना कुणीतरी सांगायला हवे. मी पुण्यात राहत असलो तरी मूळचा ग्रामीण भागातला आहे. ग्रामीण महाराष्ट्रात साहित्यिक कार्यक्रम आणि व्याख्यानांच्या निमित्ताने माझी भ्रमंती असते. त्या भागात छान मराठी बोलणारी माणसे मला भेटतात. आपली बोली मरणार नाही याची काळजी माणसे घेत असतात. तिथे मराठी साहित्यविषयक कार्यक्रमांना, व्याख्यानांना मोठी गर्दी होत असते. आज गावोगावी ग्रंथप्रदर्शन भरविणारी माणसे आहेत. पुण्यामुंबईतल्या माणसांइतकी पुस्तके विकत घेण्याची ऐपत कदाचित या ग्रामीण आणि निमशहरी भागातील लोकांकडे नसेल, पण तरीही ते त्यांच्या ऐपतीप्रमाणे पुस्तके विकत घेत असतात. हे सारे मला मराठी संदर्भात खूप आश्वासक आणि प्रेरक वाटते.

२०२० साली भारत महासत्ता होणार हा एक फुगा आहे आणि पुण्यामुंबईतल्या महिन्याला लाख रुपये पगार मिळविणाऱ्या काही तरूणांकडे पाहून तो फुगवला जात आहे. तर दुसरीकडे, पदवीधर झालेल्या अनेक तरूणांना साधी नोकरीही द्यायला कुणी तयार नाही. हे वास्तव स्वीकारायला कुणीही तयार नाही. मराठी जगते आहे की मरते आहे ? या संदर्भातले अनुमान केवळ शहरांचा आधार घेऊन आपण काढणार आहोत का ? हा खरा प्रश्न आहे. शहरातली मराठी भाषा आणि संस्कृतीची प्रकृती ठीक नाही हे मान्य केले तरी मराठीच्या दुरवस्थेविषयी गळे काढण्याची आवश्यकता नाही असे मला वाटते. जागतिकीकरणानंतर आणि तंत्रज्ञानाच्या विस्फोट झाल्यानंतर एकूणच जागतिक जीवनशैलीत जे बदल झाले त्याचे परिणाम त्या त्या राष्ट्रातील भाषा आणि संस्कृतीवरही झाले आहेत. त्यामुळे भाषा आणि संस्कृतीचा पोत बदलत असला तरी त्या नष्ट होतील याची भीती बाळगण्याचे कारण नाही.

सुटाबुटात वावरणारी, उत्तम इंग्रजी बोलणारी तरीही मोबाईलवर मराठी गाणी ऐकणारी आणि ऐकवणारी तरूणपिढी पाहिली की, माझे बळ वाढते. मराठीत ब्लॉगवर लिहिणाऱ्या आणि वाचणाऱ्या तरूणांचीही संख्या लक्षणीय आहे. भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसते. ती लोकजीवनाचा श्वास असते. हे आपले भाषाप्रेम, साहित्य प्रेम, वाचनप्रेम अन्य मार्गाने, नव्या पद्धतीने व्यक्त होत असेल तर त्याचेही स्वागत करायला आपण शिकले पाहिजे. वाचन संस्कृतीच्या नावाने ही अशीच ओरड होताना दिसते. वाचन संस्कृती लोप पावते आहे वगैरे वगैरे.... हातात पुस्तके घेऊन वाचणाऱ्यांची संख्या भलेही कमी असेल. ई बुक वाचणारे आहेतच की ! म.सा.प. चा प्रमुख कार्यवाह या नात्याने काम पहात असताना ज्या ज्या वेळी मी ग्रंथालयात जातो त्या त्या वेळी मराठी विषय घेऊन स्पर्धा परीक्षा देणारी काही मराठी आणि अमराठी मुले मोठ्या संख्येने ग्रंथालयात येताना दिसतात. मराठी वाङ्मयाचा इतिहास मोठ्या आस्थेने अभ्यासताना दिसतात.

हे चित्र आश्वासक नाही का ?

आसपास एवढे सारे बदल घडत असताना मराठी भाषेच्या नावाने गळे काढणारे काय करत असतात ? काळाची पावले ओळखून या बदलत्या काळात मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती टिकावी यासाठी आपण कोणते प्रयत्न करतो ? हे युग तंत्रज्ञानाचे आहे. या युगात आपली भाषा तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कशी सशक्त होईल, अधिक लोकांपर्यंत कशी जाईल या दृष्टीनेही प्रयत्न करायला हवेत.

बृहन्महाराष्ट्रात जेवढ्या म्हणून साहित्य संस्था आहेत, तिथे माझे व्याख्यानाच्या निमित्ताने जाणे येणे असते. महाराष्ट्रापासून दूर राहून ते आपले भाषाप्रेम आणि अस्मिता टिकवून आहेत. मध्यप्रदेशात गणेश बागदरे यांच्या पुढाकाराने मध्यप्रदेश सरकारच्या साहाय्याने तिथे मराठी प्रभागाची स्थापना झालेली आहे. बेळगांव, कारवार भागात तणावाचे वातावरण असूनही ज्या दिमाखात, धाडसाने मराठी भाषेचे साहित्यिक कार्यक्रम होतात, संमेलने होतात ते पाहिले की, ऊर भरून येतो. या गोष्टी आश्वासक वाटायला काय हरकत आहे.

माझ्या गुजरातमधल्या एका मित्राकडे एक परदेशी पाहुणा आला होता. मी जेव्हा त्याला भेटायला गेलो होतो तेव्हा तो उत्तम गुजराती बोलत होता. मला आश्चर्य वाटले. मी विचारले, 'आपण गुजराती कुठे शिकलात' तो म्हणाला, 'मी शिकलो नाही, इथे आल्यानंतर इंग्रजी ते गुजराती भाषांतर कसं करायचं, वाक्यरचना कशी असते याची पुस्तके मला मिळाली, इथे कामासाठी आल्यानंतर साधारणपणे जेवढे बोलावे लागले तेवढी वाक्ये त्या पुस्तकात उपलब्ध होती. मला गुजराती भाषाप्रेमींचे कौतुक वाटले. अशी व्यवस्था मुंबई विमानतळावर उतरणाऱ्या परदेशी नागरिकांसाठी आपण मराठीप्रेमी का करू शकत नाही ? मराठीप्रेमींनी इतर भाषांचा दुस्वास करण्यापेक्षा असे प्रकल्प हाती घ्यायला हवेत.

व्याकरणाचा बाऊ केल्यामुळे मराठीला लोक घाबरतात, असे माझे एक निरीक्षण आहे. व्याकरण आणि मराठी लेखन पद्धतीबाबत विचारवंतांत एकवाक्यता नाही. त्यामुळे संभ्रमाचे वातावरण आहे. मराठी भाषा लेखनपद्धती या संदर्भात लोकमान्य टिळकांनी दै. केसरीमध्ये पाच अग्रलेख लिहिले. एका अग्रलेखात ते लिहितात, "मराठीतील कोणती लेखनपद्धती ग्राह्य व कोणती अग्राह्य याचा विचार हळूहळू लोकांनीच केला पाहिजे. वैय्याकरणांनी आपली मते प्रसिद्ध करावी, वादविवाद करावे आणि अशा रीतीने भवति न भवति चर्चा झाली म्हणजे जी पद्धती जास्त संयुक्तिक असेल, तिचाच लोकात प्रघात पडतो आणि इतर पद्धती लुप्तप्राय होतात." लोकमान्यांच्या या विचारांचे आज गांभीर्याने चिंतन होण्याची आवश्यकता आहे.

शासन ही मोठी शक्ती असल्यामुळे त्यांच्याकडून भाषाविकासासंदर्भात काही अपेक्षा बाळगायला हरकत नाही. दै. केसरीतल्या आपल्या अग्रलेखात लोकमान्य लिहितात, "नाडीवरून ज्या प्रमाणे शरीरातील रोगाची अथवा स्वास्थ्याची परीक्षा होते तद्वतच भाषेवरून राष्ट्राची बरी वाईट स्थिती तज्ज्ञ लोक तेव्हाच ताडतात. छत्रपती श्रीशिवाजी महाराज जन्मण्यापूर्वी पोवाडे का झाले नाहीत याचे कारण आता सांगण्याची जरूरी नाही. शिवाजी महाराजांचा अभ्युदय म्हणजे मराठी भाषेचा अभ्युदय," लोकमान्यांच्या सांगण्याचे तात्पर्य एवढेच की, शासनाकडे इच्छाशक्ती असेल तर खूप काही घडू शकते. भाषेच्या संदर्भात सारे काही शासनाने करावे ही भूमिकाही फारशी योग्य नाही. समाजाचीही भूमिका महत्त्वाची आहे. साहित्य संस्था, ग्रंथालये, भाषातज्ज्ञ, प्राध्यापक, शिक्षणतज्ज्ञ यांच्यात सुसंवाद निर्माण झाला तर योग्य त्या दिशेने प्रयत्न करता येऊ शकतात.

मायमराठीचा जयजयकार असो म्हणा किंवा वुई वॉन्ट मराठी म्हणा, आपल्यातली 'मराठीपणाची' ज्योत तेवत ठेवणे महत्वाचे आहे. भाषा आणि संस्कृतीची स्पंदने प्रथम मनात उमटतात. नंतर ती उच्चारातून आणि कृतीतून प्रकटतात. केवळ दिखावूपणासाठी मराठीचे प्रेम नको, आंतरिक जाणीवातून ते प्रकट होत राहिले तर भाषा आणि संस्कृती कधीच मरत नाही.

पूर्वी लिहिणाऱ्यांचा वर्ग पुण्या-मुंबईपुरता मर्यादित होता. आज तशी परिस्थिती राहिलेली नाही. साहित्य निर्मितीचा केंद्रबिंदू पुण्या-मुंबईसारख्या शहरांपासून बाहेर सरकतो आहे. ग्रामीण, दुर्गम आणि वनवासी भागातील लोक लिहू लागले आहेत. जागतिकीकरण आणि उदारीकरणानंतर जगण्याचा तीव्र झालेला संघर्ष साहित्यातून तेवढ्याच प्रभावीपणे प्रकट होत आहे. 'समीक्षेच्या जुन्या फुटपट्ट्यांनी नव्या साहित्याचे मोजमाप करू नका' असा या लोकांचा आग्रह आहे आणि तो रास्त आहे असे मला वाटते. त्याकडे मराठी समीक्षकांनी सकारात्मक दृष्टीने पाहिले पाहिजे. नव्या गोष्टींचे पारंपरिक पद्धतीने आकलन न करता नव्याचा नव्या पद्धतीनेच विचार केला पाहिजे. त्यासाठी समीक्षेचा परिघ कसा व्यापक आणि विस्तृत होईल याकडेही लक्ष दिले गेले पाहिजे.

जे चांगले आहे त्याची पाठराखण करणे, जे दुय्यम दर्जाचे आहे, त्याची जाणीव करून देणे हे समीक्षकांचे खरे काम असते. 'उत्तम कलाकृतींचे सर्जन आणि दुय्यम कलाकृतीचे हनन' हा समीक्षकांचा खरा धर्म असतो. या धर्माचे आज पालन होताना दिसत नाही. सभा

गाजवणे, फड गाजवणे, युद्ध गाजवणे हे शब्दप्रयोग आपण ऐकून होतो. पण 'पुस्तक गाजवणे' या नव्या रोगाने साहित्य क्षेत्राला आज पछाडले आहे. मार्केटिंगला कुणाचाही विरोध नाही. पण बेन्टेक्सलाच सुवर्णपद बहाल करण्याचा जो प्रकार घडतो आहे, तो एक प्रकारचा वाङ्मयीन व्यभिचारच आहे. काळाच्या ओघात अस्सल तेच टिकून राहते हे सत्यच आहे. पण माध्यमे, पैसे यांच्या साहाय्याने आणि साहित्यिकांच्या मदतीने वाचकांची दिशाभूल करणे हा अक्षम्य अपराध आहे. **समाजात न्यायव्यवस्था कोलमडली की जशी अनागोंदी कारभाराला सुरुवात होते तसेच समीक्षेचे अध:पतन म्हणजे साहित्य व्यवहाराचे अध:पतन. ते टाळण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करायला हवेत.**

कोणत्याही कालखंडात लिहिणाऱ्या लेखकांची संख्या आणि समीक्षकांची संख्या यांचे प्रमाण व्यस्तच असते. समीक्षक नेहमीच महान साहित्य कृतींच्या प्रेमात पडलेले असतात. हिमालयाचे महत्व कुणीही नाकारलेले नाही. पण त्यामुळे डोंगर-टेकड्यांची प्रतारणा करणेही योग्य होणार नाही. या टेकड्या पुढे हिमालयाची उंची गाठू शकतात याचे भान राखून समीक्षकांनी आपली समीक्षा वृत्ती सकारात्मकतेने वापरली पाहिजे.

आजचा काळ लेखनासाठी अनुकूल असला तरी लेखकांसाठी मात्र प्रतिकूल आहे. लिहिण्यासारखे हजारो विषय आहेत. फारच थोड्या लोकांच्या लेखनाला प्रसिद्धी मिळते. वृत्तपत्रात जागा नाही. वाङ्मयीन नियतकालिके नाहीत. दिवाळी अंकाच्या संपादकांना प्रसिद्ध लेखक हवे असतात. त्यामुळे स्वत:च पैसे खर्च करून लेखकांना आपले साहित्य प्रकाशित करावे लागते. पैसे मिळतात म्हणून प्रकाशकही ते प्रकाशित करतात. आवश्यकता वाटल्यास पुनर्लेखन, संपादन या गोष्टींकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात निर्माण होणारे असे साहित्य अल्पायुषी ठरते. आजही ई-मेल, ब्लॉग्ज, फेसबुकवर लिहिणाऱ्यांची संख्या प्रचंड आहे. त्या लेखनाची गुणवत्ता ठरवणारी, त्यांना मार्गदर्शन करणारी, त्यांच्या लेखनावर संपादकीय संस्कार करणारी, त्यांच्या कार्यशाळा घेणारी कोणतीही यंत्रणा आज उपलब्ध नाही. ती उभी करण्याचे मोठे काम भाषा आणि साहित्यविषयक काम करणाऱ्या संस्थांना करावे लागणार आहे.

ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी 'यक्ष प्रश्न' या ग्रंथात 'सुधारणा आणि संस्कृती' या लेखात जे विवेचन केले आहे ते महत्त्वाचे आहे. ते म्हणतात, "माणूस आणि संस्कृती यांचे नाते परस्परावलंबनाचे आहे. माणूस हा संस्कृतीचा निर्माता आहे आणि संस्कृतीचे अपत्यही आहे. संस्कृतीचा हात त्याला घडवीत असतो आणि आपल्या हाताने तो संस्कृती घडवित असतो. पाण्यातून ढग निर्माण व्हावेत आणि ढगापासून पाणी निर्माण व्हावे असा हा अन्योन्याश्रय आहे. संस्कृतीच्या निर्मितीत माणसाचा मोठा वाटा आहे. भूमी नियतीने निर्माण केली पण शेती माणसाने केली. कंठ निसर्गाने दिला पण संगीत माणसाने तयार केले. पाषाण खाणीतून आला पण लेणी आणि मूर्ती माणसाने कोरल्या. संस्कृती ही सजीवाच्या प्रयत्नातून प्रकट होणारी आंतरिक स्फूर्ती आहे. सुधारणेचा प्रकाश ऐहिक सुखवर्धनाच्या दिशेने वाहतो. संस्कृतीचा प्रकाश आत्मोन्नतीची वाट दाखवितो. सुधारणेमुळे निसर्गप्रभुत्वाची दारे उघडतात. संस्कृतीमुळे आत्मबोधाची दालने खुली होतात. सुधारणा आणि संस्कृती यांचा समन्वय हाच मानव कुळाच्या भाग्योदयाचा मार्ग आहे. संस्कृतीशिवाय सुधारणेला अर्थ नाही आणि सुधारणेवाचून संस्कृतीला स्थैर्य नाही. सुधारणेच्या सिंहासनावर विराजमान झालेली उद्याची संस्कृती हे सज्जनांचे एक स्वप्न आहे. सुधारणांचा ओघ थोपविता येणार नाही. थांबविता येणार नाही, सामाजिक परिवर्तनाचा तो एक भाग आहे. गतीचा तो कायदा आहे. पण ज्याप्रमाणे पक्वान्नांचा गुणाकार घडला तरी जीवनसत्वांचा भागाकार घडू नये हा आपला आग्रह आपण सोडत नाही, त्याप्रमाणे सुधारणांचा रथ कितीही वेगाने धावला तरी त्याचे सारथ्य संस्कृतीकडून व्हावे, या भूमिकेचे भान सुटू नये."

संस्कृती कधीच रेडिमेड नसते. व्यक्ती आणि समाज यांच्या सजीव संबंधाचा तो परिपाक असतो.

साहित्य हा समाज जीवनाचा आरसा आहे असे म्हटले जाते. समाजात घडणाऱ्या घटनांचे प्रतिबिंब साहित्यात उमटत असते. साहित्यिक, कलावंत आणि विचारवंत हे त्या समाजाचे घटक असतात. त्यांच्या धारणा, जाणीवा हा संस्कृतीचा परिपाक असतो. संस्कृतीची जी काही स्थिती, गती असते ती त्यांच्या साहित्यातून, कलाविष्कारातून आणि विचारातून प्रकट होत असते. कला जन्मजात असली तरी तिला फुलविण्याचे काम संस्कृती करीत असते. आज ताकदीचे लेखक, पत्रकार, संगीतकार, नायक, वादक, नर्तक दिसत नाहीत अशी तक्रार केली जाते. मुळात एकूण समाजाच्या गुणवत्तेची प्रत खालावत असताना अमुक एका क्षेत्रात गुणवत्तेची अपेक्षा करणे ही घोर आत्मवंचनाच म्हणावी लागेल. एखाद्या गव्हाच्या पोत्यातील गहू खराब झाला असेल तर त्यापासून पोळ्या बनविल्या काय, पुऱ्या बनविल्या काय किंवा बिस्कीटे बनविली काय ती चांगल्या दर्जाची

व्हावीत अशी अपेक्षा ठेवणे चुकीचे आहे. कारण या पदार्थांची निर्मिती ज्यापासून झालेली आहे तो उगमच दूषित आहे. संस्कृतीचेही असेच असते. उगमातली शुद्धता आणि समृद्धता नंतर जीवनाच्या सर्व क्षेत्रात प्रवाहित होत असते. त्या शुद्ध उगमाचे जतन आणि संवर्धन ही राज्यकर्त्यांची जबाबदारी असते.

प्राचीन भारतीय संस्कृतीचा अभ्यास करताना असे जाणवते की, काही अपवाद वगळता या देशातील बहुतांश राजे हे कला आणि संस्कृतीचे प्रेमी होते. आपल्या काळात त्यांनी संस्कृती संवर्धनासाठी कलेला राजाश्रय दिलेला होता. हे सत्य एकीकडे असताना दुसरीकडे कलावंतांच्या ठायी आश्रीताची भावना निर्माण झाल्यामुळे कलांचे आणि पर्यायाने संस्कृतीचे नुकसानच झाले. त्यातूनच भाटगिरीही उदयाला आलेली आहे. पण राजाश्रय नाकारून सत्त्व सांभाळत प्रतिभा साधन करणारी अनेक माणसे होऊन गेलेली आहेत. भवभूती, नरेंद्र पंडित या महाकवींची उदाहरणे बोलकी आहेत. अनेकदा राजानेही आश्रयाला असणाऱ्या कलाकारांकडून भाटगिरीची अपेक्षा बाळगलेली नाही. शासनाची कला, साहित्याकडे पाहण्याची दृष्टी कशी असते, यावरती बऱ्याचशा गोष्टी अवलंबून असतात.

महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर यशवंतराव चव्हाण साहेबांसारखे एक द्रष्टे नेतृत्व महाराष्ट्राला लाभले. त्यांना कला-साहित्याची जाण व आवड होती. साहित्य संस्कृती मंडळाची स्थापना, विश्वकोश निर्मितीचा प्रारंभ, विधानपरिषदेवर साहित्यिक, कलावंतांची आमदार म्हणून निवड यासारख्या महत्वपूर्ण गोष्टींना त्यांनी चालना दिली. चिनी आक्रमणानंतर पु.ल. देशपांडे, ग.दि. माडगूळकर, पु.भा. भावे आणि वसंत कानेटकर यांना बरोबर घेऊन त्यांनी तो आक्रमण झालेला प्रदेश दाखविला होता. काकासाहेब गाडगीळ पंजाबचे राज्यपाल असताना भाक्रा नांगल धरणाची माहिती घेण्यासाठी त्यांनी साहित्यिकांना सवलती उपलब्ध करून दिल्या होत्या. देशातील घडामोडींशी आणि विकास प्रक्रियेशी साहित्यिक, कलावंत, विचारवंत जोडला जावा, त्यांच्या जाणिवा प्रगल्भ व्हाव्यात यासाठी पावले उचलली जात होती. नंतर मात्र शासनात ज्या प्रकारची माणसे येत गेली तसतसा दृष्टीकोन बदलत गेला. ७०-८० च्या दशकात शासनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या ग्रंथ पुरस्कारासाठी परीक्षकांची जी समिती नियुक्त केली होती तिचे निकष डावलून पुरस्कार दिले गेले. त्यामुळे बरेच वादळ उठले होते. आजकाल साहित्य आणि नाट्य संमेलनाच्या व्यासपीठावर राजकारणी किंवा शासनातली माणसे ही की नकोत, यावरून वादळ उठते. शासन आणि कलावंत दोघांनीही आपला दृष्टीकोन बदलला पाहिजे. तरच संस्कृती संवर्धनाचे काम नीट पार पडू शकते.

प्रतिभावंतांनी सत्त्व सोडू नये ही गोष्ट खरी आहेच. पण शासनाला जमेत धरायचेच नाही ही भूमिकाही चुकीची आहे. शासन ही एक शक्ती आहे. तिला कला, साहित्य आणि संस्कृतीच्या विकासासाठी उपयोग करून घेतला पाहिजे. शासनाने सांस्कृतिक क्षेत्राच्या विकासासाठी मदत करताना मदतकर्त्यांचीच भावना ठेवली पाहिजे. 'त्यांनी 'उपकारकर्त्यांचा' आव आणण्याची गरज नाही. शासनाच्या सांस्कृतिक विकासासाठीच्या योजनांना प्रतिभावंतांनी सहकार्यच केले पाहिजे. संतश्रेष्ठ तुकारामांनी छत्रपतींनी पाठविलेला सोन्याचा नजराणा नाकारून अपरिग्रहाची सीमा ओलांडली.

**तुम्हापाशी आम्ही । येऊनिया काय ।**
**वृथा शीण आहे । चालण्याचा ।।**

असं आग्रहपूर्वक सांगणारे तुकोबाराय दुसरीकडे पाईकीचे अभंग लिहून महाराजांना आत्मिक बळ देत होते. महाराष्ट्राच्या देदिप्यमान इतिहासातील हे उदाहरण बोलके आहे. अलीकडच्या काळात काही चांगल्या गोष्टीही घडल्या. १९६२-६३ साली शासनाच्या पंचवार्षिक योजनेतील लोकोपयोगी योजना समाजापर्यंत पोहचाव्यात यासाठी व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील आणि प्रा. द.मा. मिरासदार यांनी कथा कथनाच्या माध्यमातून शासनाला सहकार्यच केले.

समाजाच्या सांस्कृतिक जीवनात ज्या ज्या वेळी कसोटीचे क्षण येतात, त्या त्या वेळी शासनाची भूमिका महत्वाची असते. विचारवंतांचे सत्वही पणाला लागत असते. सांस्कृतिक जीवनातील निकोपता, सौहार्द आणि निरामयता टिकविण्याचे काम शासनाबरोबर समाजाचेही आहे. अनेक प्रतिभावंतांना फुलविण्याचे, प्रोत्साहन देण्याचे काम समाजाने केलेले आहे. 'मृत्युंजय'कार शिवाजी सावंतांनी वयाच्या २३ व्या वर्षी 'मृत्युंजय' ही कादंबरी लिहिली. तत्पूर्वी त्यांनी कुरुक्षेत्राचा प्रवास करण्याचे ठरविले. त्यावेळी सावंत लेखक म्हणून अजिबात नावारूपाला आलेले नव्हते. त्यांचे एकही पुस्तक प्रकाशित झालेले नव्हते. तरीही कोल्हापूरकरांनी त्यांना आठ दिवसात अठराशे रूपये जमा करून दिले. त्यात पहिला सव्वाशे रुपयांचा चेक होता तो चित्रतपस्वी भालजी पेंढारकरांचा. पुढे 'मृत्युंजय' या महाकादंबरीने निर्माण केलेला इतिहास आपणा सर्वांना ज्ञात आहेत. कुसुमाग्रजांचा पहिला काव्यसंग्रह प्रकाशित व्हावा यासाठी खांडेकरांनी पुढाकार घेतला होता. नारायण सुर्वेंची कविता प्रकाशात यावी, यासाठी कुसुमाग्रजांनी परिश्रम घेतले. नारायण सुर्वेंनी 'दत्ता हलसगीकर या

कविची कविता समाजासमोर यावी यासाठी परिश्रम घेतले. जुन्या पिढीने नव्या पिढीचा हात धरून त्यांना मार्गदर्शन करण्याची, पुढे नेण्याची वृत्ती आज अभावानेच दिसते. स्वत: फुलताना, इतरांना फुलविण्याची संस्कृती विकसित होणेही तितकेच महत्वाचे आहे.

केवळ संस्थांना अनुदान, पुरस्कार, कलेला प्रोत्साहन या गोष्टींचा सांस्कृतिक धोरणात समावेश होऊन चालणार नाही. मानव्याची अवहेलना करणारे राजकारण टाळणे, समग्र क्रांतिचे स्वप्न पाहणे, साहित्य, संगीत धर्म, तत्त्वज्ञान आणि विज्ञान यांच्या संवर्धनात आनंद शोधणे यांत संस्कृतीचे सार आहे. अशा संस्कृतीच्या संवर्धनासाठी आणि भरणपोषणासाठी सांस्कृतिक धोरण असले पाहिजे. वर्तमानयुगात यांत्रिक आणि भौतिक प्रगतीचा वेग वाढला आहे. पण समाजाची नैतिक वाटचाल मंदावली आहे. समाजाच्या भौतिक आणि नैतिक जीवनातील दरी 'कल्चरल लॅग' म्हणून ओळखली जाते. त्याला 'सांस्कृतिक मांघ' असे म्हणतात. ते दूर करण्यासाठी आणि मानवकेंद्री समाजरचनेसाठी साहित्याने पुढाकार घ्यायला हवा.

आजचे युग तंत्रज्ञानाचे आहे. तंत्रज्ञानाचे महत्व कुणीही नाकारलेले नाही. पण केवळ तंत्रज्ञानाच्या आहारी जाऊन आपल्याला यंत्रमानव घडवायचे नाहीत. हाडामासाची जिवंत माणसे घडवायची आहेत. त्यांच्या डोळ्यात अश्रू येऊ शकतात अशीच माणसे समाजाचे अश्रू पुसण्याचे काम करू शकतात. भावनासंपन्न माणसे घडविण्याचे सामर्थ्य साहित्यात आहे. म्हणून एका हातात साहित्यातून मिळणारे जीवनविषयक तत्वज्ञान आणि दुसऱ्या हातात प्रगत तंत्रज्ञान घेऊन वाटचाल करू या. तंत्रज्ञान आणि तत्वज्ञान यांच्या मिलाफातून विश्वकल्याणाचे पसायदान साकारणार आहे.

# ताहाराबादमध्ये उमटतात विठ्ठलाची पाऊले !

'गोपालकाला', ताहाराबाद गावात ४ दिवस एखाद्या यात्रेचे, उत्सवाचे वातावरण असते. एकादशी, द्वादशी आणि त्रयोदशीच्या काल्यानंतर असतो पाऊलघडीचा कार्यक्रम. याविषयी आख्यायिका अशी आहे. महिपतीबुवा दरवर्षी आषाढी वारीला पंढरपूरला जात असत. पुढे वय झाल्यावर चालणे अशक्य झाले त्यात एकदा वारीच्या मार्गावर असताना महिपतीबुवा घोड्यावरुन खाली पडतात व ती वारी पुर्ण होत नाही आणि वृद्धत्वातील आजारपणामुळे आता पुढे वारीला जाणे शक्य होणार नाही या विचारामुळे महिपतीबुवा व्याकुळ होतात, कष्टी होतात, पांडुरंगाला आळवितात. बुवांची ही आर्त ओढ पाहून पांडुरंग महिपती बुवांना स्वप्नात दृष्टांत देतात की, आषाढी वारी झाली की आषाढ वद्य एकादशीला मी स्वत: पंढरपूराहून ताहाराबाद येथे येत जाईन आणि चार दिवस राहून परत येईन. देऊळवाड्यात चार दिवस किर्तने, प्रवचने, भजने चालू लागली आणि शेवटच्या दिवशी मंदीरात सांडलेल्या बुक्का, कुंकू, गुलालावर चर्तुदशीच्या दिवशी नाजूक पाऊले उमटलेली दिसली. ती पांडूरंगाच्या मुर्तीपासून निघून बाहेर पडताना काही वारकऱ्याना दिसली आणि विठोबा आपल्यासाठी, सर्व भक्तांसाठी खरोखरी ताहाराबादेस आला. याचा सर्वांना व महिपतीना विशेष आनंद झाला. नंतर हा पाऊलघडीचा कार्यक्रम दरवर्षी पार पडू लागला. गतवर्षी व्यवस्थित नियोजन करुन कार्यक्रमाचे शुटींग करण्यात आले त्यावेळी पाऊलाऐवजी विठ्ठलाचे व वारकऱ्याचे चेहरे त्या हळद, कुंकू, बुक्कयामध्ये चितारलेले आढळले. दरवर्षी चतुर्दशीच्या पहाटे हा सोहळा पार पडतो.

**– भागवत आप्पासाहेब झावरे**



पाऊलघडीच्या कार्यक्रमात बुक्का, हळद, कुंकू मध्ये साक्षात पांडुरंगाची व वारकऱ्याची उमटलेली प्रतिमा. (छाया : ज्ञानेश्वर माने)

**दत्तात्रय गायकवाड**
पी.सी.एम.टी. चौक, भोसरी,
पुणे.
भ्रमणध्वनी : ९९२२१०२१३७

# चरित्रकार महिपतीबुवा

आपली भारतभुमी ही पुण्यभुमी आहे. या देशातील कण अन् कण साधुसंतांच्या, ऋषिमुनींच्या किंबहुना महापुरुषांच्या चरण स्पर्शाने पवित्र झाला आहे. केवळ मानवमात्राचे कल्याण व अभ्युदय अशा तीव्र इच्छेने जिवनाचा वेध करतात. सर्वांचे हित पाहतात. काळाच्या आहारी न जाता काळावर मात करण्याची शिकवण सर्वासमोर मांडतात. हिंदू संस्कृती आणि परंपरा समृद्ध करण्यामध्ये अनेक साधु-संतांनी आपले जीवन वेचले आहे. काहींनी नुसत्या परंपरा जोपासल्या तर काहींनी काळानुरुप त्या परंपरेत आलेल्या दुष्टप्रवृत्तीला, कुपमंडूक वृत्तीला तसेच अंधश्रद्धेला सुरुंग लावून त्या उद्धस्त केल्या आहेत. हिंदू संस्कृतीचे अस्सलपण किंबहुना सनातनत्व म्हणजे नित्यनुतन तत्वाचा स्पर्श ताजा आणि टवटवीत ठेवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा संतांनी केली आहे. ऋषी-मुनी अथवा साधुसंतांनी मंगलांचा वर्षाव करत भुतमात्राप्रती स्नेहभाव प्रस्थापित केला आहे. परस्परांची जिवाभावाची मैत्री निर्माण करुन षडविकारांना पळताभुई थोडी करणारे जिवनदर्शन आपणाला संताच्या ठिकाणी दिसत आहे.

स्वत्व विसरलेला आणि स्वधर्मास पारखा झालेला समाज कमालीचा हतबद्ध होऊन विलक्षण भित्रा झालेला असतो. याच भयगंडातून त्याच्या अंगी पराधीनता येऊन तो लाचारी भिनलेला होत असतो. हीच लाचारी एकदा का मानगुटावर बसली की तीचे आचार-विचारात रूपांतर होते व पुढे ती कायमचीच ठाण मांडून बसते. हीच गुलामगिरी असते. असुरी शक्तींकडून नखशिखांत गाजला गेलेला... दुःख, शोक, विटंबनेने उदंड त्रासला गेलेला... आस्मानी आणि सुलतानीने पिडित शोषित झालेला... कमालीचा गलीतगात्र झालेला व सर्वबाजुनी आंधारून आलेल्या पारतंत्र्याच्या दलदलीतुन-बजबजपुरीतून स्वधर्म सूर्यक्रांती उत्तेजीत करुन मराठी धर्म-महाराष्ट्र धर्म प्रचार आणि प्रसारासाठी अत्यंत प्रतिकुल परिस्थितून अनुकुल परिस्थिती निर्माण करण्याचे संपूर्ण श्रेय हे साधु-संताकडेच जाते यात दुमत नाही.

निखळ एकांतामध्ये बसुन विश्वाची चिंता आणि चिंतन करणारे संत आहेत. रंजल्या गांजल्या लोकस्थितीवर कायमचा तोडगा शोधून काढतात ते संत होय. या संताचे चरित्र देखिल अलौकीक असते. त्यांच्या जवळ मानवतेशिवाय दुसरे काहीच नसते. किंबहुना तो त्यांचा स्वभावच असतो.

जगात काही गोष्टी समाजोपयोगी अथवा समाजहितकारी असतात. त्यांच्यामुळे समाजाचे कल्याण होत असते. अशी अनेक 'मूल्ये' आहेत. परंतु या 'मुल्यांचे' रक्षण समाज करू शकत नाही. यामध्ये 'सांस्कृतिक मूल्ये, सामाजिक मूल्ये, आध्यात्मिक मूल्ये' यांचा समावेश होत असतो. धर्म, भक्ती, ज्ञान ही आपली मूल्ये असुनही समाजाला याचा विसर पडतो. किंबहुना विसरणे मनुष्य स्वभाव आहे. याविषयी ज्ञानेश्वर महाराज म्हणतात की, **'जै प्राणिया कामी भरु । देहाचिवरी आदरु । म्हणोनी पडिला विसरु । आत्मबोधाचा ।।'** ज्ञानेश्वर महाराज म्हणतात की, खाणं, पिणं आणि लेणं याच गोष्टीमध्ये आकंठ आडकलेली व्यक्ती स्वआदरामध्ये मश्गुल असते व तो कर्तव्याला विसरलेला असल्याने विवेक गमावून बसलेला असतो. कर्तव्य विसरलेला असतो. म्हणून ज्या गोष्टी अथवा मुल्ये व्यक्ती अथवा समाज विसरतो, अशा चांगल्या गोष्टींचे ते रक्षण करु शकत नाही. तेव्हा, महापुरुष या मुल्यांचे रक्षण करत असतो.

धर्म, भक्ती, ज्ञान या गोष्टी खरोखर चांगल्या आहेत परंतु, कालांतराने त्यांच्यामध्ये विकारांची उत्पत्ती होते. धर्माला ग्लानी येते, नास्तीकवाद डोके वर काढू लागतो. भक्तीमध्ये केवळ दांभिकताच उरते व ज्ञान सांगण्यापुरतेच शिल्लक राहते आणि वैराग्याचा केवळ भास निर्माण केला जातो. अशी परिस्थिती जेव्हा निर्माण होते ! तेव्हा धर्म, भक्ती, ज्ञान व वैराग्य यांचे पुनरुज्जिवन करण्यासाठी 'महापुरुष' अवतार घेतात. हा सृष्टिचा अनादि सिद्ध नियम आहे. समाजात चांगल्या गोष्टी देखील चांगल्या स्वरुपात कधीही राहु शकत नाहीत. चिरंतन रहात नाहीत की, ज्यांच्याकडे संताना अथवा महापुरुषांना सृष्टी प्रलया पर्यंत वाट पहाण्याची आवश्यकता वाटू नये. पण असे कधीच घडत नाही. म्हणूनच तर संत अथवा महापुरुषांना वारंवार जन्म घ्यावा लागतो. जन्म घेऊन संत हे समाजाला योग्य दिशा दाखवतात. यासाठी संत हे मानापमान, निंदालस्ती व संकटांवर मात करत करत अहोरात्र झिजतात. म्हणूनच तर संताना 'माऊली' म्हणतात.

जसे एखादे लहान मुल असावं, आई ही त्याला दूध पाजून, न्हाऊ घालून, स्वच्छ गादीवर शुभ्र अभ्र टाकून डास चावणार नाहीत अशी व्यवस्था करुन पाळण्यात बाळाला निजवते. एवढे करुनही बाळाच्या देहधर्माला आई काय करणार ? बाळाकडून ती गादी, कपडे घाण होणारच ! अशा वेळी ते सर्व स्वच्छ करुन, धुवून, वाळवून पुन्हा बाळाला पाळण्यात टाकून झोपवणे हेच आईचे कर्तव्य असते. आई हे सर्व विनाकष्ट विणासायास आनंदाने व उत्साहाने करत असते. तिला ते कष्ट वाटतच नाहीत. त्याप्रमाणे समाजाच्या हितासाठी संत हे कष्ट उपसत असतात. वारंवार कष्ट करुनही ते खचत नाहीत. आपल्या वाट्याला आलेलं कर्तव्य कर्म आनंदाने व उत्साहाने करताना जिवनमुक्तीचा आनंद भोगून संत इतरांनाही देतात.

असेच एक संत 'महिपती महराज ताहाराबादकर.' ज्ञानदेव, नामदेव, तुकाराम व एकनाथानंतर घराघरामध्ये ज्यांच्या वाङ्मयाचा ठसा आहे असे हे व्यक्तिमत्व आहे. मराठी भाविकांच्या अध्ययन व अध्यापणामध्ये महिपतीबुवांच्या ग्रंथांचा समावेश असतोच. खेडोपाडी अथवा शहरांमध्ये देखील भक्तिरसाने परिपूर्ण ग्रंथाचे वाचन, श्रवण अथवा संकिर्तन केले जाते. विशेषत: श्रावणामध्ये तर महिपतीबुवांच्या ग्रंथांची मेजवाणीच चालते असते म्हटले तर वावगे होणार नाही. मलादेखील वाचनाची गोडी आणि धार्मिक रस चाखण्याचा उपक्रम त्यांच्या ग्रंथापासूनच सुरु झाला. अंतरंगामध्ये घेऊन जाणारी भक्तीरसाची उधळण महिपतीबुवांनी आपल्या काव्यामध्ये केली आहे.

महिपतीबुवांचा जन्म इ.स. १७१५-शके-१३३७ मध्ये ताहाराबाद येथे झाला. ताहाराबाद हे गाव नगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यात आहे. वास्तविक महिपतीबुवा हे मुळचे सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा गावचे होते. ताहाराबाद हे त्यांचे सासुरवाडीचे गाव असून पुढे ते येथेच स्थायीक झाले. त्यांचे वडील दादोपंत व आई गंगाबाई यांना उतारवयात झालेलं हे पुत्ररत्न होय. महिपतीबुवांचे वडील दादोपंत कांबळे विठ्ठलाचे निस्सिम भक्त. महिन्याची शुद्ध एकादशीला त्यांची पंढरपूर येथे पांडुरंगचरणी नियमित वारी घडत होती. वडिलांबरोबर तीर्थाटण करण्याचे भाग्य महिपतींनी लहानपणापासूनच लाभले होते. त्यांनाही पंढरीची वारी करण्याचे भाग्य अपसुकच प्राप्त झाले.

गावामध्ये शाळा नसल्याने महिपतींना पाठ्य-पुस्तकाचे शिक्षण घेता आले नाही. गावामध्येच एक सत्पुरुष श्री. मोरोपंत तांभेरकर यांचेकडे त्यांनी 'संस्कृत'चे थोडेफार शिक्षण घेतले. किंबहुना त्यांनी संस्कृतचे धडे गिरवले. केवळ याच जोरावर त्यांनी कनिष्ठ अथवा उच्च शिक्षण नसताना देखील इतिहासाला देखील त्यांची नोंद घ्यावी लागली. त्याचे कारण ज्ञानेश्वर सांगतात की,

**'जया अंगी निष्काम आचारु । जिवी विवेक साचारु ।**
**तो झाला साकारु । मुर्तिमंत्र ।।'** यामुळेच महिपतीबुवा अजरामर झाले.

सांप्रत काळाचा विचार केल्यास एक अशिक्षित मनुष्य '४०,०००' ओव्यांचे काव्य निर्माण करु शकतो हे मोठे कोडेच आहे. बहिणाबाई, जनाबाई, कान्होपात्रा, चोखामेळा आदी करुन संतांचे वाङ्मय पाहता त्यांच्याजवळ कोणत्या 'पदव्या' होत्या ? पण त्यांचे अभंग, काव्ये वाचून मती गुंग होते. महिपतींच्या जिवनात एका सत्पुरुषाकडे 'संस्कृत'चे थोडेसे शिक्षण घेतले होते एवढाच काय तो उल्लेख आहे. मला असं वाटतं की, होय ! हेच बिजभांडवल आहे.

कारण संस्कृतइतकी पुरातन व श्रेष्ठ भाषा जगात एकही नाही. उलट जगात जेवढ्या म्हणून भाषा आहेत त्या सर्वांची 'जननी' म्हणून जिला संबोधले जाते ती संस्कृत होय आणि हे निर्विवाद सत्य आहे. याचे विश्लेषण असे सांगतात की, जगाच्या पाठीवर संगणकासाठी समर्पक भाषा कोणतीही नाही. संगणकासाठी सर्वात योग्य भाषा 'संस्कृत' आहे. ती उच्चाराला, आचाराला सुसंगत आहे. जास्तीत जास्त माहिती (जनरल नॉलेज) कमीत कमी शब्दात साठवण्याची क्षमता धारण करणारी, संगणकाला न्याय देणारी परिपूर्ण भाषा असल्याचा निर्वाळा 'फोर्ब्स' या जागतिक मासिकाने अनेक दशकापूर्वीच दिला आहे.

केवळ 'संस्कृत' भाषेमुळे विद्यार्थ्यांचे आकलन तर वाढतेच पण त्याच्या 'स्कोअरेज' मध्ये देखील वाढ होते. हे आपणास दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांच्या अनुभवावरुन सिद्ध होत आहे. एवढेच काय पण राष्ट्रीय स्पर्धा परीक्षा अथवा आय्.ए.एस. अथवा आयपीएस परीक्षेमध्ये प्राविण्य मिळवून यशस्वी होण्यामागे 'संस्कृत' विषय आहे हे निर्विवाद सत्य आहे.

महिपतींना केवळ नाममात्र संस्कृतचे शिक्षण मिळून त्याच आधारावर त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले. याबरोबर महिपतीबुवा हे बहुभाषीक होते. त्यांना मराठी, हिन्दी, संस्कृत, कन्नड व गुजराथी या भाषा अवगत होत्या. त्यांच्या नावावर १६८ महाराष्ट्रातील संत चरित्रे आहेत. तर महाराष्ट्राबाहेरील ११६ संतचरित्रे मिळून एकंदर २८४ आहेत. शिवाय या सर्वांची ओवी संख्या ४०,००० हजारांपर्यंत आहे. महिपती बुवांच्या साहित्य वाचनानंतर त्यांना 'संस्कृत'चे उत्तम

ज्ञान होते असे लक्ष्मी येते. त्यांच्या ठिकाणी भक्ती, करुणा व आपर निष्ठा होती. त्यांनी ज्ञानेश्वरी, गाथा, वेद, शास्त्रे व पुराणे यांचा गाढा अभ्यास केल्याचे देखील जाणवत आहे. पंढरपूर, आळंदी व पैठण येथे वास करताना कथा-कीर्तन-प्रवचन सेवा होत असे. स्वत: रचलेली पदे देखील कीर्तन प्रवचनामध्ये गात असत. वयाच्या सोळाव्या वर्षी प्रपंचाची जबाबदारी स्वीकारून महिपतीबुवा 'मेधा' संपन्न झाले हे विशेष होय.

सरकारी सेवा करत असताना देखील ते गावचे कुलकुर्णीपद सांभाळत होते. एवढे करुनही त्यांचे ईश्वरनामचिंतन चालुच असे. ईश्वराप्रती अपार श्रद्धा बाळगणारे महिपतीबुवांचे 'रसो वै सह:' या अमृत तत्वाच्या रसपानाने अंतरंग बहरले होते. ते तत्व, तो रस त्यांच्या अंगात दाटत होता. किंबहुना तो 'तत्वरस' भक्तीरस मावत नव्हता.

**'अंतरिचे धावे स्वभावे बाहेरी । अवरिताही परि आवरेना ।।'**

या संत वचनाप्रमांणे तो बोध, ते अमृत त्यांच्या कंठातून ओठातून बाहेर पडू लागले. तो रस कोणी कानात भरुन ठेवत तर कोणी आचरणात आणत असत. कोणी कोणी तो मनन, चिंतनामध्ये धारणा धरत असंत.

महिपतीबुवा नामचिंतनात ध्यानमग्न असताना एके दिवशी त्यांना तुकोबारायांनी स्वप्न संदेश दिला की, नामदेवाने शतकोटी अभंगाचा संकल्प केला होता. जसा ज्ञानाचा एका तसा नाम्याचा तुका असल्याने नामदेवाने उर्वरीत अभंग मी पूर्ण केले आहेत व नामदेवाच्या शतकोटी अभंगाचा संकल्प पूर्ण झाला आहे. 'आता तुझ्या मुखातून संतचरित्राचे वर्णन व्हावे,' एवढे बोलून आपला वरदहस्त महिपतींच्या मस्तकावर ठेवला. यामध्ये विशेष उल्लेख करण्यासारखी गोष्ट म्हणजे तुकाराम महाराजांना देखील स्वप्नांतच दृष्टांत झाला होता. पुढे तुकाराम महाराजांनी संत निळोबाराय, संत बहिणाबाई चौधरी व महिपतीबुवांना देखिल तसाच संदेश दिला. हे केवळ आश्चर्य आहे. संत निळोबाराय पारनेरकर व महिपतीबुवा हे समकालीन असून एकाच जिल्ह्यातील होत. तुकाराम महाराजांची कृपादृष्टी होऊन ओठावरची काव्यस्फुर्ती अक्षरामध्ये साकार झाली. महिपतीबुवांची वाणी शुद्ध व मोत्याप्रमाणे सुंदर हस्ताक्षर यामधून साकार झालेली काव्यसंपदा अफाट आहे. यामध्ये मोठे ग्रंथ पाच आहेत. (भक्तविजय, संतलिलामृत, भक्तलिलामृत, संतविजय व कथासारामृत हेच ते आहेत) तसेच स्तोत्रे, अभंग, आरत्या लिहिल्या आहेत. त्यांची वाणी रसाळ व प्रासादिक असून सहज समजणारी व भक्तीरसाने आलंकृत आहेत. आजूनही काही वाङ्मय अप्रकाशित असल्याचे समजते आहे.

तुकाराम महाराजांच्या संदेशाप्रमाणे जिवनाचा वेध सत्कार्यासाठी केला. आपले जिवन संतचरित्र वर्णनासाठीच असल्याचा निश्चय अंगी बाणल्याने उपरोक्त काव्याची निर्मिती महिपतीबुवांकडून झाली. किंबहुना तसा त्यांचा 'स्थायीभाव' झाला हे त्यांच्या चरित्रावरुन स्पष्ट होत आहे.

जगाच्या पाठीवर भारत हा असा देश आहे की जेथे ऋषीमुनी, संत, महंत, पंत निर्माण झाले. येथे विरागी, त्यागी, क्रांतीकारी महापुरुष जन्माला आहे. हे आपण आपले भाग्य समजत आलो असलो तरी, आपणच संताचा क्रांतीकारकाचा छळ केला त्यांचा उपहास केला आहे. किंबहुना जगाच्या पाठीवर असा एक अभागी देश आहे की, जेथे क्रांतीकारकांचा, संताचा पदोपदी उपहास केला गेला आहे. त्यांना समाजानं छळलं आहे. प्रवृत्ती-निवृत्ती जीवनाची दोन चाक आहेत. प्रवृत्ती स्वभावीक आहे. परंतु निवृत्ती ही प्रयत्नाने, अनुभवाने पादाक्रांत करायची असते. प्रवृत्तीमध्ये समाज 'पतीत' केव्हा होतो हे समाजाला देखील कळत नाही. किंबहुना आपण करतो तेच बरोबर असा समाजाचा आग्रह असतो. परंतु तो केव्हा केव्हा अधोगतीला कारण असु शकतो. समाजपुरुष हे 'प्रवृत्ती-निवृत्ती' कावडीचे संतुलन राखतात. अशा संतुलनाचे काम समाज करू शकत नाहीत. कारण तो हतबल म्हणजेच निर्बल असतो.

साधुसंत अथवा क्रांतीकारक यांचे जिवन नेमके उलटे दिसते, म्हणजे ते निवृत्तीप्रधान असतात. म्हणजेच ते प्रवाहाच्या विरुद्ध पोहणारे असतात. प्रवाहाच्या विरुद्ध पोहण्यासाठी फार मोठी ताकत लागते. ती, सर्वसामान्य माणसाजवळ नसते. होतं काय, की, सर्वसामान्य माणूस अज्ञानामुळे कळत-नकळत प्रवाहाविरुद्ध चालणाऱ्याचा छळ करतात. ज्ञानेश्वर महाराज, तुकाराम, एकनाथ, चोखोबा, कान्होपात्र सारखे सर्व संताचे चरित्र तपासले असता पदोपदी त्यांचा तेजोभंग झाला हे इतिहास प्रसिद्ध आहे. अशी असंख्य उदाहरणे आहेत. मग या गोष्टीला महिपतीबुवा तरी कसे अपवाद ठरतील ?

महिपतीबुवांनी स्वत:ला अखंडपणे समाजसेवेला समर्पित केले होते. कीर्तन, प्रवचन, अभंग निरूपणासाठी गावोगावी हिंडत. एवढे करुनही पंढरीची वारी अखंड चालु होती. असे सांगतात की, पंढरपुरची वारी जवळ आल्यावर महिपतीबुवा जवळ असलेल्या संपत्तीचे दान करुन वारीला निघत असत. परंतु याच महिपतीबुवांना अनेक दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांनी त्रास दिला होता.

असेच एकदा महिपतीबुवा कथा-कीर्तनासाठी एका गावात गेले होते. बरोबर मुलगा नारायण व इतर भक्तगण होते. कीर्तन वगैरे झाले

होते. परंतु काही दुष्ट लोक त्यांच्या मागावर होते. नेमकं यांच्या संपर्कात बुवा आले. या दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांनी संध्याकाळी झोपण्या-विसावण्यासाठी लागणारी नको असलेली जागा महिपतीबुवांच्या गळ्यात मारली. निर्मनुष्य व पडक्या अवस्थेत असलेला वाडा इच्छा नसतानाही स्विकारावा लागला होता. हरिकीर्तन व नंतर जागरण होऊन झोपी गेलेले शिष्यगण व भक्तगण ऐन झोपेच्या भरात असतानाच अचानक तेथे प्रचंड आरडा-ओरडा सुरु झाला, आदळाआपट सुरु झाली. भीतीने सर्वजन घाबरुन गेले. रात्री अंधारात एकमेकांच्या अंगावर छाताडावर बसण्याचे प्रकार सुरु झाले. अर्थात सर्वजण गर्भगळीत झाले होते. अशा परिस्थिती महिपतीबुवांनी धिर धरुन इतरांना शांत केले, तसेच ऐन मध्यरात्री २/३ च्या सुमारास भजन सुरु केले. हळुहळू पहाटेच्या उष:काल सुरु झाला व सर्वकाही ठीक झाले. याचा परिणाम असा झाला की, 'जे खळांची व्यंकटी सांडो' या ज्ञानेशोक्ति प्रमाणे दृष्ट आणि खल वृत्ती असणारे महिपतीबुवांना शरण आले.

महिपतीबुवा ताहाराबादकर यांनी ७५ वर्षांचे जिवनकार्य केले. त्यांचे निर्माण इ.स. १७९० शके १७२२ रोजी श्रावण वद्य द्वादशीस झाले. त्यांनी ताहाराबाद येथे समाधी घेतली. आषाढ वद्य त्रयोदशीला येथे मोठी यात्रा भरते. आपणही या पुण्यक्षेत्री लाभ घेऊ या !

महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील बहुतांश भावीक महिपतीबुवांच्या कार्याशी परिचित आहेत. यामध्ये श्रद्धाळु, जिज्ञासु, प्रबोधनकारही आहेत. परंतु महिपतीबुवांच्या चरित्रांच्या माहितीविषयी बरेचजण अपरिचित आहेत. ताहाराबाद येथील मंदीर ट्रस्टने महाराजांचे स्वतंत्र असे चरित्र प्रकाशित करावे असे वाटते. माझे मित्र व 'चपराक' मासिक व साप्ताहिकाचे संपादक श्री. घनश्याम पाटील यांनी महिपतीबुवांवर मासिक प्रकाशन करत असल्याचे सांगितले. हे ऐकूण मलाही आश्चर्यच वाटले. कारण मलाही त्यांच्या चरित्राची त्रोटकच माहिती होती. पाटील यांच्या आग्रहावरुन दोन शब्द लिहिण्याचा केविलवाणा प्रयत्न केलेला आहे. सबब महाराजांनी तो गोड करुन घ्यावा. महाराजांचे चरणी साष्टांग दंडवत.


# शिवाजीराजांचे रायगडावरील सिंहासन

- शिवाजीराजांचा राज्याभिषेक ६ जून सोळाशे चौऱ्याहत्तर रोजी रायगडावर झाला.
- शिवाजीराजांचे सिंहासन बत्तीस मण सोन्याचे होते. रत्नकोषातील अनेक अनमोल रत्ने त्यास लावली होती.
- काय झाले या सिंहासनाचे ?
- शिवाजीराजांच्या वारसांनी हे सिंहासन मोगलांच्या हाती सहजी पडू दिले असेल ?
- ज्या सिंहासनासाठी छत्रपती संभाजीराजांनी आपले प्राण दिले ते सिंहासन खरोखरच मोगलांना मिळाले असेल ?
- छत्रपती संभाजीराजांची जिवंतपणी व त्यांच्या मृत्युनंतरही विटंबना करण्याचा प्रयत्न करणारा औरंगझेबासारखा शत्रू समोर होता.
- खरचं त्याला हे सिंहासन हाती लागले ? की मराठ्यांनी आणखी एक लढाई केली मोगलांशी गनिमी काव्याची ?
- छत्रपतींचे रायगडावरील सिंहासन औरंगझेबाला कधीच मिळाले नव्हते.
- आजही हे सिंहासन अस्तित्वात आहे.
- मराठ्यांनी त्यांच्या इतिहासात केलेली शत्रूची सर्वात मोठी फसवणूक ही या सिंहासनाबाबत होती.
- रायगडावर असणाऱ्या या वैभवशाली सिंहासनाबद्दल वाचा.
- लोकप्रिय लेखक **उमेश सणस** यांची एक खळबळजनक ऐतिहासिक कादंबरी.

**शिवाजीराजांचे रायगडावरील सिंहासन**

लवकरच प्रकाशित होत आहे...!

आपली प्रत आजच राखून ठेवा

चपराक

'चपराक प्रकाशन'
१६१, अनंत अपार्टमेंट, काळा हौद चौक,
शुक्रवार पेठ, पुणे-४११००२. भ्रमणध्वनी : ९२२६२२४१३२
Email : info@chaprak.com


श्रीमहिपतीबुवांचा वंशवृक्ष
दादोपंतबुवा
महिपतीबुवा
विठ्ठलबुवा
नारायणबुवा
गोपाळबुवा
गंगाराम
पंढरीनाथ
महिपती
गोपाळ
गणपती
जयदेव
केशव
शंकर
मुरलीधर
मधुसूदन
सखाराम
रामचंद्र
श्रीधर
दत्तात्रय
दिनकर
रामचंद्र
ही भावंडे मुंबईत होती आता नापत्ता आहेत.
अविनाश
दत्तात्रय
बाळासाहेब
हेमंत
स्वानंद
शुभम
सितराम
रंगनाथ
दामोदर
एकनाथ
जनार्दन
विष्णू
रामकृष्ण
पांडुरंग
प्रमोद
प्रभाकर
श्रीकृष्ण
प्रसाद
राधा
आत्माराम
बाळकृष्ण
रायोबा
रामचंद्र
हरी
सावळाराम
वासुदेव
विनायक
उद्धराम
निंबराज
तुकाराम
गंगाधर
नारायण
शंकर
कृष्णा
निंबराज
तुकाराम
कृष्णाबुवा
पुरुषोत्तम
संजय



'साहित्य चपराक' मासिकाच्या संत चरित्रकार
महिपती महाराज विशेषांकास आमच्या हार्दिक शुभेच्छा !

# श्री संत कवी महिपती महाराज देवस्थान ट्रस्ट

ताहाराबाद, ता. राहुरी, जि. अहमदनगर
फोन : ०२४२६-२७५४१९, मंदीर - २५७१००
मोबाईल : ९८२२७५९०१९

## शुभेच्छुक





**मा.श्री. रावसाहेब कोंडाजी साबळे**
अध्यक्ष

**मा.श्री. अविनाश मुरलीधर कांबळे**
उपाध्यक्ष

**मा.श्री. बाबासाहेब सोपानराव वाळुंज**
मॅनेजींग ट्रस्टी

**मा.श्री. सुरसिंगराव माधवराव पवार**
ऑनररी सेक्रेटरी

## विश्वस्त

मा.श्री. प्रसादराव बाबुराव तनपुरे
मा.श्री. हरिभाऊ भिकाजी जगताप
मा.श्री. भाऊसाहेब मारुती किनकर
मा.श्री. मच्छिंद्र वामनराव कोहकडे
मा.श्री.डॉ. सुखदेव भिकाजी हारदे
मा.श्री. सखाराम गजाराम हांडे
मा.श्री. श्रीकृष्ण पांडुरंग कांबळे
मा.श्री. बापु गफुरभाई शेख
मा.सौ. लक्ष्मीबाई भाऊसाहेब सोनवणे
मा.श्रीमती लिलावती पन्हालाल सोळंकी
मा.श्री. दादासाहेब नानाजी इंगळे
मा.श्री. आसाराम रंगनाथ ढुस
मा.श्री. शिवाजीराव बळवंत कोळसे
मा.श्री. संजय तुकाराम कांबळे
मा.श्री. रमेश गंगाधर नालकर
मा.श्री. सुखदेव मकाजी म्हसे
मा.श्री. व्यंकटराव मुरलीधर पवार
मा.सौ. हौसाबाई केरूजी बानकर
मा.श्रीमती सुशिला आप्पासाहेब वराळे
मा.श्रीमती सुशिला हरीभाऊ मुसमाडे

## निमंत्रित विश्वस्त

मा.श्री. रामदास विश्वनाथ धुमाळ
मा.श्री. सतिश वसंतराव क्षीरसागर
मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम
मा.श्री.ह.भ.प. नाना महाराज गागरे
मा.श्री. बाळासाहेब संपत मुसमाडे (सेक्रेटरी)

Reg. No.: MAHMAR/2009/34853 Declaration No.: PHM/SR/3/VIII/2009

